राजर्षी शाहू मा. व उ. मा. विद्यालय आ. बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली

प्रस्तावना

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी हा एक महत्वाचा तालुका असुन शेती मध्ये म्हणजेच शेती पध्दतीत पिकांच्या रचनेचा अभ्यास व क्षेत्राची माहिती अचुक व्हावी या दृष्टी कोनातुन तसेच येथील मृदेची रचना, मृदा पोत, जल सिंचन सुविधा, इत्यादीचा विचार करुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कोणत्या प्रकारची पिके घेतली पाहिजे. केवळ मृदाच नव्हे तर जल सिंचनाचा पिक क्षेत्रावर कसा परिणाम होतो. कुठल्या प्रकारची पिके कोणत्या विभागात किंवा महसुल क्षेत्रात घेतली जातात याचा सारासार विचार शेतकऱ्यांना करावा. शेतितील पिक कोणत्या पध्दतीची असावे तो दृष्टीकोन शेतकऱ्यांकडे यावा यासाठी या शोध निबंधात कळमनुरी तालुक्यातील खरिप हंगामातिल पिक क्षेत्राचा अभ्यास केलेला आहे.

त्या बरोबर शेतकऱ्यांनी पांरपारीक पीक रचनेतुन म्हणजेच चाकोरी बध्द पीक संरचना सोडुन बाजार मागणी नुसार पिक रचनेवर भर द्यावा. कोणत्या पिकास अधिक मागणी आहे.या बाबी शेतकऱ्यांच्या लक्षात याव्यात व त्यांच्या मध्ये बाजारपेठ ज्ञान विषयी अवगत व्हावे, म्हणजेच शेतीमालाचे विपणन तंत्र शेतकऱ्यांना आत्मसात व्हावे, यासाठी पीक क्षेत्राचा अभ्यास करुन पिके घेतली पाहिजे याबरोबरच त्यांची फसवणुक होऊ नये, काळानुसार पिक पध्दती कशा पध्दतीच्या असल्या पाहिजे, याचे ज्ञान व जनजागृती ग्रामीण भागात म्हणजे तळागळापर्यंत च्या व्यक्ती पर्यंत पोहोचली पाहिजे या उद्देषाने सदरिल विषयाचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने शोध निबंध लिहिला आहे.

स्थान व विस्तार

कळमनुरी तालुक्याचे भौगोलिक स्थान व विस्तार पुढील प्रमाणे असलेला दिसुन येतो. अक्षवृत्तीय विस्तार हा १९ ४० ३३.९३ उत्तर ते ७७ १८ ३७.४१ पश्चिम रेखावृत्त या दरम्यान या तालुक्याचा विस्तार झालेला आहे. तर समुद्र सपाटी पासुन उंची हि ४८० मी म्हणजे १५७४ फुट आहे. सर्व सामान्य पणे विस्तार विचारात घेतला तर पुर्वेस यवतमाळ जिल्हयाचा उमरखेड तालुका आहे. नांदेड चा हादगाव तालुक्याचा सिमावर्ती भाग या दरम्यान आहे पश्चिमेस औंढा नागनाथ तालुका व वसमत तालुक्याचा भाग असुन दक्षिणेस अर्धापुर तालुका तर उत्तरेस हिंगोली तालुका आहे. या दरम्यान कळमनुरी तालुक्याचा विस्तार झालेला दिसुन येतो.

उद्देश

१. कळमनुरी तालुक्यातील खरीप हंगामातील पीक प्रारुप क्षेत्राचा अभ्यास करणे.
२. कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक क्षेत्राचा तुलनात्मक अभ्यास करुन देणे.
३. पीक क्षेत्राविषयी ज्ञान करुन देणे.

संशोधन पध्दती

सदरील शोध निबंध तयार करण्यासाठी निरीक्षण व सर्वेक्षणात्मक पध्दती बरोबर प्रामुख्याने प्राथमीक व दुय्यम स्वरुपातील साधनांचा वापर केलेला आहे. यामध्ये कृषी दैनंदिनी, इंटरनेट, वर्तमानपत्र, कृषी विज्ञान केंद्रास प्रत्यक्ष भेट, इ. दुय्यम सामग्री चा वापर केला आहे. प्रस्तुत शोध निबंधाची व्याप्ती हि केवळ हिंगोली जिल्हयातील कळमनुरी तालुक्यातील खरीप हंगामातील पिक क्षेत्रापुरती मर्यादित आहे.

कळमनुरी तालुक्यातील माती प्रकार व पिक रचना

कळमनुरी तालुक्यातील मातीचा एकंदरीत विचार केला, तर भिन्न भिन्न प्रकारची माती या तालुक्यात असुन त्याचा परिणाम येथील पिक रचनेवर झालेला आहे. कळमनुरी च्या पुर्वेस इसापुर धरणाचा कालवा गेलेला असुन, तो पुढे नांदेड जिल्ह्या कडे जातो. परंतु या दरम्यान कळमनुरी तालुक्यातील शेवाळा, देवजना, पिंपरी खु., पिंपरी बु., येगाव, येहळेगाव तु. या सारखे गावे असुन या दरम्यान कालवा जात असल्याने येथे जल व्यवस्थापनाची सुविधा आहे. पिकांना पाणी पुरवठा अधिक आहे. त्यामुळे येथे अधिक काळ असणारी पिके अढळुन येतात. जसे की हळद, ऊस, काहि प्रमाणात केळी यांचे प्रमाण कमी अधिक दिसुन येते. दक्षिण दिशेचा विचार केला तर बोथी, पावनमारी या परिसरात मोठा पाझर तलाव असल्याने येथील शेतीस पाणीपुरवठा करण्यासाठी या पाझर तलावाचा मोठा फायदा होतो. या शिवाय पावनमारी, बौर, काळयाची वाडी,

भुरक्याची वाडी येथील शेती सुध्दा या तलावाचा फायदा होतो. या शिवाय या परिसरातील शेतमजुर या तलावाच्या आधारे मासे मारी सारखे व्यवसाय करुन उदरनिर्वाह चालवतात. येथील अल्पभुधारक शेतकरी इत्तर व्यवसाय करतात जसे की कुकुटपालन, मेशपालन, लाकुड तोड, शिकार, इ. येथे वेगवेगळे पिके असलेले दिसुन येतात. डोंगराळ प्रदेश असल्याने वन्य प्राण्यांचा त्रास येथील पिकांना होतो. माती हि खडकाळ तर काहि ठिकाणी काळी तर कुठे लाल भरड स्वरुपाची मृदा आढळुन येते. खडकाळ व डोंगराळ प्रदेशातील मृदा हि फारशी उत्पादन क्षम नसल्याने येथे मानसुन हंगामा पुरतीच पिके घेतली जातात. जिथे पाणी पुरवठा होउ शकतो अश्या शेतीत दोन्ही हंगामाची पिके घेतली जातात.

हवामान व आर्द्रता

पिक क्षेत्रावर प्रभाव पाडणाऱ्या प्रमुख घटकांपैकी हा एक मुख्य घटक असुन पिक कोणत्या प्रकारचे व कधी घ्यावेत हे ठरवण्यापुर्वी तेथील हवामान व आर्द्रता या बाबींचा विचार करुन पिके घेतली जातात. कळमनुरी तालुकाच्या वार्षीक हवामान व आर्द्रता हि निरीक्षणा अंती अशी दिसुन येते की कमाल व किमान तापमाना चे निरीक्षण पाहता ऋतु नुसार पावसाळ्या मध्ये कमाल तापमान हे ३६ C असे दिसुन येते तर विभाग तापमान हे २० C च्या दरम्यान आढळुन येते. तोच दृष्टीकोनातुन हिवाळ्यामध्ये कमाल तापमान ३८ C तर किमान १२ C पर्यंत खाली आलेले आढळुन येते तर उन्हाळ्यात हेच तापमान कमाल ४६ C ते ४७ C पर्यंत गेलेले आहे. तम किमान उन्हाळ्यात २७ C पर्यंत असते.

हे जरी ऋतुमाना नुसार तापमान आढळुन येत असले तरी अडिकडील काळात ऋतुमानात अचानक होणाऱ्या बदला मुळे तापमानात ही अचानक बदल होत असलेला दिसुन येत आहे. उदा. कधी कधी उष्णतेची लाट अधिक असेल तर दैनिक तापमान कक्षाही वाढलेली आहे. तर कधी कधी शित लहर किंवा शित लाट उत्तरे कडुन आलेली असेल तर दैनिक तापमान कक्षाही खुप खाली गेलेली आढळुन आलेली आहे. पण हे बदल सदैव होतीलच असे नाही. हे सर्व निसर्गाचे होणारे बदल अचानक होत आहेत. त्याची कारणे ही वेगवेगळया स्वरुपाची असु शकतात. जसे की, जागतिक तापमान वाढ, लाकुड तोड, इ. याशिवाय कधी कधी होणारी गारपीट हि सुध्दा पिकांच्या रचनेवर प्रभाव पाडते. त्यातुन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झ ाल्याची उदाहरणे आहेत.

कळमनुरी तालुक्यातील सर्वसाधारण माहितीचा आढावा

कळमनुरी तालुक्यात एकुण १५१ गावे आहेत. त्यापैकी १४० गावे ही वस्ती युक्त असुन ११ गावे हि बेचिराग स्वरुपाची आहेत. यामध्ये एकुण ग्रामपंचायती १२५ असुन तालुक्यातील एकुण लोकसंख्या २३१४७६ एवढी आहे. त्यापैकी शहरी २४३४६ असुन त्याचे स्त्री पुरुष असे वर्गीकरण केल्याने स्त्री ११८४८ असुन पुरुष १२४९८ इतकी आहे. तर ग्रामीण भागातील लोकसंख्या विचारात घेतली तर ती २०७१३० एवढी आहे. त्या मध्ये स्त्रिया ९९८८५ इतकी आहे. तर पुरुष १०७२४५ एवढी आहे. या आकडेवारी नुसार कळमनुरी तालुक्याचे लिंग गुणोत्तर हे निम्न स्वरुपाचे असुन, येथील अधीक लोकसंख्या हि शहरी भागाशी जोडलेली आढळुन येते. त्यामानाने ग्रामीण भागात लोकसंख्या कमी आहे.

कळमनुरी तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र व येथील भुमी उपयोजन

कळमनरी तालुक्याचे एकुण भौगोलीक क्षेत्रफळ हे ९४५२८.५६ हेक्टर आहे. त्यापैकी लागवडी योग्य असलेले क्षेत्र हे ८८६२५.६० हेक्टर आहे. लागवडीस अयोग्य असलेले क्षेत्र हे ५९०३.९३ हेक्टर इतके आहे. एकुण भौगोलीक क्षेत्रफळाचे विभाजन लक्षात घेतले तर वने, कुरण, व गायरान यामध्ये ३५४९.०५ हेक्टर क्षेत्र वेढलेले आहे. गावठान जमीनीचे क्षेत्र ३५४९.०५ एवढेच आहे. स्मशान भुमी साठी २३.६० हेक्टर क्षेत्र राखीव स्वरुपाचे आहे. तर रस्ते वाटा यासाठी ६३८.३८ हेक्टर जमीन वापरात आलेली आढळुन येते.

कृषी दृष्टीकोणातुन कळमनुरी तालुक्याचे महसुल मंडळ

१. कळमनुरी
२. आ. बाळापुर
३. डोंगरकडा
४. नांदापुर
५. वारंगा फाटा
६. वाकोडी

वर्ष २०१९ मध्ये खरीप हंगामातील पिकाचे क्षेत्र

सर्व सामान्य पणे पिक क्षेत्राचे वर्षानुसार तुलनात्मक अभ्यास करुन कोणत्या महसुल क्षेत्रात कोणत्या पिकाचे क्षेत्र अधिक आहे याची माहिती शेतकऱ्यांना करुन देऊन त्यांनी कोणती पिके घेतली पाहिजे. या विषयी ज्ञान करुन देण्यासाठी हा तुलनात्मक पिक क्षेत्रांचा अभ्यास महत्वाचा आहे. प्रामुख्याने खरीप हंगामातील पिक क्षेत्रांचा विचार करताना पिकांचे चार भागात विभाजन करता येते.

१. अन्नधान्य पिके
२. कडधान्य पिके
३. तेलबिया पिके
४. नगदी पिके

१. अन्नधान्य पिके

ज्वारी

२०१९ मध्ये अन्नधान्य पिके हि खरीप हंगामातील ज्वारी आणि मका हि प्रमुख पिके दिसुन येत आहे. कळमनुरी तालुक्यातील खरीप हंगामातील एकुण ज्वारीचे क्षेत्र १३२२ हेक्टर एवढे आहे. त्यापैकी सर्वात अधिक क्षेत्र हे महसुल मंडळा नुसार पाहिले तर ते डोंगरकडा या कृषी विभागात आहे. तर सर्वात कमी क्षेत्र हे आ. बाळापुर विभागात केवळ ८३ हेक्टर एवढे आहे. इत्तर कृषी विभागात मध्यम स्वरुपाचे क्षेत्र हे ज्वारी पिकाने व्यापलेले आढळुन येते.

मका

२०१९ च्या अहवाला नुसार मका पिकाचे क्षेत्र हे सर्वात अधि नांदापुर या मंडळात असुन ते म्हणजे १६० एवढे आहे. तर सर्वात कमी क्षेत्रफळ वाकोडी या मंडळात केवळ १८ हेक्टर आहे. सर्व मंडळाचा एकत्रित विचार केला तर म्हणजेच एकुण कळमनुरी तालुक्यात खरीप हंगामातील मका या पिकाने ३७९ हेक्टर क्षेत्र व्यापलेले आहे.

२. कडधान्य पिके

२०१९ च्या अहवालानुसार कळमनुरी तालुक्यातील प्रमुख कडधान्या मध्ये तुर, मुग, उडीद ही प्रमुख कडधान्य आहे. तर इतर कडधान्य पिके जसे की, मटकी, हुलगा, वटाणा, घेवडा, इ. कडधान्य या तालुक्यात खरीप हंगामात दिसुन येतात. या कडधान्यांचे एकुण क्षेत्र हे ७२०६ हेक्टर असुन, सर्वात अधिक क्षेत्र हे नांदापुर ह्या कृषी विभागात असुन सर्वात कमी खरीप कडधान्य क्षेत्र आ. बाळापुर या विभागात आहे. ते म्हणजे ५१९ हेक्टर इतके आहे. तर नांदापुर विभागात हे क्षेत्र ११७० हेक्टर एवढे म्हणजे सर्वात अधिक आहे.

सर्वसामान्य पणे कडधान्यामध्ये सर्वात अधिक तुर या पिकाचे क्षेत्र आहे. ते म्हणजे ४७२१ हेक्टर एवढे असुन सर्वात कमी कडधान्य क्षेत्र उडीद या पिकाचे आहे. कारण सोयाबीन या पिकाचे वाढते प्रमाण आहे.

३. तेलबीया पिके

खरीप हंगामातील प्रमुख तेलबीया पिकांमध्ये एकमेव सोयाबीन या तेलबिया या पिक क्षेत्राचे प्रमाण सर्वात अधीक म्हणजे ४९८१४ हेक्टर इतके आहे. या पैकी सर्वात अधीक क्षेत्र असलेले मंडळ डोंगरकडा हे असुन येथे ९५५८ हेक्टर एवढे क्षेत्र या परिसरात आहे. तर सर्वात कमी क्षेत्र नांदापुर या परिसरात आहे.

४. नगदी पिके

कळमनुरी तालुक्यात प्रामुख्याने नगदी पिके जी आढळतात, ती पुढीलप्रमाणे आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कापुस, ऊस, हळद, केळी ही असुन सार्वाधीक नगदी पिकाच्या क्षेत्राचा विचार केला तर कापुस या पिकाचे सर्वात अधिक क्षेत्र आहे. ते म्हणजे ९७७५ हेक्टर आहे. सर्वात अधिक कळमनुरी या महसुल मंडळात याचे क्षेत्र अधिक दिसते. तर सर्वात कमी नांदापुर या मंडळात असुन केवळ ७२९ हेक्टर एवढे आहे. या शिवाय इतर हि नगदी पिके या तालुक्यात आढळातात उस हळद केळी हि पिकेही आहेत. एकुण नगदी पिका खालील क्षेत्र कळमनुरी तालुक्यात १७७४२ हेक्टर एवढे असलेले आव्हालानुसार आढळुन आलेले आहे.

पिके	**क्षेत्र**
अन्नधान्य पिके क्षेत्र	१७२५
तेलबिया पिके क्षेत्र	४९८१४

कड धान्य पिके क्षेत्र	७२०६
नगदी पिके क्षेत्र	१७७४२



२०२० वर्षातील खरीप हंगामातील पिक क्षेत्र

१. अन्नधान्य पिके

२०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये अन्नधान्य पिक क्षेत्र हे थोडेसे अधिक आहे. २०१९ मध्ये हे क्षेत्र १७२५ हेक्टर होते तर २०२० मध्ये १८१५ हेक्टर आहे. ९० हेक्टर क्षेत्र या वर्षी वाढलेले दिसुन येते. प्रामुख्याने वाकोडी महसुल क्षेत्रात अन्नधान्य पिक क्षेत्राचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे एकंदरीतच कळमनुरी तालुक्यातील खरीप हंगामातील २०२० मध्ये अन्नधान्य क्षेत्रा वाढ झालेली आढळते.

२. कडधान्य पिके

या मधील प्रमुख पिके तुर, मुग, उडीद हेच असुन यांचे अनुक्रमे क्षेत्र मुग - १४५८ हे., तुर - ४५०५ हे., तर उडीद - ९३४ हे. क्षेत्र दिसुन येते इतर पिकांच्या मानाने उडीद पिक क्षेत्राचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चाललेले आढळते. एकुण कळमनुरी तालुक्यातील सर्व कडधान्य पिकांचे २०२० मध्ये क्षेत्र हे ६८९७ हेक्टर होते.

३. तेलबीया पिके

खरीप हंगामात प्रामुख्याने केवळ एकच पिक तेलबिया पिकांमध्ये दिसुन येते. ते म्हणजे सोयाबीन हे आहे. दिवसेंदिवस उडिद पिकांचे क्षेत्र कमी होत असुन. सोयाबीन या तेलबीया पिकाचे क्षेत्र वाढत चाललेले आहे. २०२० मध्ये कळमनुरी तालुक्यातील सोयाबीन पिक क्षेत्र हे ५२६९५ हे. असलेले अहवालात आढळुन आलेले आहे.

४. नगदी पिके

२०२० मध्ये सर्वात अधिक नगदी पिकाचे क्षेत्र कापसाचे असनु. ते ८१४० हे. इतके आहे. त्या खालोखाल हळदी चे पिक असुन त्याचे क्षेत्र ४६४६ हे. आहे. एकुण कळमनुरी तालुक्यात नगदी पिका खालील क्षेत्र १५४४५ हे. इतके आहे.

पिके	क्षेत्र
अन्नधान्य पिके क्षेत्र	१८१५
तेलबिया पिके क्षेत्र	५२६९५
कड धान्य पिके क्षेत्र	६८९७
नगदी पिके क्षेत्र	१५४४५



निष्कर्ष

कळमनुरी तालुक्यातील पिक क्षेत्रांचा वर्षानुसार अभ्यास केल्यांनतर असे दिसुन येते की, अधिक शेतकरी वर्ग हा पारंपारीक पध्दती ने शेती करत असुन, तो आजही जुन्या तंत्राशी जोडलेला आहे. कुठल्याही प्रकारची माती परीक्षण न करता केवळ शेजारील शेतकऱ्यांनी कुठल्या प्रकारचे पीक घेतले आहे. त्यानुसार आपल्या शेतात पिके घेतात. वास्तविकता शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे प्रकार हे भिन्न भिन्न असतात. शिवाय त्यात असणाऱ्या मुलद्रव्यांचे प्रमाण वेगवेगळे असते. हि बाब शेतकरी वर्ग लक्षात न घेता पिकांची पेरणी करतात. त्यामुळे उत्पादनामध्ये भिन्नता वाढत चाललेली दिसुन येते.

पारंपारीक पिक पध्दती वर अधिक भर दिलेला आहे. शेतीचे अधिक तुकडीकरण होत असल्यामुळे यंत्राचा वापर करणे शक्य होत नाही. कारण शेती क्षेत्र कमी होत असल्याने. यंत्रांचा वापर करणे शक्य होत नाही. तुकडीकरण झाल्यामुळे दर हेक्टरी उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न शेतकरी वर्ग करत आहे. परंतु हे उत्पन्न दरडोई मात्र कमी होताना दिसुन येत आहे. या शिवाय शेतकरी वर्गास शेती मालाचे विपणन तंत्र कमी असल्या कारणाने शेती मालास योग्य भाव कुठे मिळवता येईल यामध्ये कमतरता दिसुन येते.

उपाययोजना

१. शेतकरी वर्गाने पिक क्षेत्राचा तुलनात्मक अभ्यास करुन आपले पिक निश्चीत करावे.

उदा. ज्या पिकाचे क्षेत्र अधिक आहे. त्या ऐवजी दुसरे पिक आपणास घेता येईल का? याचा विचार करावा.

२. आधुनिक तंत्रज्ञानासी जोड धरावी व नविन नविन तंत्रज्ञान शेतीत वापरावे.

३. बहु पिक पध्दतीचा अवलंब करावा.

४. कृषी विज्ञान केंद्राशी संपर्कात राहुन योग्य ते पिक व्यवस्थापन करावे.

५. शेती माल विपणन तंत्र आत्मसात करावे.

संदर्भ सुची

१. कृषी दैनंदीन.
२. इंटरनेट.
३. कळमनुरी तहसील खरीप पिक पेरणी अहवाल.
४.पिक संरक्षण मार्गदर्शीका.
५. शेती करु फायद्याची (डॉ. आ. बा. पाटील)

राष्ट्र आणि राज्य संकल्पनेचा अभ्यास

डॉ. संभाजी संतोष पाटील

राज्यशास्त्र विभाग, श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स.पाटील साहित्य आणि मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

प्रस्तावना :

राज्य आणि राष्ट्र या दोन्ही संकल्पना समानअर्थी म्हणून वापरण्यात येतात पण वास्तवकि पाहता दोन्ही संकल्पनेत मूलभूत अशा स्वरुपाचा फरक आहे. राज्य हे जसे भूप्रदेश, लोकसंख्या, सार्वभौमत्व आणि शासनसंस्था या घटकांतून निर्माण होते तसे राष्ट्र हि संकल्पना निर्माण होण्यासाठी राष्ट्रीयत्व, समान वंश, भाषा, संस्कृती, धर्म व समान आर्थिक राजकीय उद्दिष्टे व महत्वाकांक्षी यांनी एकमेकांशी जोडला गेलेला समाज म्हणजे राष्ट्र. या राष्ट्रातील लोक भावनिक, अध्यात्मिक व मानसिक पैलुंच्या आणि बंधनाच्या बाबतीत जागरुक असावे तेव्हा त्याचे राष्ट्र होते. राज्याच्या प्रगतीसाठी ते राज्य बलवान होण्यासाठी अशा राज्यातील सर्व लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाचीभावना, राष्ट्रीयत्वाचे गुणधर्म असणे आवश्यक असते. आज राष्ट्र ही संकल्पना व्यापक आहे. एकाच राज्यामध्ये अनेक राष्टे जीवन जगू शकतात. गुण्यागोविंदाने राहु शकतात. जसे भारत या राज्यामध्ये (देशात) अनेक राष्टे आहेत असे म्हटले जाते. उदा. आसामी बंगाली, पंजाबी, महाराष्ट्रीयन, राजस्थानी, काश्मिरी आदि स्वरुपाचे परस्परांपासुन अनेक बाबतीत पुर्णपणे वेगळे असणारे आपापली संस्कृती, भाषा साहित्य, पेहराव, पोशाख आदिंमध्ये भिन्नता असुनही हे सर्व भारतीय संघराज्याचे घटक आहेत याचा अर्थ असा आहे की वर वर दिसणारे वेगळेपण असले तरीही त्या सर्वांचे समान काही हितसंबंध आहेत. फार प्राचीन काळात राज्य आणि राष्ट्र हि समान होती पण आज आधुनिक काळात एका राज्यामध्ये अनेक राष्ट्र गट असू शकतात आणि त्या सर्वांचे मिळून एक राष्ट्रीयत्व निर्माण होते. राष्ट्रीयत्व हि एक निश्चित भूप्रदेशाशी संबंधित झालेली सामुदायीक भावना असते. राष्टीयत्व हे आत्मनिष्ठ आणि भावनात्मक असते आणि ती एक अध्यात्मीक स्वरुपाची संकल्पना आहे. राष्ट्रीयत्वाची भावना अधिक दृढ होण्यास भाषा, इतिहास, वंश, धर्म, राजकीय आकांक्षा, सांस्कृतिक परंपरा, स्वातंत्र्य अशा अनेक गोष्टी आधारभुत असतात. राज्याच्या विकासासाठी, सामर्थ्यासाठी राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची भावना अतिशय महत्वाची असते.

शोधनिबंधाचा उद्देश :

राष्ट्र आणि राज्य या संकल्पनांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. राष्ट्रांची वैशिष्ट्यांची माहिती जाणून घेणे
२. राष्ट्रवादाच्या प्रकारांची माहिती अभ्यासणे
३. राज्यांच्या घटकांची माहिती जाणून घेणे

१. राष्ट्र - Nation

राष्ट्राला इंग्रजीत Nation असे म्हणतात. हा शब्द (Nasci) या लॅटीन शब्दापासुन तयार झाला. याचा अर्थ 'जन्माला येणे' असा आहे. म्हणजेच एखाद्या राष्ट्राला लोकांमध्ये वांशिक किंवा सांस्कृतिक संबंध असतो.

राष्ट्र म्हणजे भावनिक एकता असलेला लोकसमुदाय होय. ज्या लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते ते भावनिकदृष्ट्या एकत्र असतात. म्हणूनच त्यांना राष्ट्र म्हटले जाते.

राष्ट्राची व्याख्या

i) बार्कर यांच्या मते : "एका निश्तिच प्रदेशात वेगवेगळ्या वंशाचे लोक असले तरी ऐतिहासिक परंपरेद्वारे समान विचार आणि भावना, समान धर्म आणि भाषा असलेले लोक म्हणजे राष्ट्र होय."

ii) रॅम्से म्युर यांच्या मते :

ज्या लोकात काही विशेष प्रेमसंबंध निर्माण झाल्यामुळे ते लोक आनंदाने एकत्र राहतात व परस्परांपासुन विभक्त केल्यास असंतुष्ट होतात तसेच आपल्याप्रमाणे नसलेल्या इतर लोकांच्या गुलामगिरीत राहू इच्छित नाही त्याला राष्ट्र म्हणतात.

आपण सर्व एक आहोत. इतरांपेक्षा वेगळे आहोत आणि आपलेही एक स्वतंत्र राज्य असावेत, परकीयांच्या गुलामगिरीत राहण्याची आपली इच्छा नाही असे वाटणाऱ्या लोकांचा समुह म्हणजे राष्ट्र होय.

राष्ट्राची वैशिष्ट्ये

१) लोकसंख्या :

राष्ट्रासाठी लोकसंख्या आवश्यक असते. या लोकांमध्ये आपसात भाषिक, वांशिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक या दृष्टीने साम्य असते. या आधारे त्यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण होऊन आपण एक राष्ट्र आहोत असे वाटायला लागते.

२) सामुदायीक ऐक्याची भावना :

लोकांमध्ये आपण सर्व एक आहोत अशी मानसिकता निर्माण होते. आणि त्यांच्यात भावनिक ऐक्याची भावना निर्माण होते.

३) राजकीय वेगळेपण :

सामाजीक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा भाषिक समानता असलेले लोक जेव्हा एका निश्तिच भूप्रदेशावर वास्तव्य करु लागतात तेव्हा आपलेही एक स्वतंत्र राज्य असावे असे त्यांना वाटू लागते. या जाणीवेतुनच ते स्वतंत्र राज्याची मागणी करु लागतात.

स्वयंनिर्णयाचे तत्व :

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी या तत्वाचा पुरस्कार केला. व्यक्तिसमुदायांनी कोणत्या स्वतंत्र राज्यात असावे किंवा त्यांचे सरकार कोणत्या प्रकारचे असावे हे ठरविण्याचा हक्क म्हणजे स्वयंनिर्णय होय. या तत्वामुळे लोकांच्या मनात आपले स्वतंत्र राज्य असावे अशी भावना जागृत झाली. व त्यातुनच स्वातंत्र्यासाठी चळवळी निर्माण झाल्या व लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण झाली.

पहिल्या महायुध्दानंतर जागतिक शांतता निर्माण व्हावी यासाठी वुड्रो विल्सन यांनी चौदा (१४) मुद्यांची मांडणी केली.

राष्ट्रवाद : (Nationalism)

राष्ट्रवाद ही एक विचारप्रणाली आहे. यामध्ये राष्ट्राचे स्वतंत्र म्हणजे सार्वभौम राज्यात रुपांतर होणे आणि तशा प्रकारची जाणिव लोकांमध्ये निर्माण होऊन ती त्यांच्या कृतीतून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

भारताला ब्रिटीश वसाहतवादापासुन स्वातंत्र्य मिळवायचे होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातून भारतीय राष्ट्रवादाची भावना व्यक्त होत होती. राष्ट्रवादात आपल्या राष्ट्रावरचे प्रेम व्यक्त होत असते. आपल्या राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण होते. भावनिक पातळीवर लोक राष्ट्राशी जुळतात ही भावना आपणांस अनेक प्रसंगातुन दिसुन येते.

उदा. राष्ट्रगीत सुरु असतांना आपण उभे राहतो. तसेच युध्दकाळात आपण आपल्या सैन्याला पाठींबा देतो, भारताने क्रिकेट मॅच जिंकल्यावर सर्वत्र आनंद होतो. म्हणजेच राष्ट्रवाद लोकांना एकनिष्ठ करणारी शक्ती आहे.

राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये :

१. राष्ट्रवादातून एकता निर्माण होऊ शकते. तसेच एखाद्या गोष्टीचा नाश सुध्दा होऊ शकतो. राष्ट्रवादाचे प्रागतिक राष्ट्रवाद आणि आक्रमक राष्ट्रवाद असे वर्णन करता येते. प्रागतिक राष्ट्रवादात समाजाला एकत्रित करुन विकास साध्य करण्याची क्षमता असते. तर आक्रमक राष्ट्रवादामध्ये आपणच इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत अशी भावना निर्माण होऊन लोकांमध्ये तेढ व दुरावा निर्माण होतो.

२. राष्ट्रवाद हा स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो. साम्राज्यवाद किंवा वसाहतवाद याला विरोध करतो तसेच कोणत्याही क्षेत्रावर परकिय ताबा असण्याऱ्याजा तो विरोध करतो.

३. राष्ट्रवाद विविधतेला प्रोत्साहन देऊ शकतो. 'विविधतेत एकता' हा भारतीय राष्ट्रवादाचा आधार आहे. भारतात धार्मिक, वांशिक, भाषिक, प्रादेशिक विविधता दिसून येते.

राष्ट्रवादाचे राजकिय दृष्टीकोनातून विविध प्रकार :

१. उदारमतवादी राष्ट्रवाद :

प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार आहे. असे उदारमतवादी राष्ट्रवाद मानतो. यामध्ये राष्ट्र आणि सार्वभौमत्व यांची सांगड घातली जाते. या राष्ट्रवादाचा उगम फ्रेंच राज्यक्रांतीत झाला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी सांगितलेल्या चौदा मुद्यांमध्ये हा राष्ट्रवाद दिसून येतो.

२) परंपरावादी राष्ट्रवाद :

स्वदेशाबद्दल अभिमान याला महत्व हा राष्ट्रवाद देतो. राष्ट्र आणि समाज यामध्ये घनिष्ठ संबंध असावा असे हा राष्ट्रवाद मानतो.

३) प्रसारवादी राष्ट्रवाद :

हा राष्ट्रवाद आक्रमक स्वरुपाचा असतो. राष्ट्रीय गौरवासाठी काही राष्ट्रे आक्रमक होतात. साम्राज्यवाद आणि वसातहवाद याचे समर्थन केले जाते.

४) वसाहतवाद विरोधी राष्ट्रवाद :

यामध्ये राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याचा संदर्भ बघितला जातो. भारताचा स्वतंत्र्यलढा हे याचे उदाहरण आहे.

२. राज्य State

मानवी गरजांच्या पुर्ततेसाठी अनेक संस्था निर्माण झाल्या. काही निसर्गत: निर्माण झाल्या तर काही मनुष्याने जाणीवपुर्वक निर्माण केल्या. चांगल्या जीवनाच्या प्राप्तीसाठी राज्याची निर्मिती झाली. मनुष्य आणि राज्य यांचा अभिन्न संबंध आहे. मनुष्याशिवाय राज्य व राज्याशिवाय मनुष्य राहू शकत नाही. सर्व सामाजिक संस्थांच्या शिरोभागी राज्य ही संस्था आहे. 'राज्य' हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरता येतो. आपण भारत, पाकिस्तान, चीन यांचा उल्लेख करतांना 'देश' हा शब्द वापरतो. कधी कधी आपण त्यांना राष्ट्र किंवा राज्य असे सुध्दा म्हणतो. या सर्वांचा अर्थ सारखा असला तरी यामध्ये फरक आहे. धर्म, वंश, भाषा, संस्कृती, इतिहास या आधारावर ऐक्याची भावना निर्माण होते. तेव्हा त्याला राष्ट्र म्हणतो. मात्र एखाद्या राष्ट्राला राज्य होण्यासाठी लोकसंख्या, निश्चित भूप्रदेश, स्वतंत्र शासनसंस्था आणि सार्वभौमत्व या घटकांची आवश्यकता असते.

मात्र जेव्हा आपण महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार यांना राज्य म्हणतो. तेव्हा त्याचा अर्थ घटक सरकार किंवा घटकराज्य असा होतो.

जेव्हा एखाद्या राष्ट्राला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार असतो किंवा हे राष्ट्र इतर राष्ट्रांवर निर्णय घेण्याबाबत अवलंबुन नसते. तसेच आपले कायदे करण्याचा आणि राज्य करण्याचा अधिकार असतो. म्हणजेच हे राष्ट्र सार्वभौम असते तेव्हा या राष्ट्राला राज्य म्हणतात.

राष्ट्राला राज्याचा दर्जा प्राप्त होण्यासाठी सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनव्यवस्था, निश्चित भूप्रदेश आणि लोकसंख्या हे घटक आवश्यक असतात.

राज्याला शिक्षण, समाजकल्याण, संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था यासारखी कार्य करावी लागतात. तसेच जन्ममृत्युची नोंद, आधारकार्ड मिळविणे, लग्नाची नोंदणी करणे यासारखी वैयक्तिक कार्य सुध्दा राज्याला करावी लागतात. त्याचप्रमाणे राज्य आपल्याला हक्क किवा अधिकार प्रदान करते, न्याय देते, क्षमता प्रस्थापीत करते. तसेच स्वातंत्र्याची हमी सुध्दा देते.

राज्याची व्याख्या :

(i) ॲरिस्टॉटल : स्वयंपूर्ण, सुखी, समृध्द जीवन जगण्यासाठी कुटूंबाचा व खेड्यांचा मिळून निर्माण झालेला संघ म्हण्जे राज्य होय.

(ii) हॅरॉल्ड लास्की : वाटून दिलेल्या भौतिक क्षेत्रात, सर्व संस्थांवर श्रेष्ठत्वाचा दावा करणारे लोक आणि शासन यात विभागलेला प्रादेशिक समाज म्हणजे राज्य होय.

(iii) वुड्रो विल्सन : एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटीत केलेले लोक म्हणजे राज्य होय.

(iv) गार्नर: एका विशिष्ट भूप्रदेशावर कमीअधिक लोकसंख्येने कायमची वस्ती करुन राहणारा व बाह्य सत्तेपासून पूर्णपणे किंवा जवळपास बहुअंशी मुक्त असणारा व ज्यातील सरकारची आज्ञा तेथील लोक स्वभावत:च पाळतात असा समाज म्हणजे राज्य होय.

(v) प्रा. गार्नरची राज्याची व्याख्या आधुनिक राज्याचा अर्थ स्पष्ट करणारी सर्वोत्तम आहे. कारण या व्याख्येत राज्याचे चारही घटक आहेत.

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात राज्याचे सात अंग पुढीलप्रमाणे सांगितलेले आहेत. स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोष, दंड, मित्रराष्ट्र

राज्याचे घटक :

१) सार्वभौमत्व

सार्वभौमत्व म्हणजे राज्याचे स्वतंत्र अस्तित्व होय. सार्वभौमत्वाला स्वातंत्र्य असे सुध्दा म्हणतात. सार्वभौमत्व हा कायद्याच्या चौकटीतील शब्द आहे तर स्वातंत्र्य हा शब्द राजकीय स्वरुपाचा आहे. राज्य हे कायदेशीरदृष्ट्या सार्वभौम असते. १९५० साली संविधान अंमलात आणल्यानंतर भारत हे सार्वभौम राज्य झाले. मात्र १९४७ साली भारत फक्त राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला. आणि सार्वभौम सत्ता प्राप्त झाली आणि भारतास राज्याचा दर्जा प्राप्त झाला. सार्वभौम सत्ता हा राज्याचा आत्मा आहे. यासाठी सार्वभौम सत्तेचा अर्थ समजणे आवश्यक आहे. सार्वभौम सत्ता म्हणजे राज्याची सर्वोच्च शक्ती आहे. जी शक्ती अंतर्गत आणि बाह्य नियंत्रणापासून मुक्त असते तिला सार्वभौम सत्ता म्हणतात. राज्याकडे सार्वभौम सत्ता असते. इतर समुहात ती नसते त्यामुळे सार्वभौम सत्ता हा केवळ राज्याचाच गुण आहे. सार्वभौम सत्तेला नागरीक विरोध करु शकत नाही. सार्वभौम सत्तेचे स्वरुप दोन प्रकारचे असते.

अ) अंतर्गत सार्वभौमत्व : जेव्हा एखाद्या राज्याचे कायदे त्या राज्यात सर्वोच्च असतील लोक त्याचे आपुलकीच्या भावनेनेन स्वाभाविकपणे पालन करित असतील. इतर कोणत्याही परकीय शक्तीचे नियंत्रण अंतर्गत बाबतीत नसेल त्याला अंतर्गत सार्वभौम सत्ता म्हणतात. म्हणजे अंतर्गत बाबतीत राज्य स्वतंत्र असते त्यावर कोणतेही नियंत्रण नसते.

ब) बाह्य सार्वभौमत्व : विदेशाशी संबंध प्रस्थापित करतांना जेव्हा राज्य स्वतंत्र असते त्याला बाह्य सार्वभौमसत्ता असे म्हणतात. अशा प्रकारची सार्वभौम सत्ता सर्वोच्च आणि निरंकुश असते.

२) शासनसंस्था : अशाप्रकारे नियम तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे शासनसंस्थांचे काम आहे. संघटीत समाजाला सरकार गरजेचे आहे. सरकारने समाजावर नियंत्रण करावे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात आपल्या राज्याचे प्रतिनिधीत्व करावे. आपल्या राज्याच्या हितसंवर्धन करावे पण सरकार किंवा शासनसंस्था नसेल तर समाजामध्ये अराजकता, बेबंदशाही माजल्याशिवाय राहणार नाही. दैनंदिन जीवन जगणे सर्वसामान्य लोकांना अशक्य होईल. न्याय, शांतता हा मानवी जीवनाचा पाया आहे. पण सरकार नसेल तर हा पायाच नष्ट होईल म्हणून राज्याला सरकार आवश्यक आहे. राज्यातील लोकांच्या सुखी व कल्याणकारी जीवनासाठी शासनसंस्था हा अनिवार्य घटक आहे. आजच्या आधुनिक काळात लोकशाही शासन प्रकार जगात सर्वाधिक लोकप्रिय ठरलेला आहे.

३) निश्चित भूप्रदेश : भूप्रदेश हा एक अनिवार्य घटक आहे. पण हा भूप्रदेश कसा आहे त्यावर त्या राज्याचे आर्थिक स्थैर्य, प्रगती अवलंबून असल्याचे दिसून येते. भूमी हि नैसर्गिक असते, ती निश्चित असते ती वाढणारी नसते. उलट भूमीतील नैसर्गिक साधनांचा मानव वारंवार उपयोग घेत असल्याने पाणी, जगले, खनिज द्रव्य आदिंचा वापर मानव समाज करीत असल्याने भविष्यात या गोष्टींचा तुटवडा निर्माण होणार आहे. जगासमोर पर्यावरणाचा प्रश्न त्यामुळे निर्माण झले आहे. म्हणून मर्यादित भूमी निश्चित अशी भूमी हा राज्याचा अतिशय महत्वाचा घटक आहे. राज्याराज्यांमध्ये संघर्ष भूमीवरील स्वामीत्वावरुनच होत असतात म्हणून भूमी हा घटक असाधारण स्वरुपाचा आहे. आज भूराज्यशास्त्र हा एक अतिशय महत्वाचा नवा विषय अतिशय चांगल्या प्रकारे अभ्यासला जात आहे तो राज्यशास्त्राचाच अभ्यास विषय आहे म्हणून भूप्रदेशाला राज्यसंकल्पनेमध्ये विशेष महत्व आहे.

४) लोकसंख्या : एखाद्या राज्याच्या स्थापनेसाठी लोकसंख्या किती असावी यासंदर्भात प्राचीन काळापासुन विचारवंतांमध्ये विविध मतप्रवाह दिसून येतात. ग्रीक नगरराज्यांच्या काळात राज्यांची लोकसंख्या फार मोठी नसावी तशीच ती फार कमीही नसावी असे म्हटलेले आहे. प्लेटोने आदर्श राज्याची लोकसंख्या ५०४० असावी असे म्हटलेले आहे. तर ॲरिस्टॉटलने राज्य स्वत:च्या पायावर उभे राहु शकेल इतकी लोकसंख्या असावी असे म्हटले आहे. त्यांनी राज्याची लोकसंख्या १०००० असावी असे म्हटलेले आहे. राज्याची लोकसंख्या ही प्रत्येक राज्याच्या परिस्थितीवर अवलंबून असते. राज्याची लोकसंख्या एवढी असावी जेणेकरुन सर्वांच्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकतील आणि शासकाला नियंत्रण करणे शक्य होईल. राज्यांसाठी लोकसंख्या ठरवितांना लोकांच्या गरजांचा विचार होणे आवश्यक आहे. राज्यात आवश्यक तेवढी लोकसंख्या आहे पण ती रोगग्रस्त, कमजोर, चारित्र्यहीन असेल तर राज्याचा विकास होऊ शकणार नाही. लोकसंख्या कमी असली तरी धैर्यवान, निरोगी, चारित्र्यसंपन्न, राष्ट्राभिमानी असेल तर त्या राज्याचा विकास होईल. गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने लोकसंख्येचा विचार करायला पाहिजे.

मूल्यमापन :

राज्यशास्त्र हे सामाजीक शास्त्र असल्याने आणि त्याचा संबंध मानवाच्या भावभावना आणि कृतीशी असल्याने या शास्त्रातील सिध्दांतामध्ये लवचिकता असते या शास्त्राचा अभ्यास शास्त्रीय पध्दतीने करण्यात येतो. राज्यशास्त्राच्या अभ्यासातील मध्यवर्ती संकल्पना राज्य आहे. हजारो वर्षांपासून समाजाची निर्मिती आणि व्यक्तीविकासासाठी समाजाची आवश्यकता आहे. पण व्यक्तीविकास आणि समाजविकासासाठी नियम आवश्यक असतात आणि ते समाजाच्या वाटचालीतून गरजेतूनच आवश्यकतेप्रमाणे निर्माण होत असतात. राज्य ही संकल्पना स्थिर स्वरुपाची असते. परंतू युध्द, क्रांती, विघटनवाद इत्यांदीमुळे राज्य नष्ट झाले तरी राष्ट्रीयत्वाची भावना शतकानुशतके कायम राहते. तेव्हा राष्ट्र आणि राज्य हे दोन्ही घटक वेगवेगळे असले तरीही ते परस्परांना पुरक आहेत.

संदर्भ ग्रंथ

१. प्रा. मुठाळ राम - राजकीय सिध्दांत
अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर
प्रथमावृत्ती २००२

२. डॉ. दिवाण चंद्रशेखर - राजकीय सिध्दांत आणि राजकीय विश्लेषण
विद्या प्रकाशन, नागपूर
प्रथमावृत्ती जून १९८९

३. प्रा. नाईकवाडे अशोक - राज्य आणि राजकीय संस्था
विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
प्रथमावृत्ती जून १९९७

४. डॉ. गुडके -बेनके - सुवर्णा -राजकीय सिध्दांत
प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
प्रथम आवृत्ती २०१४

५. डॉ. भोळे भा.ल. - राजकीय सिध्दांत आणि राजकीय विश्लेषण
पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर १९८८

६. इंदापवार दि.वा. - राजकीय सिध्दांतवाद
श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर
आवृत्ती १९९३

"महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप आणि नव्या दिशा."

प्रा. डॉ. संजय मोहन वाघ
(पी. एच.डी. मार्गदर्शक)
जन सेवा शिक्षण मंडळ कला महाविद्यालय शिवळे, ता . मुरबाड, जि. ठाणे.
प्रा. संदीप बबन घाडगे
(पी.एच..डी. विद्यार्थी)
ॲड.दत्ता पाटील कॉलेज. ऑफ लॉ, अलिबाग, जि. रायगड.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण तर आहेच परंतु जो महाराष्ट्र आज पुरोगामी विचारांचा म्हणून ओळखला जातो त्या महाराष्ट्राला लाभलेली पार्श्वभूमी ही अध्यात्मिक, धार्मिक, आणि सांस्कृतिक अशा स्वरुपाची देखील आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून १ मे १९६० रोजी जन्माला आलेल्या या मराठी राज्याला भौगोलिक सीमांनी मर्यादित केले असले तरी सीमेलगतच्या राज्यांबरोबर महाराष्ट्राला लाभलेला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वारसा हा सामाईक असल्यामुळे येथील समाजाच्या विचारांचे आणि व्यवहारांचे सीमोल्लंघन झाल्याचे आज आपणांस दिसते आहे. मानवी समाज हा बुध्दिमान आणि गतिमान असल्यामुळे समाज व्यवस्थेत बदल होणे किंवा राज्य व्यवस्थेत बदल करणे हे नैसर्गिक आहे. बदल झाला किंवा केला की त्यास विरोध होणे आणि पुढे त्या विरोधास विरोध होणे आणि त्यातून संघर्ष निर्माण होणे स्वाभाविक असते.या सर्व अवस्थांतून महाराष्ट्र राज्याची वाटचाल झाली.कोकणाला लाभलेला समुद्र किनारा, पश्चिम घाटातील सह्याद्रीच्या पर्वत रांगा आणि दख्खनचा पठारी प्रदेश अशा भौगोलिक विविधतेचा महाराष्ट्रीयन समाजाच्या संस्कृतीवर, व्यवहारावर आणि राजनीतीवर प्रभाव तथा परिणाम झाल्याचे दिसून येते. उदा. आर्थिक राजधानीच्या नजीक असून कोकणच्या विकासातील मागासलेपणा, सामाजिक-शैक्षणिक चळवळीमुळे किंवा सुधारणेमुळे राज्याच्या राजकारणावर पश्चिम महाराष्ट्राची असलेली पक्कड, भौगोलिक सामाजिक भेदामुळे विदर्भ मराठवाड्याच्या समाजात निर्माण झालेला राजकीय दुरावा इत्यादी. थोडक्यात बहुसंख्य महाराष्ट्रीयन समाजाची भाषा मराठी आणि धर्म हिंदू असला तरी त्यांच्या समस्या निराळ्या आहेत किंवा त्यातही काही सारख्या असल्या तरी त्यामागची कारणे निराळी आहेत.

आजच्या महाराष्ट्र राज्याच्या सुस्थिती मागे येथील समाजाने समस्येच्या समाधानासाठी केलेला संघर्ष आणि सोईसुविधासाठी केलेला सातत्यपूर्ण प्रयत्न कारणीभूत आहे. यालाच सामाजशास्त्रज्ञ सामाजिक चळवळ असे म्हणतात. या सामाजिक चळवळीसुद्धा व्यक्तीपरत्वे, काळपरत्वे, स्थिती आणि स्थानपरत्वे बदलत आल्याचे जाणवते. सामाजिक चळवळीचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती समजून महाराष्ट्र राज्यात त्यात बदल कसा होत गेला याचा काही उदाहरणांच्या सहाय्याने अभ्यास प्रस्तूत लेखात केला आहे.

संशोधन पद्धती:-

विषयाशय सामाजिक चळवळी असल्याने समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषय शाखेची संबंधित पुस्तके, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांची नियतकालिके, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचे शोध निबंध

इत्यादी द्वितीय तथ्य सामग्रीचा संदर्भ या लेखात घेतला आहे. तसेच विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे.

सामाजिक चळवळ अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती:-

समाजात होत असलेला विकास जर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या आधुनिक मूल्यांना धरून आणि आर्थिक, सामाजिक न्यायला उद्देशून होत नसेल तर उपेक्षित आणि वंचित असलेला समूह एका समान पातळीवर नेतृत्व, विचारप्रणाली, कार्यकर्ते यांचे संघटन करून एकत्र येतो व आंदोलन,चळवळ, मोर्चे, घेराव अथवा उपोषण इत्यादी मार्गाद्वारे ती मुल्ये साध्य करण्याचा किंवा प्रस्तापित करण्याचा प्रयत्न करतो. विद्यमान समाजव्यवस्थे मध्ये बदल घडवून आणण्यासाठी केलेल्या सामुहिक प्रयत्नांमधून सामाजिक चळवळ निर्माण होत असते. राजकीय व्यवस्थेत, सामाजिक जीवनात औद्योगिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेले विविध स्तरावरील सामूहिक प्रयत्न म्हणजे चळवळ होय. बदलत्या सामाजिक व्यवस्थेबरोबर समाजात कोणते नवीन बदल घडून येतात आणि त्यासाठी कोणती कारणे जबाबदार ठरतात व समाजावर या बदलाचे काय परिणाम होतात इत्यादींशी सामाजिक चळवळ निगडीत असते.

पॉल विल्किन्सन यांच्या मते, "समाजाच्या कोणत्याही थरात मोठ्या प्रमाणात सामूहिक बदल घडविण्यासाठीसाम, दाम, दंड, भेद असे कोणतेही धोरण स्वीकारण्याची तयारी ठेऊन केलेले काम म्हणजे सामाजिक चळवळ होय."

सामजिक चळवळीचे वर्गीकरण साधारणत: स्थान, विचार प्रणाली, परिणाम, चळवळीचा रचना काळ, सदस्य संख्या, व्यापकता यानुसार केले जाते. विविध विचारवंतानी केलेल्या सामाजिक चळवळीच्या वर्गीकरणावर आधारित काही प्रमुख प्रकार पुढील प्रमाणे आहेत १) सुधारणा चळवळ, २) क्रांतिकारक चळवळ, ३) प्रतिगामी किंवा पुनरुज्जीवनवादी चळवळ, ४) प्रतिकार चळवळ, ५) अभिव्यक्तीच्या चळवळी, ६) धर्म पंथीय चळवळ, ७) आदर्श समाजवादी चळवळ.

जगाच्या पाठीवर असा कोणताही समाज नाही जिथे चळवळ झाली नाही. सामाजिक चळवळीची ही अमर्याद व्याप्ती समाजशास्त्रज्ञांनी विषयाचा अभ्यास सुटसुटीत व्हावा म्हणून विशिष्ट समाजव्यवस्थे पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या समाजवादी चळवळीतून राजकीय चळवळी आणि राजकीय व्यवस्था आकाराला येतात किंवा बेकारही होतात. भारत देशाला स्वतंत्र्य मिळत असताना सार्वभौम राज्याच्या निर्मितीच्या चळवळी बरोबर आर्थिक, सामाजिक न्याय प्रस्थापनेच्या चळवळीना देखील उधान आले होते. हैद्राबाद राज्यातील तेलंगनाच्या शेतक़्यांच्या उठाव, बंगाल मधील शेतक़्यांची तेभागा चळवळ, त्रावणखोर येथील पुन्नप्पा वायरल बंड, महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातीलवारली चळवळ, १९४६ चे मुंबई नाविकांचे बंड तसेच रेल्वे खाण, गिरणीकामगारांच संपाच फुटलेल पेव इत्यादी. अशा अनेक चळवळी तथा संघर्षाची उदाहरणे देता येतील की ज्यांच्या नांदीतच भारताच्या स्वातंत्राचा उषःकाल झाला.

सामाजिक सुधारणा आणि सामाजिक चळवळी.

संपूर्ण समाजव्यवस्था न बदलता केवळ वाईट रूढी, प्रथा, परंपरा बदलण्यासाठी अनेक सामाजिक चळवळी झाल्या त्यांना सुधारणावादी चळवळ असे म्हटले जाते. सामाजिक विषमता, बाल विवाह या सारख्या अनिष्ट प्रथांना विरोध करण्यासाठी महात्मा फुले यांनी सुरु केलेली सत्यशोधक चळवळ, जातीव्यवस्था वर्णव्यवस्था नष्ट

करण्यासाठी आंबेडकरांनी सुरु केलेली दलित चळवळ अशा अनेक चळवळी सुधारणावादी चळवळी म्हणून सांगता येतील. या चळवळीची फलोत्पत्ती विविध उपाय योजनेत झाली उदा. बालविवाह प्रतिबंधक कायदा, सती प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, नागरी हक्क संरक्षण कायदा इत्यादी. तसेच प्राथमिक शिक्षण सर्वांना मोफत करण्यात आले, दलित दुर्बल घटकांना शिक्षणात आणि रोजगारात आरक्षण देण्यात आले. तथापि सामाजिक समस्यांची तीव्रता कमी झाली असली तरी किंवा स्वरूप बदलले असले तरी समस्यांचे समूळ उच्चाटन झाले नाही. सबब सामाजिक चळवळींची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच गेली. सामाजिक चळवळींनी ज्या स्त्रीची सामाजिक शृंखलामधूनमुक्तता केली तीच स्त्री आज अर्थार्जनासाठी बाहेर पडते तेव्हा तिला लैगिंक अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. सामाजिक चळवळींच्या सुधारणांचा परिणाम आणि प्रभाव इतका मोठा होता की त्यामुळे समाज व्यवस्थेचा आधार स्तंभ असलेली कुटुंब संस्था आज धोक्यात आली आहे. वृद्धासाठी वृध्दश्रमे, मुलांसाठी पाळणाघरे आणि पत्नी-पती यांच्यासाठी करार नामे अस्तित्वात आले. अशी आजच्या समाजातील कुटुंब संस्था भावना शून्य आणि भौतिकवादी बनत चालली आहे. म्हणूनच आज बाल संस्कार वर्ग, समुपदेशन केंद्र सुरु केली आहेत. आजच्या आणि अगोदरच्या सामाजिक समस्यांमध्ये अंतर असले तरी सुधारणेसाठी सामाजिक चळवळ निरंतर आहे. फरक फक्त सामाजिक चळवळीचे स्वरूप, साधन आणि साध्य यात झाला आहे. घटस्फोटाचे प्रमाण कमी करण्यासाठी, विषमतेवर आधारीत प्रस्थापित करण्यात आलेली समता न्याय करण्यासाठी आणि स्वत: पासून दूर चाललेल्या माणसाला माणसात आणण्यासाठी सामाजिक चळवळीची पुन:निर्मिती किंवा पुन:रचना होणे काळाची गरज आहे. देशाच्या एकता अखंडतेसाठी आणि मराठी माणसाच्या संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळी झाल्या, आज कुटुंबाचेच ऐक्य आणि सामाजिक एकता धोक्यात आहे.

राजकीय सुधारणा आणि सामाजिक चळवळी

आधुनिक काळातील सर्व स्तरावर स्वीकारलेली आणि मान्य केलेली राष्ट्र-राज्य व्यवस्था हीभारताच्या स्वातंत्र्याचा आणि संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा आधार होती. यामध्ये दुवा राजकीय क्रांतीचा, लढ्याचा आणि सामाजिक चळवळीचा होता. हिंदुस्तानच्या खंडप्राय देशात अनेक संस्थानिकांची स्वायत्त संस्थाने होती. तथापि भारताची मोठी राजकीय कारकीर्द हि पारतंत्र्याची आणि गुलामगिरीची राहिली. ब्रिटीश राजवटीच्या अस्तापर्यंत ची सामाजिक चळवळ ही एकमेव राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी होती. त्यानंतर राज्यव्यवस्थेच्या रचनेत,ध्येय-धोरणात आणि कार्यात समाजाभिमुख बदल व्हावा यासाठी झालेल्या विविध स्तरावरील निरनिराळ्या सामाजिक चळवळी या राजकीय सुधारणांसाठीच्या चळवळी समजल्या जातात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून मराठी भाषेचे महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी जन्माला आले. संसदीय संघराज्यीय लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार जो संपूर्ण भारत देशासाठी केला होता त्याच धरतीवर महाराष्ट्र राज्याची शासन संस्था उभी राहिली. राज्याची भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती इतर राज्यांच्या तुलनेने अधिक विषम असल्याने समाजकारण आणि राजकारण यांचा एकमेकांवर विशेष प्रभाव पडला आहे.

सहकार चळवळीतून राजकीय नेतृत्व जन्माला आले आणि त्यांचे राज्याचे सहकार विषयक धोरण निश्चित झाले. महाराष्ट्राची प्रादेशिक अस्मिता व स्थानिकांचे हित जपण्यात राज्याचे सरकार कमी पडत असल्याची जाणीव होऊ लागल्यावर शिवसेनेच्या संघटनेने राजकीय, सामाजिक चळवळ सुरु केली. राज्यशासनाच्या औद्योगिक धोरणाचा शेतीवर, शेतकऱ्यांवर आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो आहे हे कळल्यावर समाजाने सामूहिक विरोध केला. उदा. एनरॉन विरोधी चळवळ, एस.इ.झेड. विरोधी चळवळ तसेच शासनाच्या भ्रष्ट कारभाराला

आळा घालण्यासाठी, माहितीच्या अधिकाराचा कायदा करण्यासाठी अण्णा हजारे यांची चळवळ ही राजकीय सुधारणा चळवळीचीचउदाहरणे आहेत.

तथापि नवे राजकीय प्रश्न निर्माण झाल्याने आणि जुन्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे स्वरूप बदलल्याने राजकीय चळवळीचे स्वरूप आणि साधन बदलले आहे. राजकीय विचारप्रणाली आणि त्या विचार प्रणालीशीएकनिष्ठता लोप पावत चालल्याचे राजकीय सत्तेसाठी होणाऱ्या पक्षांतारातून आणि विरोधी विचारप्रणालीच्या आघाडीच्या सरकार मधून सिध्द होत आहे. आज राजकीय सुधारणांच्या नावाखाली विरोधी पक्ष करत असलेली आंदोलने आणि त्यांच्या आशीर्वादाने समाजाच्या इतर घटकांकडून चालू असलेल्या चळवळी या मागे राजकीय स्वार्थच असल्याचे लपून राहिलेले नाही

सामाजिक चळवळी आणि आर्थिक विकास

चळवळी सामाजिक असो किंवा राजकीय, भूतकाळातील असो किंवा वर्तमान काळातील तसेच प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय असो त्यामध्ये आर्थिक संदर्भ हा दडलेला असतोच. मार्क्स, माओ, लेलीन यांचा साम्यवाद आणि युरोपीय देशांचा भांडवलवाद ही आर्थिक विकासासाठी केलेल्या सामाजिक चळवळींचीच उदाहरणे आहेत. तुलनेने भारताची आणि पर्यायाने महाराष्ट्राची ब्रिटीश राजवटीत झालेली आर्थिक लूट मोठी असल्याने उदारीकरणाला आणि मुक्त स्पर्धेला विरोध करून आणि केवळ भांडवलवाद किंवा केवळ साम्यवाद या पासून दूर राहून भारताने आर्थिक विकासाचे प्रारूप तयार केले. स्वतंत्र पूर्व काळातच सुरु झालेली स्वदेशी चळवळ स्थानिक उद्योगाचे आणि शेतीचे रक्षण करण्यासाठीच होती.

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात उद्योग आणि शेती क्षेत्राच्या विकासात चांगला समतोल साधला असला तरी परप्रांतीयांच्या वाढत्या लोंढ्याने निर्माण केलेला बेरोजगारीचा किंवा स्वयं रोजगाराचा प्रश्न, निर्गुंतवणूकीच्या आणि खाजगीकरणाच्या धोरणामुळे समाजवादी कार्याचा होत असलेला ऱ्हास, सहकार क्षेत्राच्या राजकीयीकरणामुळे सामूहिक, सार्वजनिक, आर्थिक विकासात निर्माण होणारे अडथळे, भांडवल, शिक्षण, तंत्रज्ञान इत्यादींच्याकमतरतेमुळे किंवा मागासलेपणामुळे शेती तथा उद्योगाची होणारी पीछेहाट आणि शासनाचे राजकारण धार्जिणे शेती आणि उद्योग धोरण इत्यादीमुळे आजपर्यंत राज्यात विविध सामाजिक चळवळी झाल्या.स्थानीकांना रोजगार उद्योग मिळावेत म्हणून परप्रांतीयांचे लोंढे रोकण्यासाठी केलेल्या चळवळी, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या खाजगी करणाचा विरोध करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी केलेले आंदोलन, आज अडचणीत सापडलेल्या सहकार क्षेत्राचे रक्षण करण्यासाठी अण्णा हजारे सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांची चालू असलेली चळवळ, शेतकऱ्यांच्या हितासाठी शरद जोशी, राजू शेट्टी, बच्चु कडू, सदाभाऊ खोत यासारख्या सामाजिक-राजकीय कार्यकर्त्यांनी दिलेला लढा इत्यादी.

आजच्या आर्थिक विकासाच्या चळवळी मागची समीकरणे ही समाजवादी कमी आणि राजकीय जास्त असल्याचे परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या चालू असलेल्या संपावरून दिसून येते.

शैक्षणिक सुधारणा आणि सामाजिक चळवळी.

"विद्ये वीना मती गेली !
मतीविना नीती गेली !
नितीविना गती गेली !
गतीविना वित्त गेले !

वित्ताविना शुद्र खचले !
इतके अनर्थ एका अविद्येने केले. !!

महात्मा फुले यांनी महाराष्ट्रीयन समाजासाठी शिक्षणासाठी केलेले कार्य जितके मोठे आहेत्याहून शिक्षणाचे महत्व सांगताना वरील ओळीतून दिलेला उपदेश अधिक मोठा आणि शाश्वत आहे. महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी व त्यांच्या सहका़र्यांनी शिक्षणाच्या प्रचार प्रसाराच्या कर्मयज्ञात दिलेल्या आहुतीने प्रज्वलित केलेल्या दिपज्योतीने मानव समाजाचे आयुष्य आज उजळले आहे. तत्कालीन सामाजिक चळवळी ह्या सर्व प्रकारचे शिक्षण सर्व वर्गापर्यंत पोहोचविण्यासाठी होत्या. ब्रिटीश राजवटीने प्रभावित झालेली ही शिक्षण पध्दती समाज साक्षर करण्यापुरती किंवा सरकारी नोकरी करण्यापुरती मर्यादित असल्याचे लक्षात आल्यावर शिक्षण सुधारणेसाठी नंतर विशिष्ट साधन, स्वरूप, संहिता असलेल्या सामाजिक चळवळींना सुरुवात झाली. या चळवळींच्या माध्यमातून विज्ञान तंत्रज्ञानाचे शिक्षण देणा़र्या शिक्षण संस्था, वैज्ञानिक शिक्षण देणारी महाविद्यालये. शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी कृषी संशोधन करणारी आणि शिक्षण देणारी कृषी विद्यापीठे सुरु करण्यात आली.

खाजगी, विना अनुदानित इंग्रजी माध्यमातील शाळांना मान्यता देण्याच्या शासनाच्या उदार धोरणाने आज शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाला आणि घटनेने दिलेल्या शिक्षणाच्या अधिकाराला मर्यादा आणली आहे. ज्याच्याकडे पैसा त्याच्याकडेच पदवी असे आजचे शिक्षणाचे बाजारीकरण नव्या सामजिक चळवळींना जन्म देत आहे. उदा. आखील भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा.

निष्कर्ष :-

समाज आणि राज्य व्यवस्था बदलली की चळवळीची दिशा आणि स्वरूप बदलते हे स्वातंत्र्यानंतर झालेल्या बदलात दिसून येते आणि चळवळीच्या बदलाचा परिणाम राज्यव्यवस्थेवर होतो हे राज्यातील सत्तांतरामुळे बदललेल्या धोरणातून दिसून येते. राज्याच्या समाजात जे सामजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक बदल झाले त्यामागे कोणत्या न कोणत्या स्वरुपाची सामाजिक चळवळ होती. परिस्थिती बदलली याचा अर्थ ती सुधारली असा होत नाही किंवा समस्येचे समाधान केले कीनव्याने समस्या निर्माण होत नाही असाही नाही. थोडक्यात जोपर्यंत समाज आहे तो पर्यंत समस्या असणारच आणि जोपर्यंत समस्या निर्माण होत राहतील तोपर्यंत सामाजिक चळवळी निर्माण होत राहणारच, केवळ त्यांचे स्वरूप, साधन आणि साध्य भिन्न असेल.

संदर्भ :-

1. डॉ. राठी शुभांगी, " महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय चळवळी व प्रशासन", अथर्व प्रकाशन धुळे,२०१४
2. कुलकर्णी मेधा, "पन्नाशी सामाजिक महाराष्ट्राची", अक्षर प्रकाशन, मुंबई २०११
3. शहा घनश्याम अनुवाद प्राची चिकटे, "भारतातील सामाजिक चळवळी", सेज प्रकाशन दिल्ली २००४, डायमंड प्रकाशन पुणे २०११
4. प्रा.कुलकर्णी शिल्पा, "महाराष्ट्राचे समाजशास्त्र" डायमंड प्रकाशन पुणे, २००९.
5. डॉ. अशोक चौसाळकर , "समाज प्रबोधन पत्रिका", जाने- मार्च २०२१
6. डॉ. जावडेकर शरद (संपादक), प्राचार्य पाटील रमेश, खरे सुरेखा, "समाजवादी शिक्षण हक्कासाठी लढा".
7. बिडवई प्रफुल्ल, अनुवाद मिलिंद चंपानेरकर ,"भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा इतिहास, आव्हानं आणि नवसंजीवनीच्या शक्यता, रोहन प्रकाशन पुणे, २०१८

क्रांतिवीर राघोजी भांगरे यांचे ऐतिहासिक कार्य

प्रा. मुठे लहु किसन
कला व वाणिज्य महाविद्यालय सोयगाव, ता. मालेगाव जि. नाशिक

1857 च्या उठावापूर्वी आणि कॉग्रेस, स्थापनेपूर्वी ब्रिटीश विरोधी प्रतिक्रिया देशभरात अनेक ठिकाणी उमटलेल्या होत्या. त्यांना जनसामान्यांच्या प्रतिक्रिया असे संबोधले जाते. महाराष्ट्रामध्ये अशा स्वरुपाच्या घटना पुणे, नगर, ठाणे आणि नाशिक या परिसरात घडून आलेल्या आहेत. परंतु आदिवासी, शेतकरी, दलित व तत्सम प्रकारच्या शोषित अंकितांचे उठाव एकतर राष्ट्रीय चळवळीच्या परिघाबाहेरचे म्हणून दुर्लक्षित केले गेले किंवा अभिजन वर्गाच्या वैचारिक नेतृत्वाअभावी झालेले उठाव म्हणून त्यांची संभावना केली गेली.

परंतु सबाल्टर्नवादी इतिहासकार ॲंतोनिओ ग्रामची व रणजीत गुहा यांनी या विचारधारेचे खंडण करुन वंचित समाजाच्या इतिहास लेखनाला चालना दिली. व आमच्यासारख्या नव अभ्यासकांना त्यापासून प्रेरणा मिळते आहे. मी सबाल्टर्नवादी इतिहासलेखनाचा आधार घेऊन क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या कार्य–कर्तृत्वाचा वेद घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

परकीय सत्तेशी प्राणपणाने लढणाऱ्या आदिवासी जमातीच्या बंडखोरांनी आणि त्यांच्या नायकांनी स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिले आहे. राघोजी भांगरे हा या परंपरेतील एक भक्कम, ताकतवान, धाडसी बंडखोर नेता होता. पेशवाईच्या अखेरच्या काळात बहुतेक पराक्रमी तलवारी म्यान झालेल्या असतांना एकाकीपणे झुंजणाऱ्या त्र्यंबकजी डेंगळेला भिल्ल, रामोशीच साथ देत होते. त्र्यंबकजी डेंगळेच्या अपयशानंतर अकोले तालुक्यातील कोळी बांधवांनी रामजी भांगरे, रामा किरवा, गोंविदराव खाडे इ. च्या नेतृत्वाखाली लढा दिला आणि नगर, नाशिक, ठाणे, पुणे जिल्हयातील डोंगराळ भागात धूमाकूळ घालून इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले. 1798 ते 1848 अशी तब्बल पन्नास वर्ष अकोले तालुक्याच्या कोळयांनी लढविलेला हा लढा खरोखरच चित्तथराक होता. परंतु दुर्दैवाने आजही तो उपक्षितच राहिला. कारण आदिवासी हा निरक्षर व मागासलेला असल्याने त्याने स्वतःचा इतिहास कधीच लिहिला नाही ही शोकांतिका आहे.

महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्याची मुर्हुतमेढ ज्या शिवाजीराजाने केली त्या शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा पाया ज्याप्रमाणे मालोजीराजे भोसले, श्हाजीराजे भोसले या तीन पिढयांपासून घातला गेलेला होता. त्याचप्रमाणे वालजी भांगरे, रामजी भांगरे, यांच्याकडून राघोजी भांगरे कडे क्रांतीकार्याचा वारसा तीन पिढयांपासून आला होता. "पेशवा थोरले माधवराव यांच्या रोजनिशीमध्ये 1769–70 चा संदर्भ आलेला आहे. त्यामध्ये ते म्हणतात भांगरे व बांबळे व बोकड कोळी यांस दोन गाव दिल्याखेरीज कोळयांचा बंदोबस्त होत नाही."[1]

पेशवाईच्या काळात म्हणजे 1798 मध्ये वालजी भांगरे याने एक हजार कोळी जमवून माळवात व कोकणात हल्ले केले. परंतु वालजीला पकडले. परंतु बंड शमले नाही देवगाव (ता. अकोले) येथे पाटील असणारा वालजीचा पुतण्या रामजी भांगरे याने उठावाचे नेतृत्व स्विकारले. रामा भांगरे हा मोठा कर्तबगार सेनानायक होता. तो चुलत्यापेक्षा यशस्वी ठरला दुसऱ्या बाजीरावाच्या काळात नाना फडणीसाचा तुरंगावास, सर्जेराव घाटगेचा धूमाकूळ हे प्रकार चालले होते त्याच काळात हा उठाव शमविणे अशक्य झाल्याने रामजी भांगरे याला सरकारी अधिकार देऊन तडजोड केली गेली रामजी भांगरे हे राघोजी भांगरे यांचे वडील. रामजी भांगरे यांना नाईकवाडी पोलिस जमादार म्हणून सरकारी नेमणूक मिळाली होती

रामजी भांगरे हा हक्क म्हणून सरकारी पगाराखेरीज आपल्या हद्दीतील प्रत्येक गावातून दरसाल एक रुपया, एक कोंबडी, तांदूळ शिवाय घाटातून ये–जा करणाऱ्या प्रत्येक जथ्याकडून एक मेंढी घेत असे.

परंतु इंग्रजांची कारभारावर घट्ट पकड बसल्यानंतर त्याने आदेश काढले की सरकारी नोकरांनी पगाराखेरीज काही घेऊ नये. त्यामुळे रामजी भांगरेला आपली नोकरी गमवावी लागली व त्याने ब्रिटीशंविरुध्द उठाव केला. रामजी भांगरेच्या उठावाला मोठा प्रतिसाद मिळाला याला दोन कारणे होती स्थानिक कोळयांमधील असंतोष किल्ले, घाट आणि मुलुखाची राखण करण्याबद्दल कोळयांना असणारे अधिकार नेमणूका इंग्रजांनी रद्द केल्या.

रामजी भांगरेवर राजद्रोहाच्या आरोपाचा खटला होऊन त्याला जन्मठेप व काळयापाण्याची शिक्षा झाली. रामजी भांगरेच्या उठावापासून कोळयांच्या क्रांतीकार्याला नवी दिशा मिळाली. ती म्हणजे सावकारी करणाया वाण्यांवर हल्ले आणि त्यांच्या किर्दी, खतावण्या, कर्जरोखे जाळणे, यावरुन असे दिसते की सावकार लोक आदिवासी कोळी समाजाची प्रचंड लूट करत होते रामजी भांगरेनंतर त्यांचा मुलगा राघोजी भांगरे देवगावची पाटीलकी सांभाळत होता.

''अहमदनगर जिल्हयातील अकोले परिसरातील रामा किरवा याला पकडून नगर येथे 1830 साली फाशी दिली. हा महाराष्ट्रातील पहिला हुतात्मा होय.''[2] रामा किरवाला फासी दिल्यावर महादेवकोळी क्रांतीकारकांना दहशत बसेल असे इंग्रजांना वाटत होते. रामजी भांगरे यांचा मुलगा राघोजी भांगरे उठावात सामील होऊ नये किंवा नवी टोळी उभाऊ नये यासाठी त्याला सरकारने बडया नोकरीवर घेतले. त्याला बरीच आमिषे दाखविली पण सरकारी नोकरीत मानभंग, वचनभंग, कटछाट यामुळे तो चिडला व त्याने सरकारी नोकरीला लाथ मारुन क्रांतिकार्यात उडी घेतली.

सन 1828 मध्ये शेतकयांचा शेतसारा वाढविण्यात आला तत्पूर्वी शेतकरी हा शेतसारा हा शेतीची अवजारे, बैल जोडयांची संख्या याप्रमाणे नांगरपट्टी पध्दतीने भरत असत परंतु इंग्रजांनी ही पध्दत बदलून शेतसारा महसुली दराने वसुल करण्यास सुरुवात केली. अशा महसुल पध्दतीमुळे गरीब आदिवासींना रोख पैशाची गरज भासू लागली व ते सावकार, वाण्यांकडून भरमसाठ कर्ज घेऊ लागले. कर्जाच्या मोबदल्यात चांगल्या प्रतीच्या जमीनी घेऊन सावकार लोकांना नागवू लागले होते. यामुळे सन १८३८ मध्ये रतनगड व सनगर किल्ल्याच्या परिसरात इंग्रज व सावकारशाही विरुध्द आदिवासी महादेव कोळी यांनी उठाव केला व उठाव दडपण्यासाठी कॅप्टन मॅकिन्टोशने हरतहेचे प्रयत्न केले पण त्याला यश आले नाही.

ठाणे गॅझेटियर्सचा जुन्या आवृत्तीमध्ये ''१८४३ मध्ये राघोजी मोठी टोळी घेऊन घाटावरुन खाली उतरला आणि त्याने दरोडे घातले.'' असा उल्लेख आहे. अहमदनगरच्या गॅझेटियर्समध्ये राघोजीने मारवाडयांवर छापे घातले.[3] त्यांनी राघोजीविरुध्द पोलिसांत तक्रार केली. पोलिसांनी तपास सुरु करुन राघोजीच्या आईकडे राघोजीचा ठावठिकाणा विचारला तिने माहिती दिली नाही. त्यामुळे चिडून जाऊन पोलिसांनी त्याच्या आईचे निर्दयपणे हाल केले. त्यामुळे संतापलेल्या राघोजीने टोळी उभारुन नाशिक, नगर जिल्हयामधून इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले हाती लागलेल्या प्रत्येक मारवाडयाचे नाक, कान कापून टाकले राघोजीच्या भयाने खेडयातील मारवाडी गावे सोडून पळाले असा उल्लेख सापडतो.[4]

राघोजीच्या उठावाच्या आधीचा उठाव हा उमाजी नाईकाचा होता. त्याला पकडण्यासाठी दहा हजार रुपयाचे इनाम होते. राघोजीनंतर झालेल्या वासुदेव बळवंत फडकेच्या उठावासाठी तीन हजार रुपयाचे इनाम होते मात्र मात्र राघोजी भांगरेला पकडण्यासाठी चार हजार रुपायाचे इनाम सरकारने

जाहीर केले होते आजच्या हिशोबाने ते चार लाख होतील हे लक्षात घेतले तर राघोजीसाठी लावलेले चार हजार रुपायाचे इनाम किती मोठे होते आणि त्याच्या क्रांतीकार्यामुळे इंग्रजांपुढे किती मोठे आव्हान उभे केले होते. याचा अंदाज येईल असे असतांना राघोजी भांगरे यांच्यावर फारसे लिहिले गेले नाही. परंतु मौखीक रुपाने आजही अनेक वृध्द माणसे त्यांच्या बंडाची माहिती सांगतात अनेक महिला जात्यावर दळतांनी राघोजी ज्या उठावाविषयी ओव्या गातात. ''राघोजी भांगरे यांच्या उठावाविषयी माहिती घेत असतांना माझी मुलाखत गोविंद भागा गवारी यांच्या बरोबर झाली. हे सत्याऐंशी वर्षाचे रिटायर्ड पोलिस जमादार आहेत त्यांनी सांगितले की राघोजीने नाशिक शहरामध्ये लुट केली त्यावेळी त्याच्या साथीदारांनी नवरा–नवरीचे सोंग करुन पुढे वरात व मागे सावकारांना लूटले ते गरीब लोकांना त्रास देत नसत. जे सावकार लोकांना त्रास द्यायचे त्यांनाच लूटायचे.''[५]

नोव्हेंबर १८४४ ते १८४५ या काळात राघोजीचे क्रांतिकार्य शिगेला पोहचले होते. राघोजीच्या उठावानंतर २५ वर्षांनी वासुदेव बळवंतचा उठाव झाला मग वासुदेव बळवंत फडके हा आद्य क्रांतिकारक ठरला कसा यावरुन लक्षात येते की इतिहास चूकीच्या पध्दतीने लिहिला गेला खरा इतिहास पुढे येणे गरजेचे आहे असे मला वाटते.

शौर्य नितीमत्ता या गुणाबरोबरच ईश्वरी शक्ती व धार्मिक श्रध्दा यावर राघोजीचा विश्वास होता देवजी आव्हाड हा त्याचा प्रमुख सल्लागार होता देवजीला दिव्यदृष्टी होती असे म्हणतात त्याने दिलेला सल्ला राघोजी मोठया कटाक्षाने पाळत असे मे १८४५ मध्ये झालेल्या चकमकीत देवजी आव्हाड ठार झाला. देवजीच्या मृत्युमुळे त्याचा सल्लागार व अध्यात्मिक गुरु हिरावला यानंतर राघोजीचे क्रांतिकार्य झापाटयाने मोडले गेले. त्याचप्रमाणे लोकांची एकजुट मोडण्यासाठी इंग्रजांचे हरतहेचे प्रयत्न करत होते. राघोजीला ठाऊक होते की आपल्याला आपल्याच माणसाकडून घात होऊ शकतो शेवटी तेच झाले पंढरपूर येथे इंग्रज अधिकारी कॅ. गेल यांनी राघोजीला चंद्रभागेच्या काठी अटक केले.

राघोजीला साखळ दंडाने बांधून ठाण्याला आणले तेथे स्पेशल न्यायधिशासमोर त्यांच्यावर राजद्रोहाच्या खटल्याची सुनावणी झाली. एका पारसी वकीलाने आपले आरोप पत्र घ्यावे असे त्याला वाटत होते परंतु वकीलाने नकार दिल्याने राघोजीची बाजू न मांडली जाताच एकतर्फी सुनावणी झाली राघोजीला दोषी ठरविले गेले त्याला फाशीची सजा ठोठावण्यात आली. राघोजी हा वीर पुरुष होता. ''फाशी देण्यापेक्षा तलवारीने किंवा बंदूकीने वीर पुरुषासारखे मरण द्या असे त्याने न्याधिशाला सांगितले पण कंपनी सरकारने ते न ऐकता २ मे १८४८ रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृहात या थोर क्रांतिकारक राघोजी भांगरे यांना फासावर दिले. ''ठाणे मध्यवर्ती कारागृहामध्ये असणाया स्तंभावर झालेल्या हुतात्म्यांमध्ये राघोजी भांगरेचे नाव पहिल्या रांगेत कोरले आहे.''[६]

वालजी भांगरेपासून ते रामा भांगरे आणि राघोजी भांगरे अशा तीन पिढयांचा जाज्ज्वल्य इतिहास हा आदिवासी महादेव कोळी समाजाचा खरा इतिहास आहे कारण त्यांनी दिलेला लढा या समाजाच्या न्याय, हक्कासाठी व अन्यायाविरुध्द प्रतिकार होता आणि आजच्या एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असतांना हया समाजाचा किती विकास झाला किंवा नाही या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पुन्हा एकदा इतिहासाचे पुर्नलेखन होण्याची गरज आहे तरच या समाजाला आत्मभान येईल असे मला वाटते.

संदर्भ ग्रंथसूची

प्राथमिक साधने

अ) मराठी

१. वाड, ग. चि., थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, भाग– १ डेक्कन व्हर्नावयुलर ट्रान्सलेशन सोसायटी पुणे, १९११.

ब) मुलाखत

१. गवारी, गोविंद भागा, वय ८७, लाडगाव ता. अकोले दि. २४ जानेवारी २०१४.

क) दुय्यम साधने

१. कुलकर्णी, वि.अ., ठाणे जिल्हा स्वातंत्र्य आंदोलन (अप्रकाशित प्रबंध), २००६.

२. गजे, शां. स., धोंगडे नि. भि., बाडगीची माची, चंद्रदोय प्रकाशन, अकोले, ऑगस्ट २०१३.

३. गारे, गो. मो., सहयाद्रीतील आदिवासी महादेव कोळी, आदिम साहित्य प्रकाशन, पुणे, १९७५.

४. पिचड, न. भ., पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील महादेव कोळी समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास, (अप्रकाशित प्रबंध), १९९३.

५. सहस्त्रबुध्दे, अ. न., अहिणकुल, परिमल प्रकाशन, पुणे, १९८६. ७.

६. Ghurue, G.S., The Mahadev Kolis, 1957, Popular Prakashan Bombay, Second Impression October, 1963.

ड) नियतकालिक

१) भिडे, वरुनराज, (संपादित), डॉ. कुमार, सप्तर्षी, सहयाद्री दिवाळी अंक, १९९६.

२) शेवाळे, वि.म., उज्ज्वल उदयासाठी, त्रैमासिक क्रांतिसेनानी राघोजी भांगरे विशेषांक, जून २०१३.

प्रादेशिक पक्षाचे बदलते स्वरुप आणि आघाडीच्या शासनातील पक्षांचे राजकारण

डॉ. बी. व्ही. डोंगरे (पाटील)

राज्यषास्त्र विभाग प्रमुख माधवराव पाटील महाविद्यालय,पालम ता.पालम जि.परभणी

गेल्या दहा बारा वर्षांत भारतीय राजकारणात तसेच भारतीय राजकीय पक्ष पध्दतीत आश्चर्यकारक व धक्कादायक बदल होत आहेत अर्थात हे बलद सुधारणाच दर्शविणारे नाहीत तर , त्यापैकी काही बदल विकृतीचे घोतक ठरावेत. राजकीय दोषांची लक्षणे ठरावित असे बदल आहेत हे बदल आश्चर्यकारक ना धक्कादायक आहेत कारण राजकारणातील आणि पक्ष पध्दतीतील या बदलाबाबत निश्चित अंदाज बांधवा येत नाही, की या बदला संबंधी विश्वासही असे प्राककथन वा भाकीत करता येत नाही. याबदलाना राजकीय परिभाषेत अथवा राजकीय सुचनानही मांडने अवघड झाले आहे. या राजकीय बरलाची जागा जर राजकीय परिवर्तनाने घेतली व राजकरणाला व पक्षपध्दतीत विधायक वळण लागले तरी अशी घटना खचितच स्वागताई ठरेल.

वर्चस्वाचे पर्व संपले –

स्वातंत्र प्राप्तीनंतर बरेच वर्ष भारतात एका पक्षाचे वर्चस्व असलेंली बहुपक्ष पध्दती अस्थित्वात होती. कॉग्रेस पक्षाच्या तुलनेत दुर्बल व निष्प्रभ अशा तुकडेवजा पक्षाची संख्या भरपुर होती. पक्षाचे हे संख्याबळ आहे तसेच आहे : अर्थात काही पक्षाची मोडतोड होउन नवे पक्ष अस्तित्वात येत आहेत, पण एका पक्षाचे वर्चस्व असलेली पक्ष पध्दती गेल्या पाच वर्षात संपुष्ठात आली आहे. काही घटक राज्यात अजुनही प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व असले तरी राष्ट्रीय पक्षानी प्रादेशिक पक्षाशी हात मिळवणी करुन काही प्रादेशिक पक्षाच्या राजकीय प्रभावाखाली असलेल्या प्रदेशात चंचु प्रवेश केला आहे. उदा. भारतीय जनता पक्षाने आंध्र प्रदेश मध्ये तलगु देशम , पश्चिम बंगाल मध्ये तृणमुल कॉग्रेस तर तामिहनाडुत अन्ना द्रमुख पक्षाशी समझोते करुन त्या भागात आपला प्रभाव प्रस्थापित करण्यासाठी राजकीय तडजोडी केल्या आहेत. प्रादेशिक पक्षाला शनकीय वर्चस्ववाला ही ब–याच प्रमाणात शट बसली आहे भारतीय राजकारणातील राष्ट्रीय व प्रादेशिक वर्चस्वाचे पर्व संपुष्ठात जरी आले नसले तरी आन हे राजकीय वर्चस्व ब–याच प्रमाणात कमी होत आहे. लोकशाहीतील राजकीय प्रक्रियेत राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षाचा सरभाग वाढकास या बरलामुळे साटाका झाले आहे. राजकीय वर्चस्वाला शट असली की आघाडीचे शासन अस्तित्वात येत व राजकीय प्रक्रिया राजकीय मकनेरारीयुक्त निमंत्रणातुनच मुक्त होते म्हणुनच लोकशाही दृष्टीने हा बदल स्वागतार्ह म्हटला पाहिजे. कारण संख्या बळीमुळे जे लहान लहान पक्ष रुळाधरी पक्षाचीच नव्हे तर , विरोधी पक्षाची भुमिका स्तबळावर वाढवु शकत नव्हे ते लहान लहान स्थानिक व प्रादेशिक पक्ष रचे व सहभागी झालेले आहेत आघाडीचा शासनात महत्वाची भुमिका बजावत आहेत परिपात्रत: प्रादेशिक पक्षाचा राजकीय पक्षात व राजकीय सौरे बाजी करण्याची क्षमता वाढलेली आहे. अर्थात या राजकीय सौदेबाजीतुन आघाडीच्या शासनात स्थैर्य व अस्थैर्य निर्माण होण्याची शक्यताही वाढलेली आहे.

स्वरुपात बदल –

अजिकडे प्रादेशिक पक्षानी जहाळ प्रादेशिक वादाचा त्याग केला आहे प्रादेशिक पक्ष विशिष्ठ प्रदेशाबद्दल प्रेम व आस्था बाळगुन असले तरी हे पक्ष प्रादेशिक हिता बरोबर राष्ट हिताबद्दल ही आस्था बाळगतात प्रसंगी प्रादेशिक हितापेक्षा राष्ट्हिताला प्राधान्य यव महत्व देतात कारण हे प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय आघाडीत सामील झालेले असतात व केव्हा शासनातही जबाबदाराची भुमिका वाढवित असतात. उदाहरणार्थ राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील

तृणमुल कॉग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी पश्चिम बंगालमध्ये रेल्वे मार्गाचा विस्तार करण्याची प्रादेशिक मागणी करतील दृ पश्चिम बंगालसाठी मागण्याच्या एक विधायक कार्यक्रम पुढे मांतील पण त्याच बरोबर केन्द्र शासन स्थिर शासन व सामर्थ संपन्न शासन असावे असे शासन राष्ट् हितासाठी व राष्ट् हितासाठी व राष्ट्रीय प्रगतीसाठी आवश्यक असते असेही वेळोवेळी सुमित करतील . महाराष्ट्रातील शिवसेना माहराष्ट्राची प्रादेशिक अस्मिता व त्यासंबंधीचा प्रादेशिक अभिनवेश वेळोवेळी फक्त करतील पण प्रादेशिक मिळे पेक्षा हिन्दुत्वावरील राष्ट्निष्ठा कृतीमध्ये व उकतीमध्ये व्यक्त करण्याचा प्रयत्न करते अर्थात प्रादेशिक हिताचा व्यापक दृष्टिकोनातुन विचार करु शकतात हे राजकीय स्वाथार्रने प्रेरित होउन राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पाठिंबा देणा—या तेलगु देशमने दाखवुन दिले तेलगु देशम पक्षाचे हित घटक राज्याची सत्ता या दोन उद्देशाने साध्य करण्यासाठी तेलगु देशमचे चंद्रबाबु नायडु संधी साधुपनाचे यशस्वी राजकीय डावपेच लढवत असतात.

प्रादेशिक वादाचे बदलते स्वरुन —

भारतीय समाज व्यवस्थेत प्रादेशिक वाद विवाद प्रकारचे मुखवटे व बुरखे घालुन वावरने असावे कठि प्रादेशिकवार सुष्ठ स्वरुपात असावे वर कोठे तो उघड उघड व्यक्त झालेला असतो कोठे कोठे प्रादेशिक वाद सांप्रदायिक शकती प्रवाराबरोबर असतो. एकाम वेळी संप्रदापईक व प्रादेशिक भुमिका वठविणारे पक्ष विशिष्ट संप्रदायबद्दल वसेल तो संप्रदाईक आणि प्रादेशिक हिसंवर्धचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात पण असे पक्ष केन्द्रातील प्रभावशाली राष्ट्रीय पक्षाबरोबर किंवा पक्षाच्या आघाडहबरोबर चांगले संबंध प्रस्तावित करुन आपल्या पक्षाचा, संप्रहामाचा व आला भुभागाचा राजकीय आर्थिक व भौतिक ककामरा क्रस्त घेत असतात. उदा. जम्मु — काश्मिर मधला नॅशनल कॉन्फरन्स, पंजाब मधील आकाली दल, व महाराष्ट्रातील शिवसेना हे पक्ष भारतीय समानातील समाजिक व आर्थिक विकासाच्या प्रश्ना भोवती राजकारण करतात . अशा पक्षांना सुधारलेल्या व मागासलेल्या भागातील लोकच्या राजकीय जागरुकतेचा कामश मिळतो. अशा पक्षाचे नेते राजकीय स्वार्थ व रुचकांना याची पुर्तता करण्यासाठी प्रादेशिक प्रश्नाचा वापर राजकारणात करतात . राष्ट्रीय पक्षांना भारतातील भिन्न व जटील अशा अन्य जमातीच्या समस्या सोडविण्यात अपयश आल्यास अन्य जमातीचे प्रादेशिक असमतोलातुन निर्माण झालेले प्रश्न हाती घेउन आंदोलनाचे राजकारन करतात. व राष्ट्रीय पक्षावर विशिष्ट प्रदेशाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले विशिष्ट घटक राज्य व प्रदेश उपेक्षित राहिले असा आरोप करुन प्रादेंशिक पक्ष विकासाचा राजकारणात सहभागी होतात.

प्रादेशिकतेचा आधार —

राष्टीय व प्रादेशिक पक्षांना विविध भागात राजकीय प्रभाव वाढविण्यासाठी व संघटनात्मक सामर्थ वाढविण्यासाठी विविध प्रादेशिक हितांचे प्रश्न हाताळावे लागतात. अशा वेळी नद्याच्या पाण्याच्या वाटपा संबंधीचे विविध घटक राज्यातील प्रश्न, घटक राज्याच्या सीमा संबंधीचे प्रश्न, वीज निर्मिती व वीज वाटपा संबंधीचे प्रश्न नवे घटक राज्याच्या निर्मिती संबंधीचे प्रश्न ककेवळ लोकरंजनाच्या मागण्यांना उचलुन धरुन विविध प्रदेशातील लोकसमुहाचा अनुभव करण्यासाठी राष्ट्रीय मिनानी प्रवृत्तीने राष्ट्वादी भुमिका घेतात. केन्द्रशासनात सत्तेत सहभागी झालेले पक्षाचे नेते राष्ट्हिताशी संबंध विषय व त्यासंबंधीचे महत्वाचे मंमालम आधिक जबाबदारीने सांभाळत आहेत म्हणुनच मतदार राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष यात फार मोठा ुरक न करता त्यांच्या समस्यांना लोकसभेत व विधान सभेत निवडुन देत असतात. सारांश, घटक राज्यात प्रादेशिक पक्षांना स्थान असावे आणि केन्द्रशासनात राष्ट्रीय पक्ष असावेत या तर्काला आज स्थान उरलेले नाही भविष्य काळात केन्द्रातील शासनास एखाद्या प्रादेशिक पक्षाचा नेता

देखील पंतप्रधान होउ अर्थात नजिकच्या काळात राष्ट्रीय पक्षाचे सामर्थ कमी होण्याची शक्यता नाही. राष्ट्रीय पक्षा प्रमाणेच प्रादेशिक पक्षानाही चांगले नेतृत्व लाभलेले आहे. लोकांच्या या नेतृत्वावर विश्वास वाढलेला आहे. प्रादेशिकता व राष्ट्रीयता याचा आधार घेणारे राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष आत प्रादेशिकयवादाचा निषेध करीत नाहीत प्रादेशिक हिताचा विकार सर्व पक्षानां करावयाचा लागेल अशी परिस्थीती आहे.

विश्वासार्हता वाढली –

१९८९ मध्ये ख–या अर्थाने केंद्र शासनात आघाडीचे शासन व समिश्र मंत्रिमंडळ अस्तित्वात आले त्या वेळी प्रादेशिक पक्षांनी केंन्द्र शासना: सते सहभागी होण्याची संधी ओंळखली अर्थात १९६७ मध्ये घटक राज्यात राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांना सत्ता उपभोगण्याची संधी मिळाली होती पण केद्र शासनातील सत्ताधारी पक्षाने अशा संमिश्र मंत्रीमंडळाला राज्यकारभार करण्यात अडथळे आणले एवढेच नव्हे तर संमिश्र मंत्रिमंडळ अपयशी ठरण्यात , त्याचे पतन होण्यास जसे आघाडीचे घटक पक्ष जबाबदार होते त्याच प्रमाणे अशा आघाडी कोसळुन टाकण्यात केंद्रशासनातील सत्ताधारी पक्षाने उपद्रव कारक भुमिका बजावली त्यावेळी मजुरांना हे कळुन चुकले की राष्ट्रीय पक्ष देखील बेजबाबदार व उपद्रव कारक भुमिका बजावु शकतात व परिणामत: राष्ट्रीय पक्षाची विश्वासार्हता मतदारात नष्ट झाली किंवा काही प्रमाणात कमी झाली आलिकडल्या काळात काही प्रादेशिक पक्षाचे नेते व प्रादेशिक पक्ष संघटना केंद्रशासनात व घटक राज्यात जबाबदारीने व विधायक स्वरुपाची भुमिका बजावत आहेत म्हणुन या पक्षाचा प्रभाव राष्ट्रीय पक्षापेक्षा घटक राज्यात वाढला आहे उदाहरणार्थ आंध्रप्रदेश तेलगु देशम कॉंग्रेस पक्षाला निवडणुकीत पराभुत करुन तेथे आपली सत्ता आणि प्रभाव दृढमुळ करीत आहे तेथे भाजपा आणि कॉंग्रेस सारख्या राष्ट्रीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्षाचीच विश्वासार्हता जास्त आहे. म्हणुन राष्ट्रीय पक्षानी आता आत्मपरीक्षन केले पाहिजे व राष्ट्रीय पक्षानी देशातील सर्व भागात आपली विश्वासार्हता वाढविण्यासाठी जबाबदार विधायक भुमिका सर्वत्र बजावली पाहिजे.

मतैक्य व सहभाग –

भारतीय समाज बहुजिनसी समाज आहे ज्यात विविध प्रकारचे राजकीय शारकीप्रवाह विविध स्तरावर व विविध क्षेत्रात कार्यरत आहे. जात, धर्म, प्रदेश, आणि भाषा यांनी विभागलेंल्या या समाजात मतैक्यापेक्षा मताधिक्यांना जास्त प्रमाणात आहे. पण भारतीय पक्ष पध्दतीत दोनच वर्तनक्रम आढळतात. एक म्हणजे सत्ताधारी पक्षामध्ये एक राजकीय संस्कृती असते, तर विरोधी दुसरी राजकीय संस्कृती असते.

१. सत्ताधारी पक्ष किंवा सत्ताधारी पक्षात राज्यकारभार सर्वस्वी आपली भुमिकाच महत्वाची आहे अशी सत्ताकांक्षी भुमिका असते तर विरोधी पक्षांना विरोध करणे हे आपले महत्वाचे कार्य असे त्यांना वाटते . परीणामत: जनता व राजकीय पक्षाचा दिखावु नव्हे तर वास्तविक सहभागावर आधारलेले मतैक्य राष्ट्रीय प्रश्नावर घडवुन आणले आवघड होउन बसते. एखाद्या पक्षाच्या हाती मक्तेदारी युक्त सत्ता असेल तर असा पक्ष राज्यकारभारात जनतेचा व विरोधी पक्षाचा सहभाग असतो असे गृहीत धरावयासही तयार नसतो. आघाडीच्या शासनात सर्व समंतीने व मतैक्यातुन राज्यकारभार चालला पाहिजे कारण लोकशाही म्हणजे संमतीवर आधारलेले शासन होय. लोकशाहीत एकच पक्ष बहुमतात असो अनेक पक्षांनी मिळुन आघाडीत बहुमत प्रस्थापीत केलेले असो. शासनाने हे कटाक्षाने पाहिले पाहिजे की, सार्वजनिक व्यवहारात लोकमताचा, अल्पसंख्याकाच्या मनाचा विरोधी पक्षाचा व बहुसंख्य सामान्य लोकांचा आदर केला पाहिजे.

२. फार काळ सत्ता उपभोगणा—या पक्षाने आपण राज्यकारभार करु शकतो अशा अहंगंडाने कोणत्याही पव्रश्नावर भुमिका घेउ नये. प्रादेशिक पक्षाने नेतृत्व – भारतीय राजकारणात प्रादेशिक नेतृत्वाचे आव्हान ही घटना अलिकडच्या काळातील नाही. स्वातंत्रप्राप्ती नंतर १९५७ मध्ये कॉग्रेस पक्षाला केवळ प्रादेशिक अधिष्ठात असलेल्या प्रादेशिक पक्षाकडुन राजकीय आव्हान मिळाले १९५७ मध्ये आसाम मध्ये गणतंत्र परिषद प्रभावशाली ठरली.

३. पण त्यावेळी कॉग्रेस पक्षाने प्रेादेशिक वादाचा व प्रादेशिक पक्षाचा निषेध केला व प्रादेशिक पक्ष व प्रादेशिक वार हा राष्ट्रीय एकातेच्या मार्गातील प्रमुख अडथळ मानला. पण प्रादेशिक नेत्याचे जेथील जनतेशी असलेला घनिष्ठ संबंध प्रादेशिक प्रश्नाबाबतची त्याची जनहित दक्ष भुमिका याचा विधायक दृष्टिने कॉग्रेस पक्षाने विचार करण्याऐवजी सर्व भारतीय भागात आपले राजकीय वर्चस्व कसे प्रस्थापित होईल, विरोधी नेतृत्व कसे दुर्बल व निष्प्रश्न होतील या दृष्टीने राजकीय डावपेच आखले कॉग्रेसचा हल्ला प्रादेशिक नेतृत्वावर होत.

नेतृत्वाचा आधारची मर्यादा – अलिकडच्या काळातच नव्हे तर स्वातंत्रप्राप्ती नंतर राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षात ध्येयधोरण व कार्यक्रम यापेक्षा नेतृत्व या घटकाला महत्व मिळाले पण काही प्रादेशिक पक्षाच्या बाबतीत तेथे प्रादेशिकतेची भावनाच प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आणण्यास कारणीभुत ठरली. उदा. १९८२ मध्ये आंन्ध्रप्रदेशात तेलगु देशम व १९८५ मध्ये आसाम गणतंत्र परिषद हे नवे प्रादेशिक पक्ष आस्तित्वात आले त्यावेळी राजकीय अनुभव नसलेल्या नेतृत्वाच्या प्रभावाखाली होते.

४. पण अलिकडच्या काही काळात पक्षांतर्गत नेतृत्वाखाली आधिक महत्व प्राप्त झालेले आहे भारतीय जनतापक्षाने अटलबिहारी वाचपेयी हयांना भावी पंतप्रधान म्हणुन निवडणुकीत घोषित केले दृ तर कॉगेसपक्षाने सोनिया गांधीन भावी पंतप्रधान म्हणुन सार्वत्रिक निवडणुकीत सोनिया गांधीचे नेतृत्व जनतेसमोर आणले. १९७१ पासुनच भारतीय जनतेने नेतृत्व या घटकालाच महत्व दिले आहे पक्षाला स्विकारणे अथवा नकारणे हे पक्षाच्या नेतृत्व मुल्यमापना नुसार ठरले १९७१ च्या सुमारास झालेल्या निवडणुकीत भारतातील लोकांनी दाखवुन दिली की, त्यांनी जाणीवपुर्वक किंवा हे पुरस्कृत आपली राजकीय पसंती समाजवादी घोषणा देणा—या पक्षांना दाखविली नाही. तर स्थैर्य व द्रतगतीने प्रगती यांची हमी देणा—या इंदिरा गांधी सारख्या नेत्यांना दाखवली.

५. भारतीय लोक राजकीय पक्षाचे ध्येय धोरण कार्यक्रम या पक्षा त्या पक्षाच्या नेतृत्वाला अधिक महत्व देतात. पक्ष संघटनेपेक्षा नेता मोठा , ही प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षाचीच भुमिका नाही तर जनतेचही भुमिका आहे म्हणुन कॉग्रेस पक्षाने सोनिया गांधी सारख्या राजकीय अनुभव नसलेल्या पन नेहरु घराण्याचे तजोवळयाचा वारसा सांगणा—या सोनिया गांधीना नेतृत्व परी आणले. इंदिरा गांधीची सुन व राजीव गांधीची पत्नी या पेक्षा सोनिया गांधीना कोणताही राजकीय वारसा नाही प्रादेशिक पक्षावर पक्षाचा नेताच मोठा मानला जातो. म्हणुन पक्ष हा नेत्याच्या शोधात असतो अर्थात असे म्हटले जाते की ज्या देशाला नेता नसतो तो देश दुर्दैवी ठरतो ज्या पक्षाला नेता शोधावा लागतो त्या पक्षासारखा दुर्दैवी राजकीय पक्ष दुसरा नाही . म्हणुनच चालेल मेरियम यांच्यामते राजकीय पक्षात जास्त महत्व नेत्यांना असणे कार्यकर्त्यामध्ये लोकप्रीय असलेले, उत्साही व समार्थवान नेते असतील तर पक्षाचे सामर्थ वाढले व पक्षातील नेते उदासिन, दुर्बल विभागलेले व एकाकी पडलेल्या गटातील असतील तर त्या पक्षाची वाताहत होते.

निष्कर्ष –

भारतीय राजकारणात ज्या प्रवृत्ती आजकाळी दिसतात त्यांचा परिणाम राष्ट्रीय व प्रोदशिक पक्षाच्या कार्यपध्दतीवर व त्यांच्या राजकीय भुमिकावर होती. अलिकडच्या भारतीय राजकारणात चार ठळक वैशिष्ट्ये आढळतात. १. निवडणुकीमध्ये कोणतेही लाट अथवा भावनिकता याचा अभाव आहे. २. जनतेला भेडसावणा–या समस्या एकत्रितपणे राजकारणात विचारत घेतल्या जातात. ३. आर्थिक उदारीकरणाला फारसा कोणाकडुन विरोध होत नाही. ४. भारतीय जनमानसातील परंपरवादी मनोवृतीत हळुहळु बुध्दिवादी प्रवृत्ती संक्रमित होत आहे. ७. सारांश भारतीय राजकारण आधिक आधिक व्यवहार्यवादी, समस्या प्रधान आणि बुध्दिवाद प्रवृत्तीने युक्त असे होत लागले आहे म्हणुन आघाडीच्या शासनात राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष परस्पर सहकार्य व परस्पर सामंजस दाखवित आहेत अर्थात राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांना राष्ट्रीय प्रश्नावर मतैक्य व जनतेची संमती प्राप्त करुन घ्यावी लागेल व जनतेलाही आघाडीतील पक्षाच्या भुमिकेवर निमंत्रण व देखरेख ठेवावी लागते कारण आघाडीतील शासन कारभारातील राजकारणाला सामाजिक व राजकीय पातळीवर मतैक्य वा सर्व संमती पहिले. जर आघाडीचे शासन केवळ राजकीय व्यवस्था असेल तर आघाडीच शासन ही एक आत्मवस्थक आपलीच ठरेल . आणि जनतेच्या उत्साही मनोवृत्तीचा आघाडीच्या राजकारणात स्पर्श झाला नसेल तर आघाडीच्या शासनाचे राजकारण केवळ आपली जनक ठरेल अशा वेळी संतुलित राजकीय संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी राजकीय जागरुकता जनहित राजकीय दक्षता जनतेला दाखवावी लागेल. ८. म्हणुन जागरुक जनहित दक्ष जनतेच्या आशा आकंक्षा लक्षात घेउन राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षाला कार्य करावे लागेल.

निष्कर्ष –

आघाडीच्या शासनातील राजकारणाच्या दबावाखाली व निमंत्रणाखाली राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांना काही अंशी परिवर्तन स्वीकारण्यात भाग पाडले आहे. राष्ट्रीय पक्ष आता प्रादेशिक पक्षांना काही अंशी परिवर्तन स्वीकारण्यात भाग पाडले आहे. राष्ट्रीय पक्ष आता प्रादेशिक पक्षांना दुय्यम व दुदैव घटक म्हणुन त्यांची अवहेलना करु शकत नाहीत. राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर चांगले नेते हवेत अशी भावना राष्ट्रीय पक्षात निर्माण होत आहे. पक्ष संघटनेवर श्रेष्टीचे वर्चस्व हा घटक राजकीय पक्ष संघटना ख–या अर्थाने संघात्मक बनविण्यात फार मोठा अडथळा आहे. संघशासनात पक्ष संघटना हया देखील संघटनात्मक दृष्ठया संघ स्वरुपाच्या असाव्यात व राष्टीय पक्षाना देखील आपले प्रादेशिक आधार भक्कम करण्यासाठी प्रादेशिक हितसंबंध व प्रादेशिक कार्यक्रम हाती घ्यावे लागतील याची पुसटशी कल्पना आळी आहे.

प्रादेशिक पक्ष आता आधिक जबाबदार , संयमी व व्यापक दृष्टिकोनातुन केंद्रीय मंत्रिमंडळात आपली भुमिका बजावु लागवे आहे स्थैर्य हे राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर प्रस्थापीत झाले पाहिजे व राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीतुन जनतेच्या हिताचे व राष्ट्राच्या हिताचे संवर्धन व संरक्षण झाले पाहिजे राष्ट्र व प्रदेश याच्यातील द्वंद्व कमी होण्यास आघाडीच्या शासनाचे राजकारणच फारशी जबाबदार ठरले आहे बहुजिनस समाजातील लोकशाही प्रक्रीया अनेंक पक्षाच्या राजकीय सहभागातुन साकार होते. राजकीय सत्तेची मक्तेदारी राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर अधिकारशाही प्रवृत्ती निर्माण करणे भय भ्रष्टाचार व हिंसाचार यांना राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षात सहकार्य व सुसंवाद प्रस्थापित झाला पाहिजे समान राजकीय व आर्थिक कार्यक्रमच ताठर तत्वप्रणालीपेक्षा जास्त फायद्याचे ठरतात हे आघाडीच्या शासनाच्या प्रयोगातुन सिध्द झाले.

मराठीतील मुस्लिम लेखकांची आत्मचरित्रे :-लेखन प्रेरणा

प्रा. डॉ. केतकी प्रमोद भोसले

१९८० नंतर मोठ्या प्रमाणात मुस्लिम मराठी साहित्य लिहिले जाऊ लागले. मराठी साहित्याच्या जवळपास सर्वच साहित्य प्रकारात मुस्लिम मराठी साहित्य लिहलेले आढळून येते. यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन, आत्मचरित्र यांचा समावेश होतो. हे सर्व प्रकार कमी अधिक प्रमाणात लिहिले गेले असले तरी मुस्लिम मराठी साहित्यकांनी कविता हेच आपल्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम मानले आहे.

आज मराठीतून असंख्य मुस्लीम लेखक लिहित असून ते स्वत:च स्वत:हाच्या समाजजीवनाचे चित्रण आपल्या साहित्यातून मांडू लागले आहेत. आधुनिक शिक्षण प्रसाराने मुस्लीम समाजात एक मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रबोधनवादी चळवळीच्या प्रभावाखाली आलेला दिसतो. आपला समाज जसा आहे, तसा तो मराठी साहित्यातून चित्रित झालेला नाही. आपणच आपले साहित्य लिहिले तर, या प्रेरणेतून काही लेखक पुढे आलेले दिसतात. त्यासाठी प्रथम हमीद दलवाई यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते याशिवाय डॉ. यू. म. पठाण, मुमताज रहिमतपुरे, राजन खान, जावेद कुरेशी, रफीक सूरज मुल्ला, आणि प्रा. शहाजिंदे या नावांचा उल्लेख करावा लागेल. यांनी आपल्या साहित्यकृतीतून आपल्या मुस्लीम समाजाचे, मुस्लीम मानसिकतेचे, प्रभावी दर्शन घडविले आहे. तसेच ग्रामीण बलुतेदारी, समाज जीवनाशी निगडित असलेली मुस्लिम मंडळी मराठी साहित्यातून चित्रित झाली पाहिजेत, या हेतूने अनेक साहित्यिक, कवी, लेखक, मुस्लीम साहित्य लेखनात उतरलेले दिसतात.

पीएच डी. संशोधनाच्या अनुषंगाने मला काही मुस्लीम आत्मचरित्रकारांची जवळून ओळख झालेली आहे. मी माझ्या या संशोधन पेपरमध्ये मला आत्मचरित्र वाचल्यावर व प्रत्यक्ष भेटी मधून जे काय अनुभव आलेले आहेत, याबद्दल थोडक्यात विचार मांडत आहे.

१९६० नंतर विविध साहित्य प्रवाह उदयास आले. विविध समूह सुद्धा लेखनातून व्यक्त होऊ लागले. आणि यामध्ये मुस्लिम मराठी साहित्याची मोलाची भर पडली आहे. मुस्लिम मराठी साहित्याचा आढावा घेता, कथा, कादंबरी, कविता, गझल, चरित्र, आत्मचरित्र, इ. प्रत्येक मराठी साहित्यप्रकारात मुस्लिम साहित्य लिहिले गेले आहे.

मराठीतील आत्मचरित्राची संख्या विपुल आहे या तुलनेत मुस्लीम आत्मचरित्राची संख्या खूपच कमी आहे. केवळ सतरा आत्मचरित्र उपलब्ध असून, या सतरा आत्मचरित्रांपैकी फक्त दहा आत्मचरित्र पुरुष लेखकांची आहेत. तर सात आत्मचरित्र स्त्री लेखकांची आहेत. त्यांच्या आत्मचरित्रातील प्रेरणा जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आत्मचरित्र लेखनामागील भूमिका सर्वच लेखकांनी मांडलेल्या आहेत आपण जे काही जगलो, जगताना जो संघर्ष केला त्याचा परिचय लोकांना व्हावा, हा हेतू सुरवातीला सर्वांनीच व्यक्त केलेला आहे त्यातील प्रमुख प्रेरणा 'आत्मशोध' असल्याचे दिसून येते.

'**माझ्या दर्यावर्दी जीवनातील भरती ओहोटी**' हे कॅप्टन फकीर महंमद जुवळे यांचे आत्मचरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. लेखनाचा प्रसिध्द काळ सन १९६० मधील असून, हे आत्मचरित्र मराठी मुस्लिम व्यक्तीने लिहिलेले पहिले आत्मचरित्र आहे. जुवळे यांनी आपली आवड म्हणून दर्यावर्दी जीवनाला आपलेसे करून सागरी जीवनाचा मनमुराद आनंद घेतलेला आहे.आयुष्यातील पंचावन्न वर्षे त्यांचे सागराशी नाते होते या काळातील आठवणींचा पट आत्मचरित्रात शब्दबद्ध केलेला आहे.

इब्राहिम खान यांनी आपल्या आयुष्यातील व्यथा वेदना लोकांसमोर याव्यात या हेतूने लेखन केल्याचे दिसते. **'मुस्लीम महार'** या आत्मचरित्रातून धर्मातरानंतरची समानतेची वागणूक न मिळाल्याने जीवनाची होणारी फरपट लेखकांनी व्यक्त केली आहे. पूर्वीच्या हिंदू धर्मातील जातीयतेचे चटके, हीन वागणूकीला कंटाळून लेखकाच्या आजोबांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला.स्वत:हाचे, व पत्नीचे नाव बदलले. उपासना पद्धत बदलली. मुस्लिम धर्माशी एकरूप झाले. पण मुस्लिम धर्मियांनी त्यांना सन्मानाची वागणूक दिली नाही. माणूस धर्मांतरामुळे दोन्हीकडून पोरका होतो. आणि असे पोरका होणे खूपच जीवघेणे असते

'जाग्या झालेल्या सावल्या' या आत्मकथनात द्वारे अजीज नदाफ यांनी आपल्या आयुष्यातील काही घटनांना प्रसंगांना शब्दबद्ध केलेले आहे या आपल्या लेखनाला त्यांनी आत्मकथा असे संबोधले आहे आपल्याच भूतकाळातील आठवणींना त्यांनी सावल्या म्हटले असून आयुष्याच्या उत्तरकाळी त्यांचे स्मरण केले आहे मल्लिका अमर शेख यांना माणूस म्हणून व्यक्तीला समान न्याय व सन्मान मिळायला हवा असा त्यांचा आग्रह आहे आपला अनुभव लोकांसमोर यावा अशा स्वच्छ भावनेने त्यांनी बेधडकपणे आपले विचार मला उद्ध्वस्त व्हायचंय या आत्मचरित्रात मांडले आहे तर मेहरुन्निसा दलवाई यांनी विचारवंत हमीद दलवाई यांचा सहवास कथन करताना त्यांच्या संदर्भातील कृतज्ञता 'मी भरून पावले' या आत्मचरित्रात व्यक्त केली आहे.

'जिहाद', या आत्मचरित्रामधून हुसेन जमादार यांनी कुराणमधील जिहाद चा अर्थ आत्मचरित्राच्या लेखनाच्या सुरूवातीलाच वाचकांसमोर मांडलेला दिसतो.

'किसी ध्येय की सिध्दी के लिए
अपनी संपूर्ण शक्ती लगा देने और
जान तोड कोशिश करने का नाम 'जिहाद' है |
'जिहाद' केवल युध्द करने का नाम नही है |
जो व्यक्ती हर समय अपने उद्देश की धुन में लगा हो
अपना धन, अपनी वाणी और अपनी लेखणी आदि से उसके लिए प्रयत्न
करता और अपने आपको थकाता हो वह वास्तव में जिहाद ही कर रहा है '|...

लेखक हुसेन जमादार यांनी आपली' जिहाद 'लेखनामागील भूमिका स्पष्ट करताना वरील अवतरणांचा प्रथमपृष्ठावर उल्लेख केला आहे .कोणत्याही कामाच्या सिध्दीसाठी, यशस्वी पूर्तीसाठी, जिवापाड, मनापासून आणि सर्व शक्तीने स्वत:ला झोकून देण्याची वृत्ती अधोरेखित केलेली दिसते .या अनुषंगाने लेखकानेही आपल्या मनातील ध्येया पर्यंत पोहोचण्यासाठी असा प्रयत्न केला आहे.म्हणूनच 'घर सुधारावे, समाजासाठी काही करावे' अशा तऱ्हेची

उर्मी मनात निर्माण झाल्याचे लेखकाने म्हटले आहे. आपण आपल्या कुटुंबियांसाठी काही करीत असताना, ज्या समाजाचे आपण घटक आहोत, त्या समाजाच्या विकासासाठी काहीतरी करावे, असे वाटण्याच्या प्रक्रियेतून या आत्माचरित्राचे लेखन झाले आहे .

'मी एक कोणीतरी' या आत्मचरित्रातून आपल्या सुखवस्तू कुटुंबाचा व आंतरधर्मीय विवाहाने दोन्ही कुटूंबातील माणसांची मने सांभाळून लतीफ मगदूम यांनी स्वत:ची आणि कुटुंबाची प्रगती केलेली आहे. या आत्मचरित्रातून सर्वसामान्य संस्कारशील कुटूंबात जन्मलेल्या लतीफ मगदूम यांच्या जीवन आणि कार्याचा परिचय होतो. 'माझ्या जीवनाचा हा बोलका आराखडा आहे वाचकांना माझे आत्मचरित्र कुठेतरी प्रेरित करेल, या भावनेने हे आत्मचरित्र लेखन झाल्याचे लेखकाने म्हटले आहे.

'दगडावरची पेरणी' या आत्मचरित्रात सय्यदभाईंनी एकतर्फी तलाकविरुद्ध पुकारलेले बंड ही मूळ लेखन प्रेरणा दिसून येते. मुस्लीम समाजातील अनेक प्रश्नांसाठी अहोरात्र झगडत असलेल्या सय्यदभाईंच्या खडतर कार्यातूनच या आत्मकथनाचा उगम झालेला दिसतो. सय्यदभाई एकतर्फी तलाकच्या विरोधात देशभर फिरत असतात .त्यावेळी त्यांना असे अनेक अनुभव आजूबाजूच्या महिलांच्या तोंडून ऐकायला मिळत असत .हे अनुभव चित्तथरारक आणि हादरून सोडणारे होते, म्हणून हे अनुभव तुम्ही पुस्तकरुपात समाजासमोर ठेवा 'असा आग्रह सय्यदभाईंच्या अनेक हितचिंतकांनी ,सहका-यानी धरला आणि त्यांच्या आग्रहातूनच ह्या आत्मकथनाचा जन्म झाला.

अब्दुल गनी अत्तरांचे **'कोकरूड ते बर्मिंगहॅम'** हे आत्मचरित्र एका विशिष्ट अशा काळीत काळातील आठवणींचे संचित आहे. लेखक रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीच्या काळापासून संस्थेशी संलग्न असल्याने, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दीर्घकाळाचा सहवास त्यांना लाभला. अण्णांवर निष्ठा व कृतज्ञता त्यांनी वारंवार व्यक्त केलेली कोकरूड या साध्या गावापासून झालेला प्रवास प्रवास बर्मिंगहॅम पर्यंत जाऊन पोहोचतो याचा इतिहास या आत्मचरित्रातून दिसतो

'क्षितिजे अपार' या हुसेन दलवाई यांच्या आत्मचरित्रातून जुन्या स्मृतींना उजाळा देण्याच्या हेतूने लिहिल्याचे लक्षात येते शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय जीवनातील आठवणींना त्यांनी शब्दबद्ध केले आहे टाकीचे घाव या आत्मचरित्रात बहुतेक आठवणी या लेखकाच्या विद्यार्थी दशेतील आहेत

डॉ. श.नू. पठाण यांचा जीवनप्रवास दोन टप्प्यांमधून आणि दोन स्वतंत्र आत्मचरित्रामधून व्यक्त झाला आहे. पहिला भाग म्हणजे **'टाकीचे घाव'** आणि दुसरा भाग म्हणजे **'वेदना आणि प्रेरणा',** वेदना स्वीकारून त्या वेदनेतून प्रेरणा घेऊन आपले स्वप्न साकार केले आहे केल्याचे वर्णन वाचकांना येते

मुस्लिम पुरूषाची आत्मचरित्रे प्रामाणिक हेतूने लिहीलेले आहेत संमिश्र समाजव्यवस्थेत आपले जगणे कसे आहे, आपला समाज कुटुंब यांचे संबंध कसे आहेत, कौटुंबिक पातळीवरील संघर्ष, व्यावसायिक स्तरावरील ओढाताण इत्यादींची नोंद आत्मचरित्रकारांनी घेतलेली आहे. सय्यदभाई व्यतिरिक्त सर्वांनी उच्च विद्या घेतलेली आहे .

मराठीतील मुस्लीम आत्मचरित्रकारांनी समाज जीवनाचा घेतलेला वेध वैशिष्ट्यपूर्ण आहे हे आत्मचरित्रकार शहर आणि ग्रामीण अशा संमिश्र स्तरांचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे मुस्लिम तसेच हिंदू समाजाचे

जीवन आणि मानसिकता समजून घेता येते. या सहजीवनाचे संस्कार घेऊन या लेखकांची जडणघडण झालेली दिसते. भाषा, पेहराव, सण-उत्सव अशा सर्वच पातळीवरील संस्कारांचे दर्शन घडवून या लेखकांनी एकात्मतेचा परिचय करून दिला आहे.

मुस्लीम आत्मचरित्रकारांनी आपल्या लेखनात मुस्लिम समाजाच्या जीवनक्रमाचे विस्तरीत चित्रण केले आसल्यामुळे नमाज, कलमा, ईद, विवाह, पीर, दर्गा, उरूस व समाजातील चालीरितींचा तपशील आत्मचरित्रात मांडलेला दिसतो.

मुस्लिम आत्मचरित्रकारांनी आपल्या परिसराबरोबरच संमिश्र समाज जीवनाचा वेध घेतला आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाचे अंतरंग मांडताना सहजीवनाचा झालेला परिणाम संमिश्र संस्कृतीचा होणारा प्रभाव विविध भागातील भाषिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांबरोबर मुस्लीम समाजाशी असलेले संबध, एकमेकांशी असलेले जिव्हाळयाचे नाते, आणि इतर धर्मियांचा लेखकांवर असलेला प्रभाव या आत्मचरित्रातून अनुभवास येतो.

महाराष्ट्राच्या विविध भागांचे प्रतिनिधित्व करणार्या या आत्मचरित्रकारांचीही मुस्लीम समाजाचे वास्तव यानिमित्ताने मांडले आहे ही सर्व आत्मचरित्रे आपल्या जीवनाचा लेखाजोखा मांडण्यात बरोबर कृतज्ञतेची भावना घेऊन लिहिलेली आहेत. आयुष्याच्या वाटेवरील बरे वाईट अनुभव मांडताना कुठेही नकाराची किंवा नैराश्याची भावना यातून व्यक्त होत नाही.

एकूणच आपण आयुष्याचा प्रवास कसा केला त्यातील अनुभव घटनाप्रसंगांचे मांडणी करून अनुभवातून आलेले चिंतन हे या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य आहे. परंपरेचा वारसा जपता नाही नव्या व्यवस्थेचा आग्रही ठामपणे करण्याची वृत्ती या आत्मचरित्रकारांनी दाखवली आहे. आपण मुस्लिम आहोत म्हणजे आपले वर्तन सर्वच इतरांपेक्षा वेगळे असायला हवं अशी भावना कुठेही दिसत नाही. उलट बहुसंख्याकांच्या बरोबर राहताना सहजीवनाचे जगणे अधिक सुंदर बनते अशी या आत्मचरित्रकारांची वृत्ती असलेली दिसते .

मुस्लीम आत्मचरित्र लेखकांचे व्यक्तिमत्त्व जीवनदर्शन याचा आढावा घेत असताना या आत्मचरित्रातून काही उत्तुंग माणसं भेटली त्यांचे कर्तृत्व,मोठेपण अनुभवता आले. त्यांना प्राप्त झालेले मोठेपण हे त्यांच्या कार्य कर्तृत्वाबरोबर त्यांचे खडतर परिश्रम आणि त्यांची जीवनावरील श्रद्धेमुळे प्राप्त झालेले दिसते. त्यांची माणुसकी वरील नितांत निष्ठाही त्यांचा व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग दिसतो. या सर्व आत्मचरित्रकारांनी आपल्या कष्टाने परिश्रमाने आपल्या स्वतःचे एक समाजात स्थान निर्माण केले आहे. काही आत्मचरित्रकार वेगवेगळया शिक्षण संस्थांमध्ये मानाचे पद भूषविले आहे तर काही अजून कार्यरत आहेत. काहीजण सत्यशोधक चळवळीच्या अनुषंगाने समाजसेवेत मग्न, समर्थपणे सांभाळणारे समाज कार्यकर्ते आहेत.

सगळयाच आत्मचरित्रकारांनी एकापेक्षा एक अशी वरचढ मांडणी आपल्या आत्मचरित्रातून केलेली आहे. प्रत्येकाचा विषय हा वेगळा असून, आत्मचरित्र वाचताना आपण आत्मचरित्र जगल्याचा अनुभव येतो. आज काही आत्मचरित्रकार हयात नाहीत. माननीय लतीफ मगदूम सर, मी ज्या आझम संस्थेत काम करते, तेथे ते गेली पंचवीस वर्षे मानद सचिव म्हणून कार्य करत होते. गेली पंचवीस वर्षे मी अत्यंत जवळून सरांना आणि त्यांच्या कार्याला पाहिलेले होते. अत्यंत दिलखुलास ,हरहुन्नरी, कष्टाळू, धडाडीचा सामाजिक कार्यकर्ता असे व्यक्तिमत्त्व सरांना लाभलेले होते. मुस्लिम संस्थेतून **छत्रपती शिवाजीमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले** या

युगपुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने रॅली काढणारा महाराष्ट्रात किंवा भारतात एकमेव सच्चा धडाडीचा सामाजिक कार्यकर्ता म्हणून सरांचे नाव कायम सगळयांच्या लक्षात राहील. गेल्या वर्षी दुर्दैवाने कोरोनाच्या साथीत त्यांचा मृत्यू झाला. आज सर आपल्यात नाहीत. पण त्यांचे 'मी एक कोणी तरी" आत्मचरित्र हे मुस्लीम समाजातील युवकांना आणि एकूणच सर्वांना खूप प्रेरणादायी ठरेल. सरांना भावपूर्ण श्रद्धांजली !!

संदर्भ सूची :-

1) मुस्लिम मराठी साहित्य: परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची- लेखक- फ. म शहाजिंदे भूमी प्रकाशन, लातूर.
2) 'मुस्लीम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान' संकल्प प्रकाशन ,लातूर लेखक डॉ ताहेर एच पठाण (संपादक)
3) मुस्लीम आत्मचरित्रे: एक दृष्टिक्षेप -प्रा डॉ राजेखान शानेदिवाण . भूमी प्रकाशन लातूर
4) मराठीतील मुस्लीम आत्मचरित्रे एक आकलन प्रा डॉ सुलभा (केतकी) प्रमोद भोसले शब्दवैभव प्रकाशन , पुणे .

महाराष्ट्रातील मराठा आरक्षण : एक शोध आणि बोध.

डॉ. एस. एल. मेढे

सहयोगी प्राध्यापक: अर्थशास्त्र विभाग

सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद, जिल्हा: जालना

गोषवारा.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये आपल्या राज्यातील मराठा आरक्षणाचा अभ्यास करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाकडून १०२ व्या घटनादुरुस्तीला मंजूरी मिळाली आहे. १०२ व्या घटनादुरुस्तीच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाल्यानंतर मराठा आरक्षणाचा चेंडू आता राज्य सरकारच्या पारड्यात टोलवला आहे.या घटनादुरुस्तीमुळे,आरक्षण देण्याबाबतचे अधिकार राज्यांना देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.या आरक्षांचा चेंडू एकमेकांच्यापारड्यात टोलवताना येथे मराठा समाजाची दिशाभूलहोत असल्याचे दिसून येते.१०२ व्या घटना दुरुसतीने राज्यसरकारला अधिकार मिळतीलही,परंतु इंद्रा साहनी प्रकरणातील ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणे शक्य नसल्याचे दिसुने येतआहे. अश्या विविध मर्यादेचा या शोध निबंधामध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तावना.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका ठिकाणी म्हणतात देशाची राज्यघटना कितीही चांगली जरी असली तरीही चालवणारे लोक वाईट असतील तर त्याचा काय उपयोग.तत्कालीन परिस्थिती मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अशी होती की, मराठ्यांना आरक्षणाची गरज पडणार आहे, परंतु त्यावेळेस मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करणारया नेत्यांना आरक्षण म्हणजे भीक किंवा उपकार वाटत असे, आता मराठा समाजाच्या जमीनीचे तुकडीकरण होत आहे उदा.100,50,25,12.50,6.25 ...अश्या प्रकारे विभाजन होत आहे त्यामुळे तो अल्पभूधारक झाला आहे. म्हणून त्याना आरक्षण मिळणे गरजेचे आहे परुंतु फक्त गरीब मराठयांनाच!

आपल्या देशामध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध तंत्र (जात, धर्म, पंथ, वंश)चा वापर होत असल्याचे दिसून येते. सद्य: स्थितीमध्ये मराठामहत्वाचाआरक्षणाचा प्रश्न आहे. आपल्या देशामध्ये विकासाच्या मुद्यावर कोणीही मतदारांना आकर्षित करत नाहीत. इतर देशात मात्र विकासाच्या आधारावर मत दिल्या जात असते.तेथिल मेंबर ऑफ पार्लमेंट देखील सुशिक्षित व साक्षर असतात, म्हणून त्यांना माहीती आहे कि, देशाचा विकास कार्यक्षम मानवी भांडवलावर अवलंबून आहे, त्यामुळे त्यांना आदर मिळतो परंतुआपल्या देशात Brain Gain होण्याऐवजी Brain Drain होत आहे,म्हणून हुशार व बुद्धिवान लोक देश सोडून जात आहेत.

आपल्या देशातील लोकांच्या साक्षरतेचा प्रमाण 74% एवढे असले तरी केवळ "साक्षर जनता आणि भूषण भारता"असे प्रेरणादायी घोषवाक्या आहे, कृर्तीत मात्र शून्य अशीपरिस्थितीआहे.मतदान करत असताना आपण फार चुक करतो, निरक्षर गुन्हेगार/अडाणी उमेदवारांना निवडून देतो म्हणून आज यापरिस्थितीलासामोरे जावे लागत आहे.अशीच जर परिस्थिती राहिलीतर राजकीय नेते आरक्षणाचा मुदा समोर मांडून आपली पोळी भाजून घेत राहतील.

उदा.एखाद्या व्यक्तीला होंडासिटी कार चालवण्यासाठी दिलीतर त्याच्या जवळ चालविण्याचे तंत्र जर नसेल तर तो ती गाडी भंगारमध्ये विकून मोडुन खाईल, तीच परस्थिती आपल्या देशाची झाली आहे. उत्तर प्रदेश,बीहार या राज्यातअक्षरशः नदीत मृतदेह सोडले जातात, तेथील सरकार म्हणते की, बाहेर देशातून मृतदेह वाहून आलेत. प्रचंड लोकसंख्या असल्यामुळे कुत्रे मांजरासारखे जनतेचेहाल आहेत. चीनमध्ये देखील प्रचंड लोकसंख्या आहे त्यांना

एवढी समस्या भेडसावत नाही,कोणत्याही आपतकालीन परिस्थितीवर सहज मात केली जाते. आपल्या देशात प्रत्येक गोष्टीवर राजकारण आणि राजकारण ते पण स्वार्थीवृर्तीचेकेले जाते. आपण मध्यमवर्गीय लोक कर भरून देशाच्या विकासासाठी हातभार लावतोय, परंतु राजकीय लोकांच्या आरोग्यावर खर्च न करता स्वतःची खळगी भरण्यासाठी तरबेज आहेत.

अमेरिका कोरोना महामारीवर नियंत्रण करण्यास कमी पडला म्हणून तेथील लोकांनी राष्ट्र अध्यक्षालाव्हाइट हाऊस मधून स्वतःच्या हाऊस मध्ये पाठवले,असा जागरूक मतदार वर्ग आपल्या देशात कधी तयार होणार ?आपल्या देशात प्रचंड महागाई वाढली तरी पुन्हा पुन्हा महागाई निर्माण करणारे राजकीय नेते सत्तेवर येतात ही फार मोठी शोकांतिका आहे. मा. शरद पवार हे देशातील लोकनेते आहेत,त्यांचे महान असे नेतृत्व आणि कर्तृत्व आहे.कॉंग्रेश पक्षाशी एकनिष्ठ असताना त्यानीं केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये रक्षा मंत्री,कृषिमंत्री, तसेच जगातील श्रीमंत असणारे भारतीय क्रिकेट नियंत्रण बोर्डावर अध्यक्ष म्हणून काम केले आहे. तसेच त्यांनी एक दशक महाराष्ट्रचे मुख्यमंत्री भूशिवले आहे.त्याचप्रमाणे त्यांच्याकडे विद्या प्रतिष्ठान बारामती, रयत शिक्षण संस्था यांचे अध्यक्ष पद आहे, वसंत दादा पाटील शुगर इन्स्टिट्यूट सुद्धायांच्या नियंत्रण खाली आहे.ज्यावेळेस त्यांच्या पक्षाकडे सत्ता होती, त्यावेळेस मराठा समाजामध्ये असणाऱ्या गरीब मराठ्यांचा विचार करणे गरजेचा होता. आता तर त्यांच्या हाती सत्ता नाही हे अगदी बरोबर आहे,प्रबळ अशी इच्छा शक्ती असल्यामुळे त्यानीं कांग्रेस मधून बाहेर पडून 1999 मध्ये स्वतःचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्थापन केला. परन्तु हा पक्ष केंद्रामध्ये सत्ता स्थापन करण्यामध्ये अपयशी ठरला.केंद्र सरकार आणि राज्यसरकार काही क्षणात गरिबी दूर करू शकते, आपल्या कडे विविध योजना आहेत,परंतु त्यांची अंमलबजावणी कायदेशीर होत नाही. सद्य;स्थिती मध्येभ्रष्टाचारानेव जातीभेदाने बरबटलेली व्यवस्था दिसून येते.

महाराष्ट्रातील मराठा समाज आरक्षण संदर्भात पुनर्: याचिका टाकून परत न्याय मागू शकतो परंतु न्याय मिळेल काय? परत तीच प्रक्रिया निर्माण होईल घटनात्मक तरतुदीनुसार 50% पेक्षा जास्त आरक्षण देऊ शकत नाही?मराठे हे मागास आहेत हे सिद्ध होऊ शकत नाही? कारण हा राज्यकर्ता समूह आहे,तसेच अपवादात्मक परिस्तिथी देखील नाही. घटनेचे गाढे अभ्यासक जयश्री पाटील व गुणरत्न सदावर्ते हे दाम्पत्य आपल्या मतावर ठाम आहेत की, कोणत्याही परिस्थितीत उर्वरित 50% खुल्यावर्गावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. तसेच प्रा. हरी नरके यांच्या मते आरक्षण हा गरिबी हाटाव सारखा कार्यक्रम नाही. कारण मराठा आरक्षणाला अनेक पेच आहेत.

निष्कर्ष.

१. प्रत्येक समाजाचे निर्वाचित, सदस्य,उदोगपती, प्रशासकीय अधिकारी,सरकारी सेवा करत असलेले कर्मचारी,यांनी आपल्या समाजाचे प्रतिनिधित्व करून गरिबी, दारिद्र्य दूर करण्यास मदत करणे गरजेचे आहे.

२. 102 व्या घटनादुरुस्ती नुसार मा.राष्ट्रपती ने महाराष्ट्रातील मराठ्यांना आरक्षण जरी दिले तरी , इतर राज्यात म्हणजे गुजरात मध्ये पटेल, राजस्थान मध्ये जाट आपल्या आरक्षणाची मागणी करतील.असे अनेक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. आरक्षण हा केवळ राजकारण करण्यासाठी एक मुद्दा आहे, कारण स्वतःहून वैयक्तीक पातळीवर आर्थिक, शैक्षणिक मदत करण्याची तयारी नाही. लोकांना मोर्चे, आंदोलनामध्ये गुंतवून त्यांच्यावर राज्य करणे हाच हेतू आहे.

४. उर्वरीत 50% मध्ये प्रत्येक समाजात (जातीमध्ये)गरीब आणि श्रीमंतीची दरी आहे, म्हणून सर्वाना आरक्षण देणे गरजेचे आहे काय?असा मोठा प्रश्न निर्माण होतो.

५. केवळ मराठा समाजामध्ये नाही तर इतर समाजामध्ये देखिल हीच परिस्थिती आहे,कारण सर्वक्षेत्रामध्ये खाजगीकरण होत आहे,त्यामुळे आरक्षण आपोआप संपुष्टात येत आहे.

६. केंद्र सरकार मराठा समाजाची दिशाभूल करत असल्याचं दिसून येते.

७. १०२ व्या घटनादुरुस्तीचं स्वागतच आहे. त्यातून राज्याला अधिकार मिळतीलही मात्र, त्यातून आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही.

८. राज्यांना अधिकार दिल्याने मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेल आणि मार्ग मोकळा होईल, हा गैरसमज आहे.

संदर्भ

१. मराठा आरक्षण: '५० टक्क्यांच्या मर्यादेसह १०२ वी घटनादुरुस्ती निरुपयोगी' ई सकाळ,४ आगस्त २०२१.

२. राज्यशास्त्र उपविद्याशाखा आणि अभ्यास पद्धती – प्रकाश पवार

३. भारताची राज्यघटना आणि प्रशासन – डॉ रंजन कोलंबे

४. आपली संसद – सुभाष कश्यप.

५. भारतीय संविधान आणि भारतीय राजकारण – तुकाराम जाधव महेश शिरपूरकर.

राज्यशास्त्र: स्वरूप आणि व्याप्ती

प्रा. श्रीनिवास काशिनाथराव राठोड

जेमला नाईक उच्च माध्यमिक आश्रमशाळा, सकनुर तांडा ता.मुखेड जि.नांदेड 431715

प्रस्तावना:

राज्यशास्त्र किंवा राजकारणशास्त्र हे राजकारणाचा वैज्ञानिक अभ्यास आहे. हे एक सामाजिक विज्ञान आहे ज्यामध्ये शासन आणि शक्ती आणि राजकीय क्रियाकलाप, राजकीय विचार, राजकीय वर्तन आणि संबंधित घटना आणि कायद्यांचे विश्लेषण केले जाते.एवढेच नव्हे तर,राज्यशास्त्र हे स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सरकार आणि राजकारणाच्या सिद्धांतावर आणि व्यवहारावर लक्ष केंद्रित करते. त्यामुळेच 'राज्यशास्त्र' या संज्ञेशी आपण सर्व परिचित आहोत. जेव्हापासून मनुष्य संघटित सामाजिक जीवन जगू लागला, तेव्हापासून राजकारणाची भूमिका महत्त्वाची ठरू लागली आहे.तसेच सार्वजनिक धोरण आणि प्रशासन,देशांतर्गत राजकारण आणि सरकार, राजकीय अर्थव्यवस्था आणि राजकीय कार्यपद्धती या इतर उल्लेखनीयउपशाखाहिआहेत. शिवाय, राज्यशास्त्र हे अर्थशास्त्र, कायदा, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, मानवी भूगोल, पत्रकारिता, राजकीय मानववंशशास्त्र, मानसशास्त्र आणि सामाजिक धोरण या क्षेत्रांशी संबंधित आहे आणि त्यावर लक्ष केंद्रित करते. त्याचप्रमाणेराज्यशास्त्र हे देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय आणि तुलनात्मक दृष्टिकोनातून राजकारण आणि सत्तेचा अभ्यास आहे. यात राजकीय कल्पना, विचारधारा, संस्था, धोरणे, प्रक्रिया आणि वर्तन तसेच गट, वर्ग, सरकार, मुत्सद्दीपणा, कायदा, रणनीती आणि युद्ध समजून घेणे आवश्यक आहे.म्हणूनच आजच्या २१ व्या शतकात राज्यशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्तीचा अभ्यास करणे महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये:

1. राज्यशास्त्राच्या मुख्य संकल्पनाचा अभ्यास करणे.
2. राज्यशास्त्राचे मूळ व उत्क्रांतीचे टप्पे यांचा अभ्यास करणे.
3. राज्यशास्त्र अभ्यासाचे स्वरूपअभ्यासणे.
4. राज्यशास्त्राच्या अभ्यासाची व्याप्तीअभ्यासणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी / लेखकाने संशोधन अभ्यासासाठी दुय्यम साधनांचा वापर केला असुन त्यात, विविध संदर्भग्रंथ व संकेत स्थळे आणि पुस्तके यांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यशास्त्राची मुख्य संकल्पना काय आहे?

राज्यशास्त्राची मुख्य संकल्पना अशी आहे की ,राज्यशास्त्र हे स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सरकार आणि राजकारणाच्या सिद्धांतावर आणि व्यवहारावर लक्ष केंद्रित करते. तसेचराज्यशास्त्र हे सार्वजनिक जीवन आणि नागरिकत्वाला प्रोत्साहन देणाऱ्या चौकशीच्या पद्धती बनवणाऱ्या संस्था, पद्धती आणि संबंधांची समज विकसित करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

राजकीय विचार आणि राज्यशास्त्र यात काय फरक आहे?

राजकीय सिद्धांत हे सरकार कसे कार्य करते याच्या विविध पद्धती आणि तत्त्वज्ञानाचा संदर्भ देते. राज्यशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे.

राज्यशास्त्राचे मूळ:

पाश्चात्य राजकारणाच्या पूर्ववृत्तांची मूळ ग्रीक विचारवंत सॉक्रेटिस, प्लेटो (427-347 ईसापूर्व), आणि ॲरिस्टॉटल (384-322 ईसापूर्व) यांच्याकडे शोधू शकतात. अभ्यास तत्त्वज्ञानाभिमुख होता. प्लेटोने रिपब्लिक लिहिले आणि ॲरिस्टॉटलने राजकारण लिहिले. ॲरिस्टॉटलला राज्यशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते. 'माणूस हा राजकीय प्राणी आहे' या विधानासाठी ते प्रसिद्ध आहेत. 'राजनीती' हा शब्द ग्रीक शब्द 'पोलिस' पासून आला आहे, ज्याचा अर्थ शहर-राज्य असा होतो.राज्यशास्त्राचे स्वरूप रोमन साम्राज्याच्या उंचीच्या काळात, प्रसिद्ध इतिहासकारांनी रोमन प्रजासत्ताकच्या उदयाचे दस्तऐवजीकरण आणि इतर राष्ट्रांच्या संघटना आणि इतिहासाचे दस्तऐवजीकरण केले, तर ज्युलियस सीझर, सिसेरो आणि इतरांसारख्या राजकारण्यांनी आम्हाला राजकारणाची उदाहरणे दिली. प्रजासत्ताक आणि रोमचे साम्राज्य आणि युद्धे. या युगात, राजकारणाचा अभ्यास इतिहास समजून घेणे, शासनाच्या पद्धती समजून घेणे आणि सरकारच्या कार्याचे वर्णन करणे या दिशेने होते. मध्ययुगात, चर्च आणि न्यायालयांमध्ये राजकारणाचा अभ्यास व्यापक होता. संत थॉमस ऍक्विनास हे या काळातील महत्त्वाचे राजकीय विचारवंत होते.इटालियन पुनर्जागरण काळात, निकोलो मॅकियावेली यांनी राजकीय संस्था आणि कलाकारांच्या प्रत्यक्षअनुभवजन्य निरीक्षणावर आधुनिक राज्यशास्त्राची स्थापना केली. "द प्रिन्स" हे त्यांचे प्रसिद्ध पुस्तक आधुनिक वास्तववादी राजकारणासाठी मार्गदर्शक आहे. थॉमस हॉब्स, जॉन लॉक आणि रुसो (सामाजिक करार सिद्धांत) हे या काळातील इतर प्रसिद्ध पुरुष होते. या काळातील अमेरिकन राजकारणातील महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे अलेक्झांडर हॅमिल्टन, बेंजामिन फ्रँकलिन आणि थॉमस जेफरसन.प्राचीन भारतात, ऋग्वेद, संहिता, ब्राह्मण, महाभारत आणि बौद्ध पाली कॅननमध्ये राजकारणाच्या पूर्ववृत्तांचा शोध घेतला जाऊ शकतो. चाणक्य (इ.पू. ३५०-२७५) हे तक्षशिलेतील राजकीय विचारवंत होते. त्यांनी अर्थशास्त्र हा राजकीय विचार, अर्थशास्त्र आणि सामाजिक व्यवस्थेवरील ग्रंथ लिहिला, जो मॅकियाव्हेलीच्या द प्रिन्सचा अग्रदूत मानला जाऊ शकतो. हे इतर विषयांसह आर्थिक आणि वित्तीय धोरणे, कल्याण, आंतरराष्ट्रीय संबंध आणि युद्ध धोरणांची तपशीलवार चर्चा करते. मनुस्मृती, चाणक्याच्या काळानंतर सुमारे दोन शतके, प्राचीन भारतातील आणखी एक महत्त्वाचा राजकीय ग्रंथ आहे.

उत्क्रांतीचे टप्पे:

- तात्विक: अंत आणि उद्देशांशी संबंधित.
- संस्थात्मक: राजकीय संस्थेशी संबंधित.
- वर्तणूक: मानवी वर्तनाच्या प्रेरणा आणि यंत्रणेशी संबंधित.
- बहुवचनवादी: गट आणि संस्थांमधील परस्परसंवादाशी संबंधित.
- संरचनात्मक: व्यक्ती आणि समुदाय यांच्यातील संबंधाशी संबंधित.
- विकासात्मक: वाढीच्या प्रक्रियेशी संबंधित, औद्योगिकीकरण बदल आणि सरकारी स्वरूप आणि धोरणांवर होणारा परिणाम.

राज्यशास्त्राच्या व्याख्या:

1.पारंपारिक दृष्टिकोनातून, आपण राज्यशास्त्र अशी व्याख्या करू शकतो

"राज्य आणि सरकारचा त्यांच्या सर्व अभिव्यक्ती, पैलू आणि संबंधांचा अभ्यास".

या अर्थाने, राजकारण देशांतर्गत, राष्ट्रीय, संघराज्य, नगरपालिका किंवा आंतरराष्ट्रीय असू शकते. राज्यशास्त्राच्या या सुरुवातीच्या व्याख्या सामान्यतः राज्य आणि सरकार यांच्याशी संबंधित होत्या.

आर.जी. गेटेल: "राज्यशास्त्र म्हणजे राज्य काय आहे याचा ऐतिहासिक तपास, राज्य काय आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि राज्य काय असावे याबद्दल राजकीय, नैतिक चर्चा आहे."

2. 20 व्या शतकाच्या सुरूवातीस, राज्यशास्त्राकडे पाहण्याचा एक नवीन मार्ग विकसित झाला. हा नवीन दृष्टीकोन वर्तणूक दृष्टिकोन म्हणून ओळखला जातो. नवीन दृष्टिकोनाचा मुख्य जोर म्हणजे राजकारणाची क्रिया आणि प्रक्रिया म्हणून उपचार करणे. या संदर्भात, नवीन व्याख्या उदयास आल्या.

हॅरोल्ड लासवेल: "राजकारण हा प्रभाव आणि प्रभावशाली अभ्यास आहे" किंवा "सत्तेच्या आकार आणि वाटणीचा अभ्यास आहे."

कॅटलिन: "राज्यशास्त्र हे मानवी आणि सामाजिक नियंत्रणाच्या कृतीचा अभ्यास आहे."

राज्यशास्त्र अभ्यासाचे स्वरूप:

राजकारण ही केवळ शासनाची संस्था नाही तर सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्याची एक यंत्रणा देखील आहे. नेचर ऑफ पॉलिटिकल सायन्स हे राजकारणाचा सिद्धांत आणि सराव आणि राजकीय प्रणाली आणि राजकीय वर्तन यांचे वर्णन आणि विश्लेषणाशी संबंधित एक सामाजिक विज्ञान आहे. यात निर्णय घेण्यामधील अधिकारांचे वाटप आणि हस्तांतरण, भूमिका आणि शासन प्रणाली, सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्था, राजकीय वर्तन आणि सार्वजनिक धोरणे यांचा समावेश आहे. अशा प्रकारे, राज्यशास्त्र हे राजकीय संघटना, राजकीय प्रक्रिया आणि राजकीय संस्थांची राजकीय कार्ये आणि राजकीय सिद्धांत यांचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातील राज्याचा अभ्यास आहे.राज्यशास्त्रामध्ये राजकीय सिद्धांत, सार्वजनिक धोरण, राष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय संबंध, मानवाधिकार, पर्यावरणीय राजकारण आणि तुलनात्मक राजकारण यासह अनेक उपक्षेत्रे आहेत.

राज्यशास्त्राच्या अभ्यासाची व्याप्ती:

राजकारणाचा अभ्यास मानवतावादी आणि वैज्ञानिक दोन्ही आहे आणि शतकानुशतके जुना आहे. ॲरिस्टॉटलने तिला "विज्ञानाची राणी" म्हटले आहे. आजच्या राजकीय संशोधनामध्ये मानवी वर्तन आणि जागतिक घटना समजून घेण्यासाठी अत्यंत वैज्ञानिक आणि कठोर प्रयत्नांचा समावेश आहे. राजकीय शास्त्रज्ञ फ्रेमवर्क प्रदान करतात ज्यामधून पत्रकार, विशेष स्वारस्य गट, राजकारणी आणि मतदार समस्यांचे विश्लेषण करतात.राज्यशास्त्र, एक शिस्त म्हणून, विविध पैलूंशी संबंधित आहे जसे की,खालीलप्रमाणे आहे.

राज्य आणि सरकारचा अभ्यास राज्याचे स्वरूप आणि निर्मितीशी संबंधित आहे आणि सरकारचे विविध स्वरूप आणि कार्ये समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

संघटना आणि संस्थांचा संघटित पद्धतीने अभ्यास करणे, ज्यामध्ये राज्यशास्त्राच्या मूलभूत समस्यांचा समावेश होतो, प्रथम, राज्याच्या उत्पत्तीची आणि स्वरूपाची तपासणी, दुसरी राजकीय संस्थांचे स्वरूप, इतिहास आणि स्वरूपांची चौकशी आणि तिसरे, वजावट, म्हणून, शक्य तितक्या राजकीय वाढ आणि विकासाचे कायदे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांचा अभ्यास, प्रदेशाचे संरक्षण, प्रातिनिधिक सरकार आणि राष्ट्रीय एकता या आधुनिक मागण्यांनी राज्यशास्त्र हे राजकीय स्वातंत्र्य आणि राज्य सार्वभौमत्वाचे शास्त्र बनवले आहे.

मनुष्याच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केल्यास असे म्हणता येईल की मनुष्यासंबंधीची त्याची मूळ कल्पना राज्यशास्त्राच्या सर्व भागांमध्ये त्याचे स्वरूप ठरवते.

विकासाच्या भूतकाळाचा, वर्तमानाचा आणि भविष्याचा अभ्यास राज्यशास्त्राचा अर्थ आणि अत्यावश्यक स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो आणि त्याच्या प्रगती आणि विकासाच्या स्वतःमध्ये आणि आंतरराष्ट्रीय संस्था आणि इतर राज्यांबद्दलच्या कायद्यांशी संबंधित आहे.

वर्तन क्रांतीसह शक्ती, अधिकार आणि प्रभाव या संकल्पनांचा अभ्यास. अभ्यासाचा मध्यवर्ती विषय शक्तीचा अभ्यास बनला आहे. परिणामी, राजकीय समाजीकरण, राजकीय संस्कृती, राजकीय विकास आणि हितसंबंध आणि दबाव गट यासारख्या अनौपचारिक संरचना यासारख्या नवीन पैलूंचा समावेश करण्याची व्याप्ती वाढली आहे.

निष्कर्ष:

राज्यशास्त्राचा अर्थ स्वरूप आणि व्याप्ती या विषयावर दीर्घ चर्चेनंतर असा निष्कर्ष काढता येतो की ही समाजशास्त्राची एक शाखा आहे ज्यामध्ये आपण राज्य, सरकार, राजकीय सिद्धांत, राजकारण, राजकीय संस्था, राजकीय माणसाचे जीवन, आंतरराष्ट्रीय यांचा अभ्यास करतो. संबंध, कायदे आणि संस्था, प्रभाव आणि प्रभावशाली, मूल्यांचे अधिकृत वाटप इ.त्यामुळे असे म्हणता येईल की हे एक गतिमान विज्ञान आहे आणि याचा अर्थ राज्यशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती व्यापक आणि नेहमी बदलणारे आहे. हे आपल्याला आपल्या समाजाबद्दल राजकीय आणि सामाजिक प्राणी म्हणून वेगळ्या पद्धतीने विचार करण्यास सक्षम करते.

संदर्भसूची:

1) https://www.politicalscienceview.com/nature-political-science definitiontheoryscope/#:~:text=Politics%20is%20not%20only%20a,political%20systems%20and%20political%20behavior.
2) https://schoolofpoliticalscience.com/meaning-nature-and-scope-of-political-science/
3) .https://schoolofpoliticalscience.com/meaning-nature-and-scope-of-political-science/
4) Easton, David. *The Political System-An Inquiry into the Study of Political Science*, New York, 1971.
5) प्रा.बी.वाय .कुलकर्णी व प्रा.संभाजी पाटील(जूलै २०१०)- 'राजकारण संकल्पना व विचारसरणी' चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद

भारतीय पोस्ट ऑफिस सेवांचे व्यवस्थापकीय अध्ययन

प्रा. रामरतन भाष्कर ढोरे

एम.कॉम,बि.एड,एम.फील,नेट,सेट

इंडिया पोस्ट हे पूर्वीचे टपाल विभाग म्हणून ओळखले जाणारे, दळणवळण मंत्रालयाच्या अखत्यारीतील भारतातील सरकारी टपाल प्रणाली आहे. भारतात सामान्यतः "पोस्ट ऑफिस" म्हटले जाते, ही जगातील सर्वात मोठ्या प्रमाणावर वितरित टपाल प्रणाली आहे. वॉरन हेस्टिंग्ज यांनी 1788 मध्ये देशात टपाल सेवा सुरू करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या अंतर्गत पुढाकार घेतला. हे सुरुवातीला "कंपनी मेल" नावाने स्थापित केले गेले. नंतर 1854 मध्ये लॉर्ड डलहौसीने "क्राउन" अंतर्गत सेवेत बदल केले. डलहौसीने एकसमान टपाल दर (सार्वत्रिक सेवा) सुरू केले आणि इंडिया पोस्ट ऑफिस कायदा 1854 पास करण्यास मदत केली ज्याने 1837 पोस्ट ऑफिस कायद्यात लक्षणीय सुधारणा केली ज्याने भारतात नियमित पोस्ट ऑफिस सुरू केले होते. यामुळे संपूर्ण देशासाठी पोस्ट महासंचालक पद निर्माण झाले. हे मेल डिलिव्हरी, मनी ऑर्डरद्वारे पैसे पाठवणे, लहान बचत योजनांतर्गत ठेवी स्वीकारणे, पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PLI) आणि ग्रामीण पोस्टल लाइफ इन्शुरन्स (RPLI) अंतर्गत जीवन विमा संरक्षण प्रदान करणे आणि बिल संकलन यासारख्या किरकोळ सेवा प्रदान करते. फॉर्मची विक्री, इ. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (MGNREGS) 154,965 पोस्ट ऑफिससह वृद्धापकाळ निवृत्ती वेतन आणि वेतन वितरण (31.03 रोजी) यांसारख्या नागरिकांसाठी इतर सेवांसाठी DoP भारत सरकारसाठी एजंट म्हणून देखील काम करते. .2017), इंडिया पोस्टमध्ये जगातील सर्वाधिक वितरित पोस्टल नेटवर्क आहे.

देश 23 पोस्टल मंडळांमध्ये विभागलेला आहे, प्रत्येक मंडळाचे प्रमुख पोस्टमास्टर जनरल करतात. प्रत्येक वर्तुळ विभागांमध्ये विभागले गेले आहे, ज्याचे प्रमुख पोस्टमास्टर जनरल करतात आणि त्यामध्ये विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फील्ड युनिट्स असतात. हे विभाग पुढे उपविभागात विभागले गेले आहेत. 23 मंडळांव्यतिरिक्त, भारताच्या सशस्त्र दलांना पोस्टल सेवा प्रदान करण्यासाठी एक बेस सर्कल आहे, ज्याचे प्रमुख महासंचालक आहेत. हिकिम, 14,567 फूट (4,440 मीटर) उंचीवर इंडिया पोस्टद्वारे संचालित, हिमाचल प्रदेशातील जगातील सर्वात उंच पोस्ट ऑफिसपैकी एक आहे.पोस्ट ऑफिसच्या मुख्य प्रशासकाला पोस्ट मास्तर म्हणतात. पोस्टल कोड आणि पोस्ट ऑफिसच्या आगमनापूर्वी पोस्टल सिस्टम पावती किंवा डिलिव्हरीसाठी विशिष्ट पोस्ट ऑफिसमध्ये वस्तु पाठवतात. अशा प्रकारे त्याच्या काही योजनेची (सेवा) निर्मिती झाली असावी.

सैन्य पोस्टल सेवा :-

आर्मी पोस्टल सर्व्हिस (APS) ही भारतातील सरकारी लष्करी मेल प्रणाली म्हणून काम करते. आर्मी पोस्टल सर्व्हिस सिस्टीमचे प्राथमिक वैशिष्ट्य हे आहे की परदेशातील ड्युटी स्टेशन्स आणि होम (किंवा त्याउलट) दरम्यान पोस्ट केलेले लष्करी मेल प्रेषकाला सामान्य देशांतर्गत मेल ट्रॅफिक प्राप्त करतात याची खात्री करण्यासाठी त्यांना सामान्यतः अनुदान दिले जाते. पेक्षा जास्त खर्च करू नका काही प्रकरणांमध्ये, युद्धक्षेत्रातील भारतीय लष्करी कर्मचारी मायदेशात पत्रे आणि/किंवा पॅकेज विनामूल्य पोस्ट करू शकतात, तर काही प्रकरणांमध्ये, विशिष्ट परदेशी

प्रदेशात असलेले प्रेषक दुसऱ्या लष्करी प्राप्तकर्त्याला लष्करी मेल पाठवू शकतात, जो त्याच ठिकाणी आहे. येथे स्थित आहे. परदेशातील प्रदेश, कोणतेही शुल्क न घेता.

इलेक्ट्रॉनिक भारतीय पोस्टल ऑर्डर :-

इलेक्ट्रॉनिक इंडियन पोस्टल ऑर्डर (ई-आयपीओ) 22 मार्च 2013 रोजी सुरू करण्यात आली, सुरुवातीला फक्त परदेशात राहणाऱ्या नागरिकांसाठी. माहितीचा अधिकार कायदा, 2005 अंतर्गत माहिती मिळविण्यासाठी शुल्काच्या ऑनलाइन भरणा करण्यासाठी पोस्टल ऑर्डरचा वापर केला जाऊ शकतो. 14 फेब्रुवारी 2014 रोजी सर्व भारतीय नागरिकांना समाविष्ट करण्यासाठी सेवेचा विस्तार करण्यात आला.

पोस्टल जीवन विमा :-

पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PLI) 1 फेब्रुवारी 1884 रोजी भारताच्या महाराणी यांच्या राज्य सचिवांच्या (भारतासाठी) स्पष्ट मान्यतेने सुरू करण्यात आला. ही मूलत: 1884 मध्ये टपाल कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी एक कल्याणकारी योजना होती आणि नंतर 1888 मध्ये टेलिग्राफ विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी विस्तारित करण्यात आली. 1894 मध्ये, PLI ने P&T विभागाच्या महिला कर्मचाऱ्यांना अशा वेळी विमा संरक्षण प्रदान केले जेव्हा इतर कोणत्याही विमा कंपनीने संरक्षण दिले नव्हते. स्त्री जगते. ही या देशातील सर्वात जुनी जीवन विमा कंपनी आहे. 31 मार्च 2015 पर्यंत □130,745 कोटी (US$18 बिलियन) विम्याच्या रकमेसह 6.4 दशलक्षहून अधिक पॉलिसी सक्रिय होत्या. PLI चे 2014-15 वर्षाचे प्रीमियम उत्पन्न □6,053.2 कोटी (US$850 दशलक्ष) होते. 24 मार्च 1995 रोजी हे सर्व ग्रामीण रहिवाशांना विस्तारित करण्यात आले.

सरकारी कर्मचाऱ्यांसाठीच्या धोरणांमध्ये संतोष (एंडॉवमेंट ॲश्युरन्स), सुरक्षा (संपूर्ण आयुष्य विमा), सुविधा (परिवर्तनशील संपूर्ण जीवन विमा), सुमंगल (अगोदर एंडॉवमेंट पॉलिसी) आणि युगल सुरक्षा (संयुक्त जीवन एंडॉवमेंट ॲश्युरन्स) यांचा समावेश होतो. इंडिया पोस्टने १९९५ मध्ये ग्रामीण जनतेसाठी ग्रामीण पोस्टल लाइफ इन्शुरन्स (RPLI) लाँच केले. RPLI योजनांमध्ये ग्राम संतोष (एंडॉमेंट ॲश्युरन्स), ग्राम सुरक्षा (संपूर्ण जीवन विमा), ग्राम सुविधा (परिवर्तनीय संपूर्ण जीवन विमा), ग्रा. सुमंगल (अपेक्षित एंडॉवमेंट ॲश्युरन्स) आणि गावातील प्रिया.

टपाल बचत :-

पोस्ट ऑफिस आवर्ती ठेव खाती, सुकन्या समृद्धी खाते (SSA), राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (NSC), किसान विकास पत्र (KVP), सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, बचत-बँक खाती, मासिक यासह अनेक बचत योजना ऑफर करते. - उत्पन्न योजना, ज्येष्ठ नागरिक बचत योजना आणि वेळ ठेव खाती

बँकिंग :-

2013 मध्ये हे उघड झाले की भारतीय पोस्टल सेवेने नवीन बँकिंग परवाने जारी करण्यासाठी RBI मार्गदर्शक तत्त्वे जारी केल्यानंतर बँकिंग उद्योगात प्रवेश करण्याची योजना आखली. अखेरीस त्यांनी पोस्ट बँक ऑफ इंडिया ही स्वतंत्र बँकिंग सेवा उघडण्याची योजना आखली.

29 फेब्रुवारी 2016 पर्यंत, 18,231 टपाल कार्यालये कोअर बँकिंग सोल्यूशन्स (CBS) वापरत आहेत. 576 पोस्ट ऑफिस ठिकाणी एटीएम स्थापित केले गेले आहेत आणि पोस्ट ऑफिस बचत बँक ग्राहकांना डेबिट कार्ड जारी केले गेले आहेत. पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PLI) साठी मेन इन्शुरन्स सोल्युशन (CIS) 808 मुख्य पोस्ट ऑफिस

आणि 24,000 सब पोस्ट ऑफिसमध्ये सुरू करण्यात आले आहे. सप्टेंबर 2017 मध्ये, अशी घोषणा करण्यात आली होती की 2018 पर्यंत सर्व 1.55 लाख पोस्ट ऑफिस, प्रत्येक पोस्टमन आणि ग्रामीण डाक सेवक (पोस्टमास्टर) इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (IPPB) देऊ करत असलेले सर्व पेमेंट पर्याय स्वीकारतील.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 सप्टेंबर 2018 रोजी इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे उद्घाटन केले.

डेटा स्टोरेज :-

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (MoSPI) आणि पोस्ट विभाग यांच्यातील सहकार्यामुळे ग्रामीण भागातील ग्राहक-किंमत निर्देशांकांची गणना करणे शक्य झाले आहे. दूरदृष्टी आणि प्रमाणाच्या समस्यांमुळे हे आकडे पूर्वी अप्राप्य होते. करारनामा टपाल सेवेला निवडक ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी देय असलेल्या किमतींचा डेटा गोळा करण्यासाठी अधिकृत करतो. फेब्रुवारी 2011 मध्ये, MoSPIने आपला पहिला ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) आणि अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांक प्रकाशित केला. देशभरातील 1,181 गावांमधील उपलब्ध माहितीच्या आधारे ही माहिती मासिक प्रकाशित केली जाते

ई-कॉमर्स वितरण :-

ई-कॉमर्समधील तेजी आणि कॅश-ऑन-डिलिव्हरी मालाच्या वाढत्या संख्येने इंडिया पोस्टला प्रीपेड तसेच कॅश ऑन डिलिव्हरी (सीओडी) पार्सल वितरित करण्यासाठी प्रमुख ई-कॉमर्स पोर्टल्ससह भागीदारी करण्यास प्रवृत्त केले आहे. दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री, रविशंकर प्रसाद यांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारच्या डिलिव्हरींमधून भारतीय पोस्टचे उत्पन्न 2015-16 मध्ये □15 अब्जांपर्यंत जाईल (US$210 दशलक्ष)

इतर सेवा :- इतर सेवांचा समावेश आहे

- टपाल पावतीसाठी पोस्ट बॉक्स आणि पोस्ट बॅग
- स्पीड पोस्ट, फास्ट पोस्ट
- निवासाच्या पुराव्यासाठी ओळखपत्र
- इंडिया पोस्ट एटीएम
- RMS (रेल्वे मेल सेवा)
- पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (POPSK)
- आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरण.
- वेस्टर्न युनियन
- पोस्टल लाइफ इन्शुरन्स आणि ग्रामीण पोस्टल लाइफ इन्शुरन्स
- बचत बँक (SB/RD/TD/MIS/SCSS/PPF/SSA)
- बचत रोख प्रमाणपत्र
- इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (IPPB).

संदर्भ:-

1) मुक्काम – आर्मी पोस्ट ऑफिस – वैदेही देशपांडे – राजहंस प्रकाशन
2) पोस्ट ऑफिसची गोष्ट – सीताराम मेणजोगे- नवचेतन्य प्रकाशन
3) Post Office –Bukowski Charles –Random house uk Publication
4) व्यवसाय व्यवस्थापन – प्रा.दिलीप पाटील – अथर्व प्रकाशन जळगाव
5) www.indiapost.gov.in
6) वार्षिक अहवाल भारतीय पोस्ट ऑफिस

संविधानिक शासनाचा विश्लेषणात्मक अभ्यास

डॉ. संभाजी संतोष पाटील

श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स. पाटील साहित्य आणि मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

प्रस्तावना : प्रत्येक देशाला स्वत:चे एक संविधान असते. देशाचा राज्यकारभार त्या संविधानातील नियमाप्रमाणे होणे अपेक्षित असते. संविधानाप्रमाणे राज्यकारभार करणाऱ्या लोकशाही शासनाला 'संविधानिक शासन' असे म्हणतात.

संविधान म्हणजे काय?

"संविधान म्हणजे अशी राजकीय तत्वे ज्यांच्या आधारे देशाचा राज्यकारभार चालतो."

संविधान हा देशाचा जिवंत दस्तऐवज आहे. देशाचा राज्यकारभार कसा चालवावा हे त्यात नमुद केलेले असते. संविधान समजून घेण्यासाठी संविधानामध्ये समाविष्ट असलेले तीन परस्परसंबंधी घटक समजून घेणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे -

१) नियमांचा संच : राज्यकारभारासाठी निर्माण केलेल्या वेगवेगळ्या संस्थांच्या कामकाजाचे नियम संविधानात असतात. उदा. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, इ. या तीनही विभागांची संरचना, त्यांचे अधिकार, त्यांची कर्तव्य यासंबंधीचे नियम संविधानात नोंदलेले असतात. या प्रत्येक विभागाने आपल्या अधिकारक्षेत्रात कार्य करणे अपेक्षित आहे. प्रत्येक विभागाचे दुसऱ्या विभागावर नियंत्रण निर्माण करण्यात आलेले आहे. शासन काय करु शकते ते संविधानात नोंदलेले असते तर शासन काय करु शकत नाही याची दखलही संविधान घेते.

२) अधिकारांचा संच: संविधानात नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य नमुद केलेली असतात. प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र सन्मानाने व प्रतिष्ठित आयुष्य जगता यावे यासाठी संविधानाद्वारे विविध अधिकार दिलेले असतात. मात्र हे अधिकार अमर्याद असत नाहीत. त्यावर काही मर्यादा असतात. संविधान केवळ नागरिकांना अधिकार बहाल करते असे नाही तर त्यांच्या संरक्षणाची देखील हमी देते. उदा. भारतीय संविधानात नागरिकांचा मुलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी पाच प्रकारचे मार्ग दिलेले आहेत. न्यायमंडळ नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करते.

३) उद्दिष्टे आणि मुल्यांचा संच : प्रत्येक संविधानाच्या निर्मितीमागे एक विशिष्ट उद्देश असतो. त्यानुसार संविधानाची उद्दिष्टे आणि मूल्ये संविधानात नमुद केलेली असतात. उदा. अमेरिकन संविधान. अमेरिकन संविधानात न्यायाची स्थापना, देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था, देशाचे संरक्षण, सार्वत्रिक लोककल्याण, इ. उद्दिष्ट नमुद केली आहेत. तर भारतीय संविधानाची प्रास्ताविका संविधानाची उद्दिष्टे आणि मूल्ये यांवर प्रकाश टाकते.

वरील प्रमाणे संविधानात समाविष्ट असणाऱ्या तीन परस्पर संबंधित बाबींचे स्पष्टीकरण करण्यात येईल.

संविधानवाद -

"संविधानवाद म्हणजे शासनाचे अधिकार मर्यादित असणे होय." शासनाच्या अधिकारावरील मर्यादा संविधानात नमुद केलेल्या असतात किंवा त्या परंपरेने चालत आलेल्या असतात. अशा शासनास 'घटनात्मक शासन' म्हणतात.

संविधानाचा उदय आणि विकास -

संविधानवादाची सुरुवात सतराव्या शतकात झाली. जॉन लॉक या ब्रिटीश विचारवंतांने आपल्या 'सामाजिक करार सिध्दांत' 'Social Contract Theory' या सिध्दांताद्वारे शासनाचे सत्तेवर नियंत्रण आणण्याचे प्रतिपादन केले. जॉन लॉक यांच्या मते शासन चुकीचा राज्यकारभार करु शकत नाही. आणि जर असा चुकीचा राज्यकारभार शासन करत असेल तर ते शासन बदलण्याचा अधिकार लोकांना आहे.

शासनावरील लोकांच्या नियंत्रणाची ही संकल्पना संविधानवादाचा पुरस्कार करणारी आहे. विविध देशात संविधानवादाचा विकास घडवून आणणाऱ्या राजकिय घटना आणि घडामोडी घडुन आलेल्या दिसतात. त्याबाबतचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) युनायटेड किंगडम :

सन १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा ही सनद व सन १६८९ मध्ये बिल ऑफ राईटस् संमत करुन ब्रिटीश संसदेने आपल्या राज्यकर्त्यांवर बंधने घातली. त्यातुन राजाची अमर्याद सत्ता नियंत्रीत झाली. जेव्हा शासनाचे त्याच्या प्रमुख कार्यानुसार तीन

विभाग निर्माण करण्यात आले, त्यावेळी शासनावर नियंत्रण आणण्याची कल्पना पुढे आली. हीच घटना आधुनिक काळातील संविधानवाद म्हणून ओळखली जाते.

युनायटेड किंगडमचे संविधान अलिखीत आहे. त्याद्वारे संसदेच्या सार्वभौमत्वाचा सिध्दांत प्रचलित होता. याचा अर्थ तेथील संसद सर्वश्रेष्ठ असून ती जनतेसाठी सर्व प्रकारचे कायदे करु शकते जेव्हा संसदेने अन्यायकारक व अनियंत्रित कायदे बनविले तेव्हा तेथील लोकमतापुढे ते टिकले नाहीत. संसदेच्या सार्वभौमत्वावर आज मर्यादा आहेत, शासनावर देखील आज वेगवेगळ्या मार्गाने नियंत्रण आलेले दिसते.

२) अमेरिका -

आधुनिक संविधानवाद प्रथम अमेरिकेत मांडला गेला. अमेरिकन संविधानात प्रथम दहा दुरुस्त्या करण्यात आल्या, त्या दुरुस्त्यांद्वारे तेथील शासनाच्या सत्तेवर नियंत्रण आणले गेले. या दहा दुरुस्त्यांना एकत्रितपणे 'बिल ऑफ राईटस्' असे म्हटले जाते. उदा. प्रथम संविधान दुरुस्तीद्वारे शासन नागरिकांच्या भाषण स्वातंत्र्यावर आणि वृत्तपत्र स्वातंत्र्यावर मर्यादा टाकु शकणार नाही असा बदल केला.

३) भारत -

भारतीय संविधानानुसार शासन नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर अनावश्यक बंधने टाकु शकत नाही. शासनाने नागरिकांचे मूलभूत हक्क काढुन घेतल्यास नागरिक रितसर त्या विरोधात न्यायालयाकडे दाद मागु शकतात. न्यायालय नागरीकांवरील असा अन्याय दुर करते.

थोडक्यात संविधानाने या मार्गाने शासनाची सत्ता नियंत्रित केली आहे.

भारतीय संविधानातील मुळ संरचना तत्व -

संविधान शासनाचे अधिकार नियंत्रित करते. त्याच संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार शासनाला असतो. बहुतांश संविधानात अशा दुरुस्तीची पध्दत समाविष्ट असते. मात्र या दुरुस्ती अधिकाराचा कधी-कधी शासन गैरवापर करते आणि आपल्यावर नियंत्रण आणणाऱ्या तरतुदीच बदलते. भारतात सन १९७० च्या दशकात अशी परिस्थिती उद्‌भवली.

संविधान दुरुस्ती अधिकाराचा शासनाकडून होणारा गैरवापर लक्षात घेवून सर्वोच्च न्यायालयाने सन १९७३ च्या केशवानंद भारती खटल्यात शासनाच्या संविधान दुरुस्तीच्या अधिकारावरच नियंत्रण आणले. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, शासनाला / संसदेला संविधानात दुरुस्तीचा अधिकार असला तरी 'संविधानाची मुळ संरचना' ही दुरुस्तीचा अधिकार वापरुन बदलता येणार नाही.

संविधानिक नैतिकता :

"संविधानाची पायाभूत तत्वे सत्तेवर असणाऱ्या राज्यकर्त्यांनी पाळली पाहिजेत यालाच संविधानिक नैतिकता असे म्हणतात." लोकशाहीमध्ये संविधानवाद म्हणजे केवळ शासनाच्या अधिकारावर नियंत्रण एवढाच मर्यादित अर्थ अपेक्षित नाही तर त्याच्या जोडीने संविधानिक भावनेचे पालन करणे देखील अपेक्षित आहे.

लोकशाही शासनाचे प्रकार



लोकशाहीचे शासनाचे प्रकार -

लोकशाही शासनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

अ) प्रत्यक्ष लोकशाही -

ज्या देशातील सर्व लोक राज्यकारभारात प्रत्यक्षरित्या सहभागी होतात, त्या देशातील शासन पध्दतीला प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात.

उदा. प्राचीन ग्रीक नगरराज्यातील लोकशाही

प्रत्यक्ष लोकशाहीचे फायदे पुढीलप्रमाणे -

१) लोकप्रतिनिधींच्या कृतीवर नियंत्रण येते व ते जबाबदार बनण्यास प्रेरणा मिळते.

२) सुचना अधिकारांमुळे जनतेला अपेक्षित कायदे निर्मिती होऊ शकते. असंतोष, राजकीय अडचणी तसेच रक्तरंजीत क्रांती यांचा धोका टळतो.

३) प्रत्यक्ष लोकशाहीच्या स्विकाराने जनतेचे सार्वभौमत्व या तत्वाची प्रस्थापना होते. जनतेला नको असलेले कायदे टाळता येतात.

४) राजकीय सहभाग प्रत्यक्ष राज्यकारभारात मिळत असल्याने व्यवस्थेबद्दल नागरीकांच्या मनात आस्था व अभिमान निर्माण होतो. त्यांची शासनाशी जवळीक निर्माण होते.

५) प्रत्येक नागरीकास कोणत्या ना कोणत्या पदांवर कार्य करण्याची संधी प्राप्त होते आणि त्यामुळे त्यांच्यात नेतृत्व गुण निर्माण होतात. अशी संधी प्रातिनिधीक लोकशाहीत प्रत्येकास प्राप्त होत नाही.

६) सामाजीक समस्यांबद्दल मतप्रदर्शन व कृती करण्याची संधी नागरीकांना मिळाल्याने ते आत्मकेंद्री न राहता समाजाभिमुख बनतात. अथेन्समधील नागरिकांना आनंदी, मुल्याधिष्ठीत आणि उच्च प्रतीचे जीवन प्रत्यक्ष लोकशाहीने उपलब्ध करुन दिले होते.

७) नागरीकांना समस्या सोडविण्यासाठी सामाजीक अथवा सार्वजनिक समस्या जाणून घ्याव्या लागतात व त्यांची उकल करण्याचे मार्ग व साधने शोधावी लागतात. त्यामुळे त्यांचे राजकीय शिक्षण आपोआप होते.

प्रत्यक्ष लोकशाहीचे तोटे -

१) लोकशाही साधनांच्या नेहमी वापराने प्रशासनामध्ये गतीरोध निर्माण होऊन लोकशाही व्यवस्था तसेच राष्ट्रीय विकास यांना गतिरोध निर्माण होतो.

२) सर्वसामान्य लोकांना विधी नियम निर्मितीत रसही नसतो व त्यांना त्याबद्दल तांत्रीक ज्ञानही नसते. एक उपचार म्हणून खोलवर विचार न करता मतनोंद केल्याने विधिनियम निर्मिती सदोष होते. तसेच या गोष्टींचा गैरफायदा आपला स्वार्थ साधण्यासाठी धंदेवाईक राजकारणी लोक घेतात.

३) आधुनिक लोकशाही साधनांच्या वापरामुळे विधयकांमध्ये जबाबदारीची जाणीव क्षीण होते. कायद्यास घटना दुरुस्तीस अंतिम मान्यता जनता देणार असल्याने विधेयकात काही दोष राहीले तर जनता ते दुर करेल अशी समजूत निर्माण होते. विधिनियम, निर्मिती कार्य या जबाबदारीच्या विभाजनामुळे कार्यक्षमतेने व निर्दोष होत नाही.

४) लोकशाहीतील समतेचे मूल्य प्राचीन प्रत्यक्ष लोकशाहीत मर्यादित झालेले दिसते.

५) प्रत्यक्ष लोकशाही लहान राष्ट्रासाठी उपयुक्त असते. आधुनिक प्रचंड प्रादेशिक व लोकसंख्या जास्त असलेल्या राज्यांसाठी ती उपयुक्त नाही. राजकीय जागृती बेताचीच असलेल्या राज्यांसाठी ती उपयुक्त नाही. राजकीय जागृती बेताचीच असलेल्या समाजात प्रत्यक्ष लोकशाही साधनांच्या वापरांवर मर्यादा येते. उदा. भारतात प्रतिनिधींना माघारी बोलाविण्याचा हक्क दिला तर त्याचा राजकीय सुडबुध्दीने दुरुपयोग होण्याची शक्यता जास्त असते.

ब) अप्रत्यक्ष (प्रातिनिधीक) लोकशाही -

"ज्या देशात लोक विशिष्ट काळासाठी आपले प्रतिनिधी निवडतात व त्या प्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालवितात त्या देशातील शासन पध्दतीला अप्रत्यक्ष लोकशाही (प्रातिनिधीक) असे म्हणतात." अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदिय पध्दत आणि अध्यक्षिय पध्दत असे दोन प्रकार पडतात.

अप्रत्यक्ष लोकशाही ही अशी व्यवस्था आहे ज्यात लोक आपले राज्यकर्ते निवडतात. मात्र तरी या लोकशाहीत एकाच प्रकारची शासनव्यवस्था नसते. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यातील परस्पर संबंध कसे आहेत, यावरुन तिचे दोन प्रकार पडतात.

अ) संसदिय पध्दत :

"ज्या लोकशाही शासन पध्दतीमध्ये कार्यकारी मंडळ हे कायदे मंडळाच्या पाठींब्यावर सत्तेत असते त्या देशातील शासन पध्दतीला संसदिय पध्दत असे म्हणतात." उदा. युनायटेड किंग्डम, भारत इत्यादी.

संसदिय पध्दतीची वैशिष्ट्ये

I) दोन प्रमुख :

संसदिय पध्दतीमध्ये राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुख भिन्न-भिन्न असतात. उदा. भारताचे राष्ट्रपती किंवा इंग्लंडमधील राजा किंवा राणी हे राष्ट्रप्रमुख असतात तर प्रधानमंत्री हे शासन प्रमुख असतात. राष्ट्रपती किंवा राजा आणि प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ यांचे मिळून कार्यकारी मंडळ तयार होते. मात्र राष्ट्रपती अथवा राजा हे नामधारी कार्यकारी प्रमुख असतात तर प्रधानमंत्री हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात.

II) मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने राज्यकारभार :

संसदिय पध्दतीत दोन कार्यकारी प्रमुख असतात. एक नामधारी प्रमुख व दुसरा वास्तविक प्रमुख. देशाचा कारभार नामधारी प्रमुखांच्या नावाने चालतो, त्याच्या आदेशानुसार चालतो, मात्र तरीही प्रत्यक्ष निर्णय हे प्रधानमंत्री व मंत्रीमंडळाकडूनच घेतले जातात. राज्यकारभार विषयक मंत्रीमंडळाने दिलेला सल्ला हा राष्ट्रपती अथवा राजा यांचेवर बंधनकारक असतो.

नामधारी प्रमख कोण आहेत यावरुन संसदिय पध्दतीने दोन प्रकार पडतात.

अ) संविधानिक राजेशाही - उदा. युनायटेड किंगडम

ब) प्रजासत्ताक - उदा. भारत.

III) मंत्रीमंडळाची नेमणूक : मंत्रीमंडळाच्या प्रमुखाला प्रधानमंत्री म्हणतात. प्रधानमंत्र्यांची नियुक्ती राष्ट्रपती अथवा राजा करतो. प्राधानमंत्र्यांच्या इच्छेनुसार राष्ट्रपती अथवा राजा इतर मंत्र्यांची नेमणूक करतो. मंत्र्यांच्या मदतीने प्रधानमंत्री शासन कारभार चालवितात म्हणून त्यांना शासनप्रमुख असे म्हणतात.

IV) सामुहिक जबाबदारी :

संसदेमध्ये बहुमत असलेल्या व्यक्तीला प्रधानमंत्री म्हणून नियुक्त केले जाते आणि संसदेमध्ये बहुमत असेपर्यंत प्रधानमंत्री व मंत्रीमंडळ सत्तेवर राहते.

थोडक्यात मंत्रीमंडळ हे राज्यकारभारासाठी सामुहिकरित्या संसदेला जबाबदार असते. चुकीचा राज्यकारभार चालविणाऱ्या मंत्री मंडळाला संसद सत्तेवरुन खाली खेचु शकते. संसदेची दोन सभागृहे इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्डस आहेत तर भारतात लोकसभा आणि राज्यसभा अशी आहेत.

संस्थेची सभागृह

इंग्लड		**भारत**	
↓	↓	↓	↓
हाऊस ऑफ कॉमन्स	**हाऊस ऑफ लॉर्डस**	**लोकसभा**	**राज्यसभा**
↓	↓	↓	↓
कनिष्ठ सभागृह	**वरिष्ठ सभागृह**	**कनिष्ठ सभागृह**	**वरिष्ठ सभागृह**
↓		↓	
जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह		**जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह**	

हाऊस ऑफ कॉमन्स आणि लोकसभा ही जनतेने निवडून दिलेली सभागृह आहेत. याच सभागृहातील बहुमतामुळे कार्यकारी मंडळ (मंत्रीमंडळ) सत्तेवर राहते. हाऊस ऑफ कॉमन्स आणि लोकसभा या सभागृहांतील सदस्य जनतेकडून निवडून दिले जातात.

ब) अध्यक्षिय पध्दत -

"ज्या देशात एकच कार्यकारी प्रमुख असतात आणि मर्यादित काळासाठी ते थेट जनतेकडून निवडून दिले जातात, त्या देशातील शासन पध्दतीला अध्यक्षिय पध्दत असे म्हणतात." उदा. अमेरिका, फ्रान्स, इ.

या पध्दतीत कार्यकारी प्रमुखांना अध्यक्ष असे म्हणतात. म्हणून या पध्दतीला अध्यक्षिय पध्दत असे म्हटले जाते. राष्ट्रप्रमुख आणि शासनप्रमुख ही दोनही पदे अध्यक्षच भुषवितात. अध्यक्षिय पध्दत समजून घेण्यासाठी तिच्या वैशिष्ट्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

i) एकच कार्यकारी प्रमुख :

अध्यक्षिय पध्दतीमध्ये अध्यक्ष हाच वास्तविक कार्यकारी प्रमुख असतो. संसदिय पध्दतीप्रमाणे येथे नामधारी आणि वास्तविक असे दोन कार्यकारी प्रमुख नसतात. अध्यक्षांना संविधानाने अधिकार दिलेले असतात. कायदेमंडळाने तयार केलेल्या कायद्याप्रमाणे राज्यकारभार चालविणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे.

ii) मंत्रीमंडळाची नेमणूक :

अध्यक्ष आपल्या इच्छेनुसार मंत्री अथवा राजदुत यांची नेमणूक करतात. मंत्रीमंडळातील मंत्री हे कायदेमंडळाचे सभासद असलेच पाहिजेत असे बंधन नसते. कार्यकारी मंडळातील सदस्यांना कायदे मंडळाचे सभासद होता येत नाही. मंत्रीमंडळाला सत्तेवर राहण्यासाठी कायदे मंडळातील बहुमताची गरज असत नाही.

iii) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांचे एकमेकांवरील नियंत्रण :

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ अध्यक्षिय पध्दतीत एकमेकांपासून स्वतंत्र असतात. मात्र तरीही त्यांचे एकमेकांवर नियंत्रण निर्माण करण्यात आले आहे.

कायदेमंडळाने केलेला कायदा अध्यक्षांच्या मंजूरीनंतरच संमत होतो. कायदेमंडळाने मंजूरीसाठी पाठविलेले कायदे नाकारण्याचा अधिकार अध्यक्षांना असतो. यालाच अध्यक्षांचा नकाराधिकार (Veto Power) असे म्हणतात.

याउलट अध्यक्षांनी संविधानाचे उल्लंघन केले तर कायदेमंडळ त्यांना पदावरुन पदच्युत करु शकते.

iv) कार्यकारी मंडळ कायदेमंडळावर अवलंबून असत नाही :

अध्यक्षिय पध्दतीमध्ये सत्तेवर राहण्यासाठी अध्यक्षांना कायदेमंडळातील बहुमताची गरज नसते. कायदेमंडळात बहुमत नाही म्हणून त्यांना राजीनामा देण्याची गरज असत नाही. अर्थात अशा बहुमताअभावी शासनाच्या कामकाजात अडथळे मात्र येवू शकतात.

संघराज्य पध्दत : "ज्या देशात एक शासन राष्ट्रीय स्तरावर व दुसरे शासन प्रादेशिक स्तरावर अशी द्विस्तरीय यंत्रणा असते त्याला संघराज्य पध्दत / व्यवस्था असे म्हणतात.



संघराज्य म्हणजे काय?

"घटकराज्यांचे हक्क व स्वायत्तता सुरक्षित ठेवून संपूर्ण देशाचे राजकीय ऐक्य साधणारी यंत्रणा म्हणजे संघराज्य होय."

संघराज्याचा इतिहास -

मध्ययुगातील युरोपात संघराज्याचे ऐतिहासिक संदर्भ सापडतात. तेथे प्रबळ शत्रुचा सामना करण्यासाठी किंवा सामायिक समस्या सोडविण्यासाठी काही घटक एकत्र आले. या व्यवस्थेत अनेक शतके बदल होत गेले व अंतिमत: एक एकसंध व्यवस्था तयार झाली. हीच संघराज्य व्यवस्था होय.

संघराज्य पध्दतीची वैशिष्ट्ये -

संघराज्य पध्दत समजून घेण्यासाठी तिची वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे.

१) द्विस्तरीय शासनव्यवस्था -

काही देश आकाराने मोठे असतात व त्यात अनेक प्रदेश असतात. अशा देशांमध्ये एका शासनामार्फत संपूर्ण देशाचा कारभार चालविणे अवघड असते. म्हणून या देशांमध्ये शासन व्यवस्था द्विस्तरीय असते. एक शासन राष्ट्रीय स्तरावर (केंद्र सरकार, संघशासन, संघराज्यवाद) व दुसरे शासन प्रादेशिक स्तरावर (राज्यशासन, घटकराज्य सरकार) असते.

थोडक्यात संघराज्यात दोन स्तरावरुन शासन यंत्रणा राबविली जाते.

२) सत्ता विभाजन :

संघराज्य पध्दतीमध्ये केंद्रशासन आणि घटकराज्य शासन यांच्यात संविधानाद्वारे सत्तेचे विभाजन केलेले असते. उदा. अमेरिकन संविधानात केंद्र सरकारचे अधिकार स्पष्टपणे नमुद केलेले असुन उर्वरीत सर्व अधिकार घटकराज्य सरकारांना देण्यात आले आहेत. भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टानुसार तीन सूचींद्वारे केंद्र सरकार व घटकराज्य सरकारे यांत अधिकारांची वाटणी करण्यात आली आहे. या सत्तेच्या विभाजनात बदल करावयाचा असेल तर दोन्ही शासनांची संमती घ्यावी लागते.

संघराज्य निर्मितीच्या दोन पध्दती -

ii) एकत्रीकरणातुन आलेले संघराज्य :

"मुलत: स्वतंत्र व स्वायत्त असलेली राज्य आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी किंवा इतर हेतुने एकत्र येतात व एक नविन प्रबळ राज्य अस्तित्वात आणतात त्या राज्याला एकत्रीकरणातुन आलेले संघराज्य असे म्हणतात. " उदा. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ.

२) एकत्र धरुन ठेवणारे संघराज्य :

"मुलत: एकात्म व एकसंघ असलेल्या राज्याचे राज्यकारभाराच्या सोयीसाठी छोट्या-छोट्या घटकराज्यांमध्ये विभाजन केले जाते त्या राज्याला एकत्र धरुन ठेवणारे संघराज्य असे म्हणतात." उदा. भारत स्वातंत्र्याच्या वेळी भारत अखंड एक होता मात्र पुढे भाषेच्या आधारावर घटकराज्य नियंत्रण करण्यात आली. थोडक्यात भारतात केंद्रीय सत्तेने नविन राज्ये तयार केली.

३) एकात्मतेकडे झुकणारे संघराज्य -

भारतात सत्ता विभाजनामध्ये केंद्र सरकारला अधिक अधिकार दिले आहेत. म्हणून भारतीय संघराज्याला एकात्मतेकडे झुकलेले संघराज्य असे म्हणतात. भारतीय संघराज्यात केंद्र सरकारच्या अधिकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. तर घटकराज्यांना केंद्र सरकारवर जास्तीत जास्त अवलंबुन रहावे लागत असलेले दिसते. भारताची अखंडता राखण्याच्या दृष्टीने घटकराज्यांना भारतीय संघराज्यातुन फुटुन बाहेर जाण्याचा अधिकार नाही. केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आलेली आहे. महत्वाची खाती ही केंद्रसरकारकडे आहेत. काही विशेषाधिकार सुध्दा केंद्र सरकारच्याच अखत्यारीत येतात. घटक राज्यांना सर्वोच्च न्यायालय नाही. संपूर्ण देशासाठी एकच सर्वोच्च न्यायालय आहे. केंद्राचे घटक राज्यांवरील वर्चस्व निर्विवादपणे मान्य करण्यात आले आहे. भारताच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता असे दिसून येते की, भारत शांततेच्या काळात संघराज्य असले तरी युध्दजन्य व आणीबाणीच्या काळात एकात्म शासकीय प्रणाली होऊ शकेल अशी तरतुद भारतीय घटनेत करण्यात आली आहे.

मूल्यमापन :

संविधान हा सर्वश्रेष्ठ कायदा आहे. तो सरकारचे अधिकार, व्यक्तीचे अधिकार, व्यक्ती व सरकारचे परस्पर संबंध, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांचे अधिकार, त्यांचे परस्पर संबंध तसेच त्यांचे अधिकार व एकूणच व्यवस्थेचे कार्य व उद्देश नियमाने निश्चित करण्यात येतात. घटनावादात सरकारच्या अधिकाराच्या संदर्भात मर्यादा तर असतातच पण

त्या मर्यादा त्यांनी ओलांडल्यानंतर त्यांची कृती घटनाबाह्य घोषित करण्याचे अधिकार देखील संस्थेने दिलेले असतात. घटनेमुळेच सरकार सार्वभौम होत नाही तर जनतेचे निश्चित मुदतीसाठी 'विश्वस्त' होते.

संविधान निर्माण करतांना प्रत्येक देशांनी त्या देशातील प्रमुख गोष्टींचा समावेश घटनेत केला. उदा. भारताने समता निर्माण करण्यासाठी राखीव जागांची तरतूद केली. शासनाने कोणती कामे करावीत याचे मार्गदर्शन मार्गदर्शक तत्वाद्वारे केले. जगामध्ये आजही काही देशात संसदिय लोकशाही पध्दती अस्तित्वात नाही. काही देशात राजेशाही आहे. काही देशात लष्करी राजवट आहे. काही देशात धर्मांध सत्ता आहे. या सर्व लोकशाहीविरोधी व्यवस्था आंतरराष्ट्रीय शांततेस धोकादायक आहेत. दहशतवाद हा घटनावादास नविन धोका निर्माण झाला आहे. त्याचा मुकाबला जगातील सर्व लोकशहीवादी राष्ट्रांनी करणे गरजेचे आहे. उज्वल भविष्यासाठी त्याची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१.प्रा. कुलकर्णी अ.ना. - आधुनिक राजकीय विचारप्रणाली विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती १९९७
२.प्राचार्य डॉ. देवरे पी.डी.-राजकीय विचार प्रणाली डॉ. विसपुते एस.एम. प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव डॉ. निकम डी.एस. प्रथमावृत्ती जून २००३
३.डॉ. भोळे भा.ल.-राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर १९८०
४.प्रा. नाईकवाडे अशोक-राज्य आणि राजकीय संस्था विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद
५.डॉ. गुडगे-बेनके सुवर्णा-राजकीय सिध्दांत प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव प्रथम आवृत्ती - २०१४
६.प्रा. मुठाळ राम-राजकीय सिध्दांत अंशुल पब्लीकेशन्स, नागपूर प्रथमावृत्ती - २००२
७.डॉ. दिवाण चंद्रशेखर-राजकीय सिध्दात आणि राजकीय विश्लेषण विद्या प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती जून १९८९

मराठी कवितेतील आधुनिक कालखंडातील स्त्री चित्रण

साईप्रसाद मधुकर पंडीत

संशोधक विद्यार्थी, दयानंद कला महाविद्यालय,लातूर.

सारांश :

आजपर्यंत मानवी जीवनात अनेक बदल घडत गेले. या बदलात मानवाची भूमी काही बदलत गेली. अनेक स्थित्यंतरे आली. तसे मानवी जीवनात स्त्री आणि पूरुष या दोघांचे स्थान तेवढेच महत्त्वाचे आहे पण या दोघांच्या भूमिकेत मात्र तफावत दिसते. त्यांच्या अधिकारात, मर्यादेस अनेक पैलू दिसतात. धर्म, अर्थ, काम या वेगवेगळया वेळी स्त्री आणि पूरुष यांच्यात अनेक वेळा भेद केलेला दिसतो. पुरुषाला अधिक महत्त्व तर याच कामामध्ये स्त्रीयांना दिलेले दुय्यम स्थान आपणास पहावयास मिळेल. नेहमीच या व्यवस्थेचा प्रमुख म्हणून पुरुषाकडे पाहिलं जात. तर स्त्रीयांचे स्थान दुसऱ्या म्हणजेच दुय्यम स्थानी ठेवले गेले. ऐकूनच स्त्री जीवनाची अनेक वेळा दूर्दशा पहावयास मिळाली तर हे योग्य नाही. निसर्गातील हे दोन्ही घटक समान असून तेवढेच महत्त्वाचे आहेत.

बदलत्या कालानुसार समाजात विविध बदल घडत गेले. या बदलाचाच भाग म्हणून या मध्ये भौतीक, सामाजीक, आर्थीक प्रगती झालेली दिसते. स्त्रीयांविषयी देखील समाजाची मते, भुमिका बदलत गेलेली दिसते. या बदलत्या काळानूसार स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोण देखील बदलत गेला. याच बंधनात, अन्यायात असनाऱ्या स्त्रीत्वाला मोकळा श्वास घेण्याच्या मताचे प्रवाह निर्माण होवू लागले. व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना पूढे आली. वैचारीक क्रांतीचे, विचाराच्या परिवर्तनाचे पर्व येवू लागले. याचमूळे समाजातील स्त्रीयांचे स्थान सुधारण्यास सुरूवात झाली. संस्कृतीत स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व आहे पण हेच महत्त्व प्रत्यक्ष जीवनात स्त्रीला मिळते का ? तर नाही प्रत्यक्षात मात्र स्त्रीच्या वाटयाला कनिष्ट दर्जाच आलेला दिसतो.

या समाजाच्या अनेक परंपरा, रूढी, प्रथा याच्या प्रघातात ही स्त्री जखडलेली दिसते. इंग्रज काळापासूनच स्त्री जागृतीचे प्रयत्न वेगाने होताना आपणास दिसतील. स्त्रीयांच्या स्वतंत्र अस्मितेसाठी सावित्री बाई फुले यांच्या सारख्या थोर विभूतिंनी प्रयत्न केलेले दिसतात. या समाजाने प्रथेच्या नावाखाली लादलेली बंधने ही स्त्रीयांच्या हक्कावर गदा आणतात. यामध्ये बालविवाह, सती सारख्या अनिष्ठ प्रथा होत्या. नव्वदच्या दशकात स्त्रीयाच्या उध्दाराला पूरक दिशा प्राप्त होताना दिसते या सर्वांचे पडसात आपल्याला या स्त्री चित्रण करणाऱ्या काव्यातून दिसून येतात.

आधुनिक काल खंडात या स्त्रीला नविन ओळख प्राप्त होताना दिसते. स्त्री ही एक शक्ती आहे तीचे महत्त्व, मर्यादा, उपेक्षा, त्रास, भोग, स्थान हया बाबी सागणारे बोलके काव्य या काळात आपणास पहावयास मिळतील. या शोध निबंधाच्या माध्यमातून आपणास आधुनिक स्त्रीचे जीवनावर आधारित काव्याचा अभ्यास करता येनार आहे. या माध्यमातून या काव्यात आलेली स्त्री जीवनाची व्यथा समजून घेता येणार आहे. यासाठी हा शोधनिबंध उपयुक्त आहे.

प्रमुख शब्द :

मराठी, कविता, आधुनिक, कालखंड, स्त्री, स्त्रीचित्रण.

प्रस्तावना :

स्त्री आणि पुरुष यामध्ये पुरुषाचे पुरुषार्थ आणि स्त्रीयांचे पातिव्रत्य असे मूल्य जपणाऱ्या समाजात बदलत्या काळानूसार बदल मराठीत काव्याच्या माध्यमातून देखील अनुभवता येतात. स्त्री पुरुषांची धेय व कार्यक्षेत्र ही विविध गणली जायची यामध्ये साम्य येण्यासाठी स्त्रीयांना प्रचंड संघर्षाचा सामना करावा लागला. अनेक समस्यांच्या गर्तेत अडकलेली स्त्री या आधुनिक काळाच्या सुरुवातीला काहीशी मोकळा श्वास घेतानाही दिसते. मात्र वर्षानु–वर्षे चालत आलेले दु:ख, हाल, उपेक्षा काही तीची पाठ सोडायला तयार नाहीत. स्त्रीयांनी शिक्षण घेतल्या शिवाय त्या उन्नती करु शकणार नाहीत असा विचार समोर येवू लागला, अनेक समाज सुधारकांनी या कर्मठ प्रवृत्तीवर हल्ला चढविला तो स्त्रीयांच्या न्याय हक्का साठीच. स्त्री जागृतीच्या दृष्टीने पडलेले पावूल हे अतिशय महत्त्वाचे ठरले.

समाजातील व्यवस्थेत कुटूंबातील स्त्री यांचे स्थान, त्यांचा मान स्त्री जन्माचे स्वागत स्त्रीयांना दिली जाणारी वागणूक ही अतिशय भयावह अशीच होती. ती काल दु:खात असलेली स्त्री आज देखील तोच त्रास सहन करते आहे. या भावना मराठी काव्यातून प्रकर्षाने जाणवतात. स्त्री समानतेचा, स्त्री मुक्तीचा लढा हा मानवतेचा लढा आहे. या भावना समजून घेने खूप महत्त्वाचे आहे. आपले आयूष्य दूसऱ्यासाठी, कूटूंबासाठी देणे, मन मारुन जगने, इच्छा मारने, पारतंत्र्य स्वीकाने यातून या जगन्याला काय अर्थ राहतो, आता या सर्वातून बाहेर पडता आले पाहीजे या त्रासातील स्त्रीच्या भावना या मराठी काव्यातून जीवंतपणे अनुभवन्यास मिळतात.

आज देखील अनेक वेळा स्त्रीला मानवतेची वागणून मिळत नाही. अशा बिकट परिस्थतीतील स्त्री मनाचा ठाव घेणाऱ्या भावना या काव्यातून प्रकट होताना दिसतात. या शोध निबंधाची व्याप्ती ही मराठी आधुनिक कवितेतील स्त्रीयांच्या जीवनाशी निगडीत, भावनेशी निगडीत असलेल्या काही काव्याशी मर्यादित आहे, हिच या शोधनिबंधाची व्याप्ती आणि मर्यादा आहे. आधुनिक कालखंडातील मराठी काव्यातील स्त्री चित्रण अभ्यासने हा या शोधनिबंधाचा उददेश आहे. स्त्रीयांच्या भावना, व्यथा समजून घेणे हा याचा उददेश आहे, मराठी काव्यात आलेले स्त्री चित्रण आणि त्याचे बदलते रुप अभ्यासने हा शोधानिबंधाचा उददेश आहे.

मराठी कवितेतील आधुनिक कालखंडातील स्त्री चित्रण :

साहित्या मध्ये, मराठी काव्यामध्ये स्त्रीची अनेक रुपे आपणास पहावयास मिळतात. काही वेळा स्त्री ही आकर्षक स्वरुपात आपणास या काव्यात पहावयास मिळते तर काही वेळा हीच स्त्री अतिशय त्रासात, कष्टात आणि वेदनेत दिसते. स्त्री हा सुरुवातीपासूनच महत्त्वाचा विषय राहिलेला आहे. यावर विपूल लेखन झालेले आपणास पहावयास मिळते. स्त्रीयाविषयी या काव्यात काहिवेळा सहानुभूती, प्रेम असल्याचे भाव आपणास दिसतील. तर काही काव्यात स्त्री बंधनाचे वास्तव चित्रण केलेले आपल्याला दिसून येईल. चंदनासारखी आपल्या कुटूंबासाठी झिजनारी स्त्री आपणास या काव्यातून दिसेल. ती किती व्यथेत आहे हे या काव्यातून दिसून येईल. परंतू आधुनिक काळात स्त्री सुधारनेसाठी प्रयत्न होताना दिसले यामध्ये स्त्रीला न्याय मिळावा यासाठी वाचा फोडण्यात आली.

''टाकने आपल्या दुराग्रह जुना । मर्मी तसा विंधुनी ।।
स्त्रीजातीस असाच काढ वरती । घे किर्ती संपादुनी।।''

(समग्र केशवसूत)

या केशवसुताच्या कवितेतून स्त्री सुधारणांविषयीची जाणीव प्रकट होताना दिसते. तरी ही स्त्री अतिशय मोठया त्रासात जीवन जगताना दिसते तीच्या भावना खूप विकोपाच्या झालेल्या दिसतात. ती स्वत:लाच दुषने देताना थकत नाही.

''मी जगाचे पाप

की जगाला शाप
मी पापाची कूस
की तापलेली मूस
मी योग्यासी अडथळा
की ज्ञान्याशी चित्कळा
मी भोग्यासी पर्युषिता
की जगाची पाकुळता''

(सौ.लीला धनपलवार)

अशा भावनेत विरत, झुरत स्वत:ला दुषने देत दु:ख सागरात ही स्त्री झुरताना दिसते. खरे तर या जगात आनंदाने जगण्याचा हक्क तीलाही आहे. पण या समाजाने तो हक्क विनाकारण हिरावून घेतला आहे असे जाणवते. ती स्वत:ला पाप संबोधते यातत किती दु:ख दडले आहे. येवढे होवूनही ती आपली सगळी कर्तव्य पार पाडताना दिसते. सर्वांना सांभाळून घेताना दिसते. ती गृहीनी लेकरा बाळांना सांभाळते, घरात रमते. ती या घरात नांदते हेच किती बरे सौभाग्य असेच म्हणावे लागेल.

''कधी रुसते, कधी हसते
लेकरामध्ये कधी रमतेसी...
ही अपुर्व शक्ती सगुण
झाडितसे मम अंगण
हे भाग्य बघुन
जळफळतील देव ही ते ''

(तांबे भ.रा.एक अध्ययन)

या काळात अनेक सुधारणा होताना आपणास दिसतात परंतू स्त्रीयांची परिस्थिती जी काल तीच आज असे का असा सवाल पडलेला दिसतो. प्राचिन काळापासून दु:खात असलेल्या स्त्रीच्या वाटयाचे दु:ख संपणार तरी कधी, कोण बरे न्याय देईल याला याचा ठाव काही लागेना अशी परिस्थिती या काव्यातून प्रतित होते. आजही स्त्री जन्मास स्विकारण्यास टाळाटाळ का होते. काय पातक केले म्हणून स्त्री जन्म मिळाला असे का वाटते ? अश्या स्त्री जन्माच्या व्यथा या काव्यातून अगदी जीवंत पणे अनुभवता येतात.

''लेक झाला खुशी झाली । आजा वाटे साकरपान ।।
लेकी तु वाग जलम । माय लळे बाळातीन ।।

(प्रतिमा इंगोले)

''लेकीचा जलम जणू । फुटणारी लाही ।।
खाणारा म्हणतो कशी । भाजलीच नाही ।।

(इंद्रजीत भालेराव)

या लेकीच्या जन्माला व्यथा माननारे लोक इथे काव्यातून आपणास समजतात. येवढेच नाही तर स्त्रीयांना या स्त्री जन्माचेही ओझे वाटते हा जन्मच त्रास वाटतो.

''बाई जन्माचे धिंदोडे

सांगू कसे, झाकू कसे ?
चुलीतल्या गोवरीला
चुलीमंधी जळायचे ।''

(ना.धो.महानोर)

अश्या कठोर शब्दात स्त्री जन्माचे वास्तव आणि दु:ख इथे या काव्यातून दिसते आहे. अशा सर्व कवितांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास यामधून दिसणारी, समजणारी स्त्री प्रतिमा ही दु:खी आहे, कष्टी आहे हे जाणवते. ही स्त्री म्हणते की या दु:खा पासून मी कालही वंचीत नव्हते आणि आजही मी याच दु:खात आहे हे मानवतेचे हक्क मला केव्हा बहाल होतील का माझ्या नशिबी फक्त रडणेच लिहिलेले आहे का ? असे या स्त्रीला वाटते.

''अरे ! हया दरिद्री समाजात कोणी कुणाला समजावून घेतले
रामालाही सीता समजली नाही
म्हणून तर तिला अग्निदिव्य करावे लागले !
हरिश्चंद्रानेही तारामतीला कष्टी केले
उर्मिलाही जिवंत मरण भोगीत होती !
अहिल्येलाही शिळा व्हावे लागले
कृष्णासाठी झुरणाऱ्या मीरेलाही नवऱ्याने विष दिले !
त्यांच्या समोर आपण कृमिकीटके
मग आपल्याही नशिबी रडणेच बरे.''

(भारती पोळ)

या समाजाने कधीच स्त्रीला मानवतेने वागवले नाही. ऐवढे मोठी माणसे जर यातनेने जगली तर त्या समोर आम्ही कोण अश्या भावना यातून दिसून येतात. या समाजातील स्त्रीया हया कायम बंधनात राहत आल्या आहेत तरी देखील त्या सर्वांना सदैव आनंद, सुख, प्रेरणा देण्यास प्रयत्नशिल असतात हे विशेष.

निष्कर्ष :

स्त्री जीवनाचे वास्तव दर्शन या कवितांच्या माध्यमातून घडते. समाजातील स्त्रीया किती दु:ख सहन करतात याचे चित्र आपल्या समोर या काव्याच्या माध्यमातून उलगडते. मानवतेच्या वागनुकीसाठी या स्त्रीयांचा लढा आपणास दिसतो. समाजातील स्त्रीयांचे स्थान, ग्रामीण जीवनातील स्थान त्यांची स्थिती याचे चित्रण दिसते. ऐवढया सर्व आव्हानांना तोंड देत तरी स्त्री आपल्या कुटूंबासाठी कशी आनंदाने आणि खंबीरपणे उभी आहे हे जाणवते. स्त्री जीवनाचे बदलते स्वरुप त्यातील भावना उलघडल्या. मूलीच्या जन्माचे वास्तव समोर आले आणि त्याचे चित्रण काव्यातून अनुभवता आले. अश्या प्रकारे मराठी कवितातील स्त्री चित्रण अभ्यासता आले.

संदर्भ सूची :

१) मराठवाडयातील कविता : फ.म.शहाजिंदे निर्मल प्रकाशन, नांदेड.
२) कुण बिनीची कहानी, इंद्रजीत भालेराव
३) 'मराठी वाडमयाचा इतिहास'
४) स्त्रीवादीकविता – विकिपीडीया

घटस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा तात्त्विक अन्वयार्थ

सुरेखा भालचंद्र कुलकर्णी
संशोधिका
श्री महात्मा बसवेश्वर महाविद्यालय

डॉ. किर्तनकर प्रभाकर
संशोधन मार्गदर्शक, तत्त्वज्ञान विभाग
एस. एस. पी. पवार महाविद्यालय, पूर्णा. लातूर.

प्रस्तावना

घटस्फोट संकल्पनेचा तात्त्विक अन्वयार्थ या विषयाचे अध्ययन करताना घटस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यावर प्रकाश टाकण्यात येत आहे. भारतात विवाह व कुटुंब संस्था मूलभूत स्वरूपाची आहे. पूर्वीपासूनच कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. त्याचा परिणाम स्त्रियांचे विविध प्रश्न वाढत गेले. त्यातील महत्त्वाची समस्या म्हणजे घटस्फोटाची समस्या होय. घटस्फोट समस्येस तोंड देणे कठीण झाले. घटस्फोटामुळे कुटुंब व विवाह संस्थेच्या स्थैर्याला धोका पोहचत आहे. कुटुंबात तणाव निर्माण होत आहे. पाश्चिमात्त्य देशाप्रमाणेच भारतात देखील लहान-लहान कारणांसाठी घटस्फोट घेतले जात आहेत. त्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. सद्य:स्थितीत घटस्फोटामुळे विविध समस्या निर्माण होत आहेत. घटस्फोट म्हणजे विवाहामुळे पती-पत्नी म्हणून निर्माण झालेले संबंध समाज मान्य रितीने समाप्त करण्याची पद्धती होय. घटस्फोट ही कुटुंब विघटन प्रक्रियेतील अंतिम अवस्था आहे. कारण विवाहामुळेच कुटुंब निर्माण होते. घटस्फोटामुळे वैवाहिक संबंधाची समाप्ती होत असल्यामुळे कुटुंबाचे विघटन होते. कुटुंब विघटनातून विविध समस्या उत्पन्न होतात. ज्या घराला स्त्री आपले मानते. माहेरचे सर्व संस्कार मागे सोडून लग्नानंतरच्या घराला आपले मानते. सासरकडील सर्व व्यक्ती नवीन असतात. त्यांचे स्वभाव माहित नसतात, त्यांची नाती प्रेमाची आहेत किंवा नाहीत हेही तिला माहित नसते. कालांतराने काही ना काही कारणामुळे सबंध तणावपूर्ण होत असतात. एकमेकांशी अबोला धरीत असतात. घरांमध्ये नव्याने आलेल्या स्त्रीचा कोंडमारा होतो. मानसिक त्रास दिला जातो व शेवटी घटस्फोट दिला जातो.

घटस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यावर प्रकाश टाकण्यात येत आहे. घटस्फोट ही एक प्रक्रिया असल्यामुळे सामाजिक समस्या ठरली आहे. घटस्फोट संकल्पनेचा अभ्यास करताना घटस्फोटाच्या संदर्भात प्रामुख्याने ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या म्हणजे नैतिक समस्या, पर्यावरणीय समस्या आणि इतर समस्या या समस्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

(अ) नैतिक समस्या :

घटस्फोटामुळे विविध समस्या निर्माण होत आहेत. यापैकी नैतिक समस्या ही प्रमुख आहे. पाश्चिमात्त्य सभ्येतेमध्ये नितीविचारांना हजारो वर्षांचा इतिहास आहे. 'सोफिस्ट' परंपरेतल्या विचारवंतांनी सद्‌गुणांचे स्वरूप काय आहे, माणसाने सद्‌गुणी असावे म्हणजे प्रत्यक्षात नेमके कसे असावे? यासारखे अनेक प्रश्नांची उत्तरे देण्याचे काम केले. तत्त्वज्ञान, राजकारण, प्रशासन आणि समाज यांत नीतिमूल्यांची रूजवणूक करण्यात महत्त्वाची भूमिका आहे. भारतात देखील नैतिकतेचा विचार फार प्राचीन काळापासून दिसून येतो. भारतात नैतिकतेच्या उदयाची मुळे समृद्ध पारंपरिक वारशात शोधावी लागतात. विविध धर्मग्रंथ, महाकाव्ये, वेद, उपनिषदे यात मानवाला सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी नैतिक हितोपदेश करण्यात आला आहे. नैतिकता हे सभ्य समाजाचे एक सुलक्षण आहे. नीतिमत्तेशिवाय समाजाची कल्पना संभवत नाही. नैतिकतेमधूनच व्यक्तीच्या ठिकाणी संचारलेला उत्साह सांसर्गिक बनतो. तो सभोवतालचे वातावरण प्रफुल्लित करून प्रत्येकाला सकारात्मक कार्य करण्याची प्रेरणा देतो. निरूत्साह, उदासीनता, बेजबाबदार वृत्ती व नकारात्मकता नष्ट करून सामाजिक बांधिलकी प्रस्थापित करण्यात नैतिकता या मूल्याला अग्रगण्य स्थान आहे.

नैतिकता ही सापेक्ष संकल्पना आहे. एका व्यक्तीच्या दृष्टिकोनातून असलेली नैतिकता ही दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून अनैतिकता असू शकते. यामुळे व्यक्तिपरत्त्वे नैतिकतेचे संदर्भ बदलतात. भारतातील समाज सुधारकांनीही सुसंस्कृत नीतिमान पिढी घडविण्याचा प्रयत्न केला. त्यात 'गोखले', 'न्या.रानडे', 'आगरकर', 'राजा राममोहन रॉय', 'विठ्ठल रामजी शिंदे', 'डॉ.आंबेडकर', 'जयप्रकाश नारायण' यांचा विचार करावा लागतो. 'लोकनायक जयप्रकाशांनी' संपूर्ण क्रांतीची सैद्धांतिक मांडणी करताना नीतिमत्तेला श्रेष्ठ स्थान दिले होते. शाहू-फुल्यांचे जीवन नैतिकतेला समर्पित होते.[४] तरीपण भारतात

नीतिमत्ता ही सद्य:स्थितीत दिसत नाही. अनितीमुळे विविध सामाजिक समस्या घडत आहेत. विशेषत: घटस्फोट समस्या हे नैतिकतेशी संबंधित आहे. घटस्फोट संकल्पनेच्या अन्वयार्थाच्या अंतर्मुख होऊन शोध घेतल्यास खालील नैतिक समस्या उदयास आल्या आहेत.

०१. महापुरुषांच्या कार्यास बाधा होईल.

०२. नैतिक अध:पतन होते.

०३. नैतिक स्वरूपाचा भावनिक आधाराचा विलोप

०४. काम पुरुषार्थांची संकल्पना अर्थहीन ठरते.

०५. सामाजिक दुरितांची समस्या निर्माण होईल.

(ब) पर्यावरणीय समस्या :

घटस्फोटामुळे केवळ नैतिक समस्याच निर्माण होते असे नाही तर, पर्यावरणवादी अभ्यासकांच्या मते, घटस्फोटाची परिणीती ही जटील अशा पर्यावरणीय समस्या निर्माण करण्यामध्येसुद्धा होते. विविध प्रकारची जीवसृष्टी तसेच मानवी समुह वा समाज ज्या परिसरात राहतात त्या परिसरातील सर्व घटकांना पर्यावरण असे म्हणतात. बाह्य परिस्थितीचे म्हणून जे नैसर्गिक घटक संभवतात त्याचा समावेश होतो. पर्यावरण भौतिक व जैविक घटकाचे बनलेले आहे. पृथ्वीवर वनस्पती, मानव व इतर प्राणी ज्या पर्यावरणात वास्तव्य करतात, त्या पर्यावरणातील विविध घटकात संतुलन प्रस्थापित झालेले असते. औद्योगिक प्रगतीमुळे मानवाचा निसर्गातील म्हणजे पर्यावरणातील हस्तक्षेप वाढला आहे. या अविवेकी हस्तक्षेपामुळे विविध समस्या निर्माण होत आहेत. विशेषत: पर्यावरणात वातावरण, भू-आवरण आणि जलावरण या तीन अजैविक घटकांचा आणि जीवावरण या जैविक घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक निसर्गनिर्मित आहेत. मानवजातीचे सुरक्षित व सुखदायक अस्तित्त्व हे पूर्णत: पर्यावरणातील नैसर्गिक घटकांवर अवलंबून आहे.

'मिशिगन स्टे' विद्यापीठातील प्रोफेसर 'जिंगआओ लियू' हे प्रसिद्ध पर्यावरण शास्त्राचे अभ्यासक आहेत. त्यांच्या मते, घटस्फोटामुळे केवळ वैवाहिक जीवन उद्ध्वस्त होत नाही तर त्याचा पर्यावरणावरही दुष्परिणाम होऊन पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणावर होते. त्या आधारे त्यांनी घटस्फोट व त्यामुळे पर्यावरणावर होणाऱ्या दुष्परिणामाचे विश्लेषण केले आहे. हे विश्लेषण 'नॅशनल अॅकडमी ऑफ सायन्स' च्या डिसेंबर २००७ च्या ऑनलाईन अंकात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या संदर्भात त्यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे नमूद करता येईल.

१. पर्यावरणाचा ऱ्हास होईल.

२. निसर्गाचे संतुलन ढाळून पर्यावरण धोक्यात येईल.

३. जंगलतोड व घरे बांधणे यात वाढ होईल.

४. विजेची उपकरणे वापरण्यात वाढ होईल.

५. इंधन वापरण्यात दुप्पट वाढ होईल.

उपरोक्त समस्या घटस्फोटामुळे घडत आहेत. मानव आणि पर्यावरण यांचा घनिष्ट संबंध आहे. मानवाचे अस्तित्त्व पर्यावरणावर अवलंबून आहे. पर्यावरणाच्या सान्निध्यात मानवांची वाढ होत असते. मानवनिर्मित घटस्फोट ही समस्या आहे. घटस्फोटामुळे मानव नवीन कुटुंबाची निर्मिती करतो. नवीन जलस्रोतांची निर्मिती करतो. नवीन विजेची निर्मिती करत असतो. याकरिता पर्यावरणाची हानी होत आहे.

इतर समस्या :-

(१) बाल संगोपनाची समस्या निर्माण होईल.

घटस्फोटामुळे कौटुंबिक विघटन होत असते. कौटुंबिक विघटनामुळे बालकांवर प्रतिकुल परिणाम होत आहेत. ग्युलिक या तत्त्वेवेत्यांनी विघटित कुटुंबात बालगुन्हेगार मुले निघत आहेत असे विवेचन केले. म्हणजेच बालगुन्हेगार घटस्फोटित

कुटुंबातील आहेत. कारण कोणत्याही घटस्फोटाची पार्श्वभूमी बालकांच्या आई-वडिलांमधील संघर्षाची असते. बालकांचा योग्य विकास होण्यासाठी बालकास आईच्या संगोपनाची तसेच विकासाच्या प्रत्येक अवस्थेत वडिलांच्या उपस्थितीची जरूरी असते. वडिलांमुळे बालकाला सुरक्षित वाटते. बालकाचे आईशी तसेच वडिलांशी तादात्मीकरण होत असते. वडील बालकांच्या प्रेमाची प्रतिक असतात व त्यांच्यामुळे त्यांच्या आक्रमक वृत्तींना वाव मिळत असतो. घटस्फोट घडतात तेव्हा बहुतांशी मुलांना आपल्या वडिलांना मुकावे लागते. वडिलांच्या अनुपस्थितीचा बालकांवर परिणाम नाही झाला तर नवलच. ही अनुपस्थिती जर घटस्फोटामुळे असेल तर मानसिक परिणाम जास्त तीव्र असतात. बालकांच्या मनात घटस्फोटामुळे आपल्या आई-वडिलांविषयी वैरत्वाची, द्वेषाची भावना निर्माण होते. वडील आपल्याला सोडून निघून गेले म्हणून त्याला त्यांचा एकीकडे राग येतो तर दुसरीकडे त्यांच्याविषयी प्रेम वाटते, निष्टा वाटते, म्हणून अपराधीपणाची जाणीवपण निर्माण होते.

(२) पुन:र्विवाहाची समस्या निर्माण होईल.

घटस्फोटामुळे पुन:र्विवाहाचा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होतो. पती-पत्नी घटस्फोट घेऊन विभक्त जीवन जगत असतात. असे जीवन जगताना त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. काही व्यक्ती त्यांना सतत पुन:र्विवाह करा! असा सल्ला देत असतात. त्यामुळे काही घटस्फोटित व्यक्ती पुन:र्विवाह करण्यास तयार होतात. विशेषत: पुन:र्विवाह करण्यास पुरुष वर्ग लवकर तयार होतो. परंतु पुरुषांचादेखील पुन:र्विवाह सहजासहजी लवकर होत नाही. कारण, घटस्फोट झाल्यामुळे घटस्फोटित व्यक्तींना पुन:र्विवाहासाठी मुलगी देण्यास कुणीही तयार होत नाही. ती मुलगी देखील घटस्फोटित अथवा विधवा असेल तर पुन:र्विवाह करीत असते. पुन:र्विवाह करताना पुरुषांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी, त्यांची वागणूक, त्यांचे राहणीमान, त्यांचा व्यवसाय या सर्व बाबींचे निरीक्षण करूनच विवाह करण्यास तयार होत असतात. परंतु, घटस्फोटित पुरुषांना किंवा स्त्रियांना लहान मुल असतील तर त्यांचा पुन:र्विवाह होणे अशक्यप्राय ठरत आहे.

(३) कौटुंबिक विघटनाची समस्या निर्माण होईल.

घटस्फोटाच्या समस्येमध्ये कौटुंबिक विघटनाचा समावेश होतो. कौटुंबिक संबंधावर विपरीत परिणाम होतो. तसेच कुटुंबातील सदस्यांमध्ये नेहमी संघर्ष उद्‌भवत असतो. या संघर्षाचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होत असतो. यामुळे व्यक्तीच्या हातून अनैतिक कृत्ये होत असते. त्याकरिता कुटुंब व समाजात व्यक्तीने कसे वागावे या संदर्भात नीतिमूल्ये मार्गदर्शन करीत असतात. तसेच व्यक्तीने योग्य वर्तन करावे या संदर्भात प्रमाणके, नीतिमूल्ये व सामाजिक आदर्श याप्रमाणे वर्तन करणे अपेक्षित आहे. घटस्फोटामुळे व्यक्तीच्या वर्तनात बदल होत आहे. त्यामुळे सामाजिक नीतिमूल्यांमध्ये संघर्ष निर्माण झालेला दिसून येत आहे. परिणामी अनेक कौटुबिंक समस्या निर्माण झालेल्या पहावयास मिळत आहेत. कौटुंबिक विघटन झालेल्या कुटुंबातील सदस्य मन मानेल तसे वागत आहेत. कर्तव्याची व आपुलकीची भावना त्यांच्यात दिसून येत नाही. यामुळे कौटुंबिक ऐक्य व शांतता नष्ट होत आहे. या परिस्थितीला कुटुंब विघटन असे म्हणतात. या संदर्भात मार्टिन न्युमेयर यांनी मत स्पष्ट केले आहे. त्यांच्यामते, "कुटुंबातील ऐक्य व निष्ठा नष्ट होत असते. तसेच पूर्वीचे संबंध संपुष्टात येत असतात. कौटुंबिक ऐक्याचा नाश होतो व कुटुंबातील सदस्यांमध्ये मानसिक दूरत्त्व निर्माण होत असते."

(४) कुटुंबात ताणतणावाचे वातावरण निर्माण होईल.

घटस्फोटाच्या विविध समस्या आहेत. घटस्फोटामुळे कुटुंबात ताणतणावाचे वातावरण निर्माण होत असते. घटस्फोटामुळे कौटुंबिक परिणाम भोगावे लागतात. घटस्फोटामुळे दोन व्यक्तीचे वैवाहिक जीवन उद्‌ध्वस्त होत असते. घटस्फोटामुळे पत्नी, मुले, आई-वडील यांच्या सोबतचे संबंध दूरावत असतात. त्यामुळे कुटुंबाची स्थिती दयनीय होते. ताणतणावाच्या वातावरणामुळे घरातील शांतता नष्ट होण्याच्या मार्गावर असते. घराचे घरपण नष्ट होते. मानसिक स्थैर्य कमकुवत झाल्याने कौटुंबिक विघटन होताना दिसून येते. घटस्फोटामुळे कुटुंब सदस्यांत मतभेद वाढत जातात. परिणामी कौटुंबिक तणावाची अवस्था निर्माण होते. घटस्फोटामुळे कुटुंबात संघर्षमय परिस्थिती उद्‌भवते व सदस्यांमध्ये परस्परविरोधी अभिवृत्ती निर्माण करते त्यालाच कौटुंबिक ताणतणाव असे म्हणता येईल. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. ती म्हणजे पती-पत्नी संबंध हाच संघटित कुटुंब जीवनाचा पाया आहे. जेंव्हा पती-पत्नी संबंध हाच संघटित कुटुंब जीवनाचा पाया आहे. जेव्हा पती-पत्नी एकमेकांचा आदर करतात, परस्परांशी तडजोड करतात किंवा समायोजन साधण्यास तयार

असतात. तेव्हा कुटुंब संघटित असल्याचा अनुभव येतो. म्हणून कौटुंबिक ताण-तणावाचा अर्थ समजून घेताना पती-पत्नीमधील परस्परविरोधी अभिवृत्तीवरच लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पती-पत्नीच्या परस्परविरोधी अभिवृत्तीमुळे परस्परात ताण-तणाव निर्माण होत असतो. परिणामी कुटुंबात ताणतणावाचे वातावरण निर्माण होत असते.

(५) कौटुंबिक संघर्षाची समस्या निर्माण होईल.

कौटुंबिक संघर्षाची समस्या ही घटस्फोटामुळे निर्माण झाली आहे. घटस्फोटामुळे दोन कुटुंबाला त्रास होत असतो. कौटुंबिक संघर्षाला कुटुंबातील सर्व व्यक्ती वैतागून जात असतात. संघर्षाचा परिणाम मानसिक व शारीरिक स्वरूपाचा असतो. कुटुंबातील संघर्षामुळे कुटुंब स्थीर होत असते. स्थिरतेमुळे व्यक्तींचा ताणतणाव वाढलेला दिसून येतो. संघर्षामुळे व्यक्ती व्याधिग्रस्तदेखील होत असते. कौटुंबिक संघर्षाचा परिणाम कुटुंबाच्या मानसिक स्वास्थ्यावर होत असतो. मानसिक संघर्ष, चिंता, वैफल्य, निराशा व्यक्तीमध्ये घटस्फोटामुळे येत असते. कुटुंबातील सर्व व्यक्ती असमाधानी व आनंदी दिसून येत नाहीत. कुटुंबाची प्रतिमा मलिन होते. पती-पत्नी कोणत्या ना कोणत्या कारणांवरून सतत भांडण करीत असतात. भांडणाचे रूपांतर घटस्फोटामध्ये दिसून येते. खऱ्या अर्थाने पती-पत्नी घटस्फोटाच्या माध्यमातून विभक्त होतात, हे सत्य आहे. परंतु पती-पत्नीच्या कुटुंबात वारंवार संघर्ष होताना दिसून येतो. सतत भांडण करून एकमेकांचे उणेदुणे काढून घेतात. त्यांच्या कुटुंबात सतत विसंवादी वातावरण दिसून येते.

(६) कुटुंब व विवाह संस्था धोक्यात येईल.

विवाहाच्या माध्यमातून कुटुंब अस्तित्त्वात येत असते. कुटुंब व विवाह संस्था मानवी समाजातील महत्त्वाच्या संस्था आहेत. मानवाची 'माणूस' म्हणून घडण होण्यात कुटुंबसंस्थाच कारणीभूत आहे. कारण व्यक्तीच्या जीवनावर विवाह व कुटुंबाचाच सर्वात अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. जन्मापासूनच व्यक्तीचा कुटुंबाशी संबंध येतो. व्यक्तीचे संगोपन, संरक्षण यामध्ये कुटुंबाचा महत्त्वाचा वाटा असतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही कुटुंबातच होत असतो. व्यक्तीच्या विविध गरजांची पूर्ती कुटुंबाद्वारेच केली जाते. कुटुंबाच्या ह्या महत्त्वपूर्ण कार्यामुळेच कुटुंब संस्थेचे अस्तित्त्व कायम आहे. सद्यःस्थितीत कुटुंब संस्थेच्या कार्यात लक्षणीय बदल झालेला पहावयास मिळत आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. घटस्फोटामुळे कुटुंब विघटित होत आहेत. म्हणजेच घटस्फोटाचा परिणाम कुटुंब संस्थेवर होत आहे. म्हणजेच कुटुंब संस्थेचे अस्तित्त्व धोक्यात येत आहे.

(७) आर्थिक समस्या निर्माण होईल.

(८) लहान मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होईल.

(९) वृद्धांचे प्रश्न निर्माण होतील.

(१०) निराशाग्रस्त जीवनमानाची समस्या.

(११) घटस्फोटितांचे आरोग्य धोक्यात येईल.

(१२) भावी नागरीक आदर्श घडणार नाहीत.

(१३) घटस्फोटित आई-वडिलांकडून लहान मुलांची होणारी उपेक्षा.

सारांश :-

उपरोक्त घटस्फोटामुळे निर्मित झालेल्या समस्यांचा अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की, नैतिक, पर्यावरणीय आणि इतर समस्या घटस्फोटामुळे निर्माण झालेल्या आहेत. घटस्फोटामुळे वैवाहिक संबंध तोडण्याचे स्वातंत्र्य कायद्याने दिले. हे जरी खरे असले तरी, घटस्फोटामुळे विविध समस्यांची निर्मिती झालेली आहे. याकडे दुर्लक्ष करून चालता येणार नाही. विशेषत: घटस्फोटित स्त्रियांना अनेक कठीण प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. आर्थिक स्थिती कमकुवत असेल तर पुन्हा प्रश्नांत वाढ होत असते. घटस्फोटित स्त्रीचा आणि पुरुषाचा पुन:र्विवाह सहजासहजी होत नाही. त्यांच्याकडे समाजाची पाहण्याची दृष्टी ही नकारात्मक असते. नैतिकतेचा विचार करता, पूर्वग्रहदुषित आहे. हे नैतिकतेच्या दृष्टिकोनातून अयोग्य

ठरत आहे. घटस्फोटाने वैवाहिक जीवनातील सर्व प्रश्न सुटतातच असे नाही, तर जीवनातील असंतोष व वैफल्य नाहीसे करण्याचा तो केवळ एक मार्ग आहे.

संदर्भसूची :-

१. मेश्राम आर.बी. (१ ऑगस्ट २०१३), "भारतीय समाज प्रश्न आणि समस्या", नागपूर, विद्या प्रकाशन.

२. काचोळे दा.धो., देवकर कल्पना, "नातेसंबंध आणि सामाजिक संस्था", औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन.

३. शिवूरकर निशा (ऑगस्ट २०१७), "लढा टाकलेल्या स्त्रियांचा", पुणे, रोहन प्रकाशन, पहिली आवृत्ती.

४. पाटील वामन (नोव्हेंबर २००८), "घटस्फोट संकल्पनेच्या नैतिक व पर्यावरणीय समस्येचा अन्वयार्थ", महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे २५ वे रौप्य महोत्सवी अधिवेशन, कोल्हापूर.

५. भोंडे दिनेश (प्रकाशक, कुलसचिव), "लोकसंख्या शिक्षण" नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

६. लोटे रा.ज.(जून २००३), "भारतीय समाज आणि सामाजिक समस्या", नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.

७. मनवर डी.एस., (नोव्हेंबर २००३), "भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या", लातूर, अरूणा प्रकाशन.

८. काचोळे दा.धों., देवकर कल्पना (१२ सप्टेंबर २००२), "नातेसंबंध आणि सामाजिक संस्था", औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.

यशवंतराव यांची विविध भाषणे

सखाराम विलास आव्हाड
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ औरंगाबाद

प्रस्तावना

जीवनात काही माणसे अशी असतात की, त्यांचा विचार कितीही केला तरी तो संपत नाही, अशा माणसांचा आपण जसजसा अधिक विचार करायला लागतो तसतसा त्यांचा आपल्याला अधिकच लळा लागत जातो. यशवंतराव चव्हाण हे त्यापैकीच एक. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात ज्यांनी स्वकर्तुत्वाने व नि:स्वार्थी भावनेने संबंध आयुष्यभर कार्य केले त्यात यशवंतरावांचा क्रम फारच वरचा लागतो. ते एक थोर देशभक्त होते. आधुनिक महाराष्ट्राचे ते शिल्पकार होते. ते केवळ बहुजनसमाजाचेच नेते नव्हते तर समाजातील सर्व जातीतील धर्मातील लोकांना आपल्या बरोबर घेऊन जाणारे खऱ्या अर्थाने लोकनेते होते.

यशवंतरावांनी त्यांच्या आयुष्यात विविध विषयांवर चिंतन केले, त्यामध्ये समाजकारण, शैक्षणिक विचार, साहित्यिकांची जबाबदारी, देशाचे अर्थकारण, परराष्ट्र धोरण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ किंवा सामाजिक कार्य यांचा समावेश होतो. यशवंतरावांच्या भाषणांना त्याकाळीप्रचंड गर्दी जमत असे या माणसाने बोलावे आणि लोकांनी ते आवडीने ऐकावे असे अनेकांना वाटे त्यांच्या भाषणांनी कित्येक लोकांना आकर्षित केले होते.

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या भाषणांमधून नाना व्यक्तींच्या आठवणी सांगितल्या. अनेक घटना, प्रसंगांचा उहापोह केला. त्यांच्या भाषणांमधून वाङ्मयीन आणि कलाप्रेमी व्यक्तिमत्वाचाच एक संपन्न सुंदर, अविष्कार पहावयास मिळतो. प्रदीर्घ व्यासंग, संदर्भ संपन्नता, गंभीर चिंतनशीलता, निखळ प्रांजळपणा, प्रसंगानुरूप व औचित्यपूर्ण सवांद इ. विविधतेमुळे त्यांची भाषणे वैविध्यपूर्ण आहेत. भाषण विषयातीलहि विविधता जशी आपल्याला स्तिमित करते त्याप्रमाणे त्यातून व्यक्त होणारे साहित्यप्रेमही आपल्याला उत्कटपणे जाणवते. साहित्याचा अनेक अंगानी त्यांनी विचार मांडला.

यशवंतराव चव्हाण आपल्यासमोर साहित्याच्याअनेक अंगानी आपल्या समोर व्यक्त झाले आहेत. त्यांची साहित्यविषयक भाषणे व प्रासंगिक वैचारिक लेखन हे नियतकालिकांतून व ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले आहे. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ सह्याद्रीचे वारे, 'युगांतर', 'शिवनेरीच्या नौबती' यासारख्या ग्रंथातील काही भाषणांमधून श्रोत्यांशी ते प्रत्यक्ष बोलत राहिले.

वक्तृत्व हा त्यांच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवनातला एक चैतन्यशील व समृद्ध असा महत्वाचा भाग होता. या भाषणांमधून विविध विषयांना स्पर्श करणारी आपली ठाम मते त्यांनी मांडली. यशवंतरावांच्या भाषणांनी वैचारिक व ललित निबंधांचा दर्जा प्राप्त केलेला आहे. ललित वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून त्यांचा अभ्यास प्रस्तुत ठिकाणी अपेक्षित आहे. यशवंतरावांची अनेक भाषणे साहित्यविषयक आहेत आणि त्यामध्ये त्यांच्यातल्या रसिकाइतकाच त्यांच्यामधला समीक्षकही सजग आहे. यशवंतरावांच्या चिंतनशील अंतर्मुखतेपासून ते सर्वस्पर्शी रसिकतेपर्यंत आणि साहित्यातील गहण प्रश्नांचावेध घेण्यापासून तो त्यातल्या अनेक अंतर्गत विरोधांची चिकित्सा करण्यापर्यंत त्यांच्या या भाषणांचा आवाका आणि पल्ला दिसतो.

महाराष्ट्रात उत्तम वक्तृत्व संपादन केलेला विवेकशील विचारवंत म्हणून यशवंतरावांचा उल्लेख अनेकांनी केलेला आहे. यशवंतरावांनी विविध विषयांवरील ही भाषणे वाचताना वक्ता म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आपणास होते. यशवंतरावांनी त्यांच्या भाषणांमधून अनेक बाबींचा परामर्श घेतलेला आहे.

त्यामध्ये विविधता खूप आहे. हे साहित्याबाबतचे प्रेम मर्यादित नाही. विशिष्ट गोष्टींनाच महत्व देणारे नाही त्यात व्यापकता आहे. तशीच सर्वसमावेशकता आहे.

साहित्य व संस्कृती विषयक भाषणे :-

यशवंतराव चव्हाण यांनी विविध ठिकाणी संस्कृतीसंबंधी व साहित्यविषयक योजनापूर्वक व मनःपूर्वक भाषणे केलेली आहेत. 'विदर्भ साहित्य संमेलन (०६.२.१९६४), उदघाटन प्रसंगीचे भाषण साहित्य आणि संस्कृती (दि. २२/१२/६०), नांदेड येथे संपन्न झालेल्या ४७ व्या मराठी नाट्यपरिषदेच्या वेळी मांडलेले विचार 'राष्ट्रभाषा हिंदी' (दि. १९/०३/६१),'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (दि. ०६/१२/७५), कराड येथे भरलेल्या ६१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी स्वागताध्यक्षीय भाषण,'महाराष्ट्र राज्य' साहित्य व संस्कृती मंडळाचे नागपूर उदघाटनपट भाषणसाहित्यिकांची जबाबदारी (दि. १३/१२/६०) 'राष्ट्रभाषेचा प्रश्ण (दि. २२/०५/६६), औरंगाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समिती, वार्षिक अधिवेशनाच्या वेळी केलेले भाषण, 'सावरगाव डुकरे येथील विदर्भ साहित्य संमेलनाचे उदघाटनपर भाषण, 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' (दि.०७/०९/१९६७) आजच्या साहित्याकडून अपेक्षा (दि. २५/१२/६५), हैद्राबाद येथील मराठी साहित्य संमेलनाच्या प्रसंगी केलेले भाषण. 'मराठी रंगभूमीची अखंड परंपरा (दि. ३१/०१/१९६५) (नांदेड येथे संपन्न झालेल्या ४७ व्या मराठी नाट्य परिषदेच्या वेळी मांडलेले विचार). यासारख्या कितीतरी भाषणांमधून मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती जातं करण्यासाठी व तिच्या सवंर्धनासाठी वाङ्मयीन विचार त्यांनी मांडले आहेत. ही भाषणे माहितीचे अफाट भांडार आहे.

साहित्याबद्दल व साहित्यिकाबद्दल जसे त्यांचे उत्कट प्रेम दिसते तशी श्रोत्याबद्दलची जिवंत कळकळ ही जाणवते त्यांच्या उपरोक्त विषयावरील भाषणांचा कितीही आस्वाद घेतला तरी कान तृप्त होत नाहीत. अशीच त्यांची भाषणे आहेत.

निबंध शैलीतील शैक्षणिक व सामाजिक विषयावरील भाषणे :-

वक्तृत्वाला महत्व देणारी ग्रीकांची लोकशाही राज्यव्यवस्था जेव्हा इंग्लडने स्वीकारली तेव्हा विचारांच्या तर्कशुद्ध, मुद्देसूद व सुस्पष्ट मांडणीला प्राधान्य मिळाले यातूनच निबंध या वाङ्मय प्रकाराला बहर आला असावा. विशेषता इंग्लडमध्ये सतराव्या शतकाच्या उत्तरार्धानंतर भाषण स्वातंत्र्याची संकल्पना दृढमूल झाली. संसदेतील भाषणांवरील निर्बंध उठले व ती भाषणे प्रभावी ठरू लागले. तसतसे वक्तृत्वशैलीतील मुद्देसूद मांडणीचे गद्य लेखन प्रभावी ठरू लागले. यशवंतरावांच्या या स्वरूपाच्या लेखनात सुद्धा मुद्देसूद मांडणी अंतःकरणाला भिडणारी भाषा राजकीय दूरदृष्टी यांचा संगम दिसतो.

यशवंतरावांच्या भाषणांतून विचार प्रकटीकरण हा मुख्य मुद्दा व्यक्त झाला आहे. त्याचप्रमाणे कथित विचारांची साधार व समप्रमाणात मांडणी केली आहे. तेव्हा इतिहास, अनुभव व अवलोकन यांच्या आधारावर अशा विचारप्रधान वाङ्मयाची निर्मिती होते. निबंध हा वाङ्मय प्रकार मनोरंजनाशी कधीच निगडित नव्हता. विचारांचे वेगवेगळे पैलू प्रकट करून वाचकांच्या जीवन दृष्टीला प्रगल्भता आणण्यासाठी निदान त्यांना विचार प्रवृत्त करण्यासाठी निर्माण झालेला हा वाङ्मय प्रकार आहे.

यशवंतरावांची इत्तर भाषणे :-

महाराष्ट्राच्या विकासाच्या आणि कल्याणाच्या चळवळीचा त्यांना त्यांच्या भाषणातून हिरहिरीने पुरस्कार केला राजकारण हे लोकल्याणासाठी असते हे त्यांनी पुढाऱ्यांना व जनतेस निक्षून सांगितले. त्यांनी समाजाच्या प्रगतीला पोषक अशा नवविचारांचा उपयोग भाषणातुन केला. त्यांचा तो काळच उद्बोधन आणि प्रबोधनाचा होता. तो काळ मराठी साहित्यातील उत्साहपूर्ण विस्ताराचा ऐतिहासिक टप्पा होता. यशवंतराव चव्हाण आणि हा कालखंड यांचा सांधा छानपैकी जमून गेला होता. कारण राजकीय नेत्याला सामाजिक, सांस्कृतिक परंपरा सांभाळावीच लागते.

महाराष्ट्राचे भवितव्यावरील भाषण :-

यशवंतरावांच्या बोलण्याच्या शैलीतून समाजाबद्दल कळकळ आणि पोटतिडिक दिसते. महाराष्ट्राच्या भवितव्याची हि मोठीचमोठी, लांबचलांब सफर आहे... त्यासफरेतील आम्ही प्रवासी आहोत... ही सफर तुम्हा आम्हाला पुरी करायची आहे. ती सफर आज मला माझ्या डोळ्यासमोर दिसते आहे. विजेच्या प्रकाशाने लखलखल्यासारखी मला दिसते आहे. ती लांबची सफर आहे. पण ती पूर्ण केलीच पाहिजे कारण त्यात जनतेचे कल्याण आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या भवितव्याची आणि जनसामान्यांची प्रगती विषयक भूमिकाच भाषणातून व्यक्त केली आहे.

यशवंतरावांनी आर्थिक विकासावर त्यांच्या भाषणातून अधिक भर दिला. आर्थिक प्रश्ण सोडवताना ग्रामीण मजूर भूमिहीन यांचा त्यांनी प्रामुख्याने विचार केला. 'पुरोगामी आर्थिक धोरण' 'आमचा आर्थिक पवित्रा' नाणे सुधारणा आणि विकसनशील देश अर्थमंत्री पदाची चार वर्षे एक ताळेबंद या सारख्या विषयातून त्यांनी आर्थिक विचाराचा परामर्श घेतला. छोटे शेतकरी, शेतमजूर व बेकार तरुण यांची त्यांनी गांभीर्याने दाखल घेतली एकूणच देशाच्या अर्थखात्याला पूरक असे वळण लावण्याच्या हेतूने त्यांनी विचार मांडले ते म्हणतात. "तुलनात्मक दृष्ट्या अविकसित असलेल्या देशांच्या त्वरित आर्थिक विकास होते हे देशाच्याही हिताचे आहे सांगण्याची गरज नाही शिवाय एखाद्या भागाची अर्थव्यवस्था अगतिक व मागासलेली असणे हे आर्थिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांच्या दृष्टीनेही धोकादायक असते.

भाषणाचे स्वरूप :-

यशवंतरावांनी सामाजिक व शैक्षणिक विषयावर आपल्या संपन्न अनुभवांच्या आधारे चिंतन केले. हे चिंतन एका लेखकांचे विचारवंताचे व जाणत्या नेत्याचे आहे. त्यांची विचार सांगण्याची पद्धत फार चांगली होती दुसऱ्याला ते विचार पटवून देत असत. आपल्या मार्मिक बोलण्यातून ते विचार लोकांना सांगत शिवाय त्यांच्याकडे असलेल्या मिश्किल शैलीने एका प्रकारे लोकांचे मनोरंजन होईल अशा स्वरूपाचे ते बोलत वरील विषयावरील त्यांची भाषणे वाचल्यानांतर त्यांचा व्यासंग किती व्यापक होता हे सहज जाणवते. आपल्या विचार कल्पनांना गोंडस शब्दरूप देऊन उत्तम शब्दांच्या निवडीने, श्रोते पाहून आपल्या भाषणाची पद्धती ते ठरवीत असत.

आपल्या बोलण्याच्या उत्तम शैलीतून प्रभावीपणे जनसमुदायास पटवून देत मला सत्येचा मोह नाही पण विचारांचा नक्की आहे असे ते वेळोवेळी सांगत असत. यशवंतरावांच्या भाषणातून आलेले विचार एखाद्या प्रबंधासारखे वाटतात त्यांच्या बोलण्याचा सुवायू वाहू लागला म्हणजे अनेक संदर्भ आठवणी अनुभव यातून तत्वमंथन होते

ग्रंथसूची

१. ऋणानुबंध :- यशवंतराव चव्हाण प्रेस्टिज प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६.
२. सह्याद्रीचे वारे :- यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२.
३. युगांतर :- यशवंतराव चव्हाण कॉन्टिनेन्टलप्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, मे १९७०.
४. कृष्णकाठ :- यशवंतराव चव्हाण प्रेस्टिज पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४.
५. भूमिका :- यशवंतराव चव्हाण प्रेस्टिज पब्लिकेशन पुणे.
६. शिवनेरीच्या नौबती :- यशवंतराव चव्हाण संपादक गोविंद तळवलकर अ. हा. लिमये.
७. विचारधारा :- यशवंतराव चव्हाणांची भाषणे, सागर प्रकाशन.

शिंदेशाहीच्या अमलाखालील माळव्यातील जमीन महसुल व्यवस्था

सचिन अभिमन्यू ओहोळ

साहाय्यक प्राध्यापक तथा इतिहास विभागप्रमुख, संघवी केशरी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,चिंचवड, पुणे –१९.

प्रस्तावना :

अठरावे शतक हे पाश्चात्य आणि आशिया खंडाच्या दृष्टीने महत्त्वाचे शतक होते. भारतामध्येही अठरावे शतक हे स्थित्यंतराचे शतक होते. *'The Eighteenth Century in India'* या पुस्तकामधील प्रस्तावनेमध्ये सीमा आलवी अठराव्या शतकाच्या वैशिष्ट्यांबद्दल भाष्य करतात. त्यांच्या मते अठराव्या शतकाची दोन प्रमुख वैशिष्टये होती, ज्यामुळे सत्तेची संरचना बदलली आणि सामाजिक, आर्थिक पुनर्बांधणी झाली. पहिल्या वैशिष्टयामध्ये त्या लिहितात, 'मोगली राजकीय अर्थव्यवस्था अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मोडकळीस आली व प्रादेशिक राजकीय सत्तांचा उदय झाला.' दुसऱ्या वैशिष्टयामध्ये त्या इ.स. १७५७ च्या प्लासीच्या युद्धानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा एक राजकीय सत्ता म्हणून झालेला उदय व राज्यव्यवस्था, समाज व अर्थकारण यामध्ये झालेला बदल याचा निर्देश करतात. पहिल्या वैशिष्ट्याच्या संदर्भात सुरूवातीच्या इतिहासकारांनी 'अंधकारमययुग' अशी मांडणी केली होती. मात्र नवमतवादी इतिहासकारांनी ही मांडणी झुगारून 'आर्थिक उन्नतीचा काळ' ही मांडणी केली. तर दुसऱ्या वैशिष्ट्याबद्दल सुरूवातीच्या इतिहासकारांची 'बदल' ही मांडणी बदलून नवमतवाद्यांनी 'सातत्य' ही मांडणी केली. यामुळे अठराव्या शतकाचे अध्ययन महत्वपूर्ण ठरते.

अठराव्या शतकाच्या दोन महत्त्वपूर्ण स्थित्यंतराच्या पार्श्वभूमीवर 'नवमतवादी' इतिहासकारांनी भारताच्या विविध प्रदेशांवर संशोधन केले आहे. मात्र अठराव्या शतकातील 'माळवा' या महत्त्वपूर्ण प्रदेशावर फारच थोडया संशोधकांनी आपले लक्ष वेधले आहे. भारताच्या नकाशातील मध्यवर्ती स्थानामुळे मध्ययुगीन काळात माळव्याचे युद्धशास्त्रीयदृष्ट्या महत्त्व अधिक होते. दिल्लीच्या सत्ताधिशांच्या सत्ताविस्तारात माळव्याचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले होते. बाजीराव पहिला याने उत्तरेत केलेल्या सत्ताविस्ताराचा पाया 'माळवा' हा होता तर पानिपतोत्तर काळात मराठी सत्तेची पुनर्स्थापना करण्यात माळव्याचे भौगोलिक स्थान महत्त्वाचे ठरले होते. याशिवाय आर्थिकदृष्टयाही माळवा संपन्न होता. मोगल काळात गुजरात प्रांतानंतर अधिक महसुल देणारा प्रांत म्हणून 'माळवा' ओळखला जात होता. या अनुषंगाने अठराव्या शतकातील माळव्याच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून सदर संशोधन लेखामध्ये 'शिंदेशाहीच्या अमलाखालील माळव्यातील जमीन महसुल व्यवस्था' याचा अभ्यास केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

सदर संशोधनलेखाच्या अभ्यासासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१) माळव्यातील शिंदेशाही राजवटीचा अभ्यास करणे.

२) मराठेकालीन माळव्याच्या शिंदेशाहीतील राज्यकर्त्यांच्या शेतीविषयक आणि जमीन महसुलविषयक धोरणांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये सर्वप्रथम संबंधित विषयाच्या संदर्भात अप्रकाशित आणि प्रकाशित अशा प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा शोध घेतला जातो. या साधनांची अस्सलता आणि विश्वसनियता अनुक्रमे बहिरंग आणि अंतरंग परीक्षणाद्वारे तपासली जाते. या परीक्षणातून हाती आलेल्या 'तथ्यांच्या' आधारे विषयाचा 'अन्वयार्थ' लावला जातो. प्रस्तुत संशोधन लेखासाठी आवश्यक असणारी अप्रकाशित आणि प्रकाशित साधने पुणे पुराभिलेखागार, नटनागर शोधसंस्थान सीतामऊ, जि. मंदसौर (माळवा), मध्यप्रदेश या ठिकाणी उपलब्ध आहेत. याशिवाय भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या अप्रकाशित आणि प्रकाशित साधनांचा अभ्यास लेखाच्या मांडणीसाठी करण्यात आला आहे.

माळव्यामध्ये शिंदेशाहीची स्थापना :

शिंदेशाहीच्या इतिहासाच्या साधनांवरून, होळकरशाहीच्या इतिहासाच्या साधनांवरून तसेच पेशवा दफ्तरच्या कागदपत्रांच्या आधारे माळव्याचा कोणता भूभाग अथवा प्रदेश शिंदेंच्या अखत्यारित होता याची माहिती उपलब्ध होते. २२ जुलै १७३२ रोजी माळव्याची वाटणी पेशवे, होळकर, शिंदे आणि पवार यांच्यामध्ये करण्यात आली. शिंदे सरकारांचे खाजगी कारभारी क्षीरसागर यांच्या मते माळव्याच्या वाटणीबरोबरच 'शिंदेशाही' अस्तित्वात आली.(१) उज्जैन, कोटा, रतलाम, खाचरोड, मंदसौर, खिलचीपूर, सीतामऊ, कयामपूर, उन्हेल, शहाजापूर, अमझेरा, बडवानी या परगण्यांचा समावेश शिंदेशाही मध्ये होत होता.(२) होळकर तसेच शिंदे यांना मिळालेल्या प्रदेशास 'दौलत' असे म्हणत असत.(३) या प्रदेशाची जमीन महसुल व्यवस्था कशा प्रकारे राबविली त्याचा आढावा या ठिकाणी घेण्यात आलेला आहे.

शिंदेशाहीच्या अमलाखालील माळव्यात जमीन महसुल व्यवस्थेची सुरूवात कधीपासून झाली हे पाहणे महत्वाचे ठरते. राजाध्यक्ष यू. एन. आपल्या *'True History of The Scindhia'* या ग्रंथात लिहितात की, 'Ramchandra Baba looked after Shinde's Saranjam in Malwa in the early years after they were assigned to him.' (४) मात्र माळव्याची वाटणी होण्यापूर्वी होळकर, शिंदे आणि पवार एकत्रितच कारभार पहात होते. मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे यांच्या एकत्रित सेवेमध्ये असणा-या नारो शंकर आणि मल्हार गोपाळ यांनी परगणे बेटमे मधून सव्वा पाचशे रूपये वसुल केले होते.(५) याशिवाय इंदूर परगण्याच्या तेजकर्ण मंडलोई यास मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे यांनी भेटीकरिता एकत्रितपणे बोलविल्याचेही पत्रावरून दिसून येते.(६) यावरून आपण असे म्हणू शकतो की माळव्याची वाटणी होण्यापूर्वी मराठा सरदार एकत्रितपणे माळव्यामध्ये चौथ वसुलीचे काम करत होते. परंतु इ.स. १७३२ मध्ये माळव्याची वाटणी झाल्यानंतरच्या काळातही म्हणजे भोपाळच्या लढाईपर्यंत माळव्यामध्ये पेशवे दरबारातर्फे नेमण्यात आलेला कमाविसदार हा संपूर्ण माळव्याच्या वसुलाचे काम करत असे. ०८ जुलै १७३१ च्या पत्रावरून असे दिसते की नारो शंकर याची माळव्याचा कमाविसदार म्हणून नियुक्ती केली होती.(७) त्याचप्रमाणे बाळाजी यशवंत गुळगुळे यांचीही इ.स. १७३२ मध्ये कोटा येथे केलेली नियुक्ती ही पेशव्यांबरोबर त्यांचे सरदार शिंदे, होळकर आणि पवार यांच्या जमीन महसुलाच्या एकत्रित पाहणीकरिता करण्यात आलेली होती.(८) मात्र भोपाळच्या लढाईनंतर पुणे दरबारच्या सल्ल्याने वेगवेगळया कारभा–यांची नियुक्ती करण्यात आली.

इ.स. १७३० पासून माळव्यातील जमीन महसुलाच्या वसुलीकरिता कमाविसदारांची नियुक्ती केली असल्याचा संदर्भ शिंदेशाही इतिहासाच्या कागदपत्रांवरून दिसून येते. माळवा प्रांतातील 'राजगड' या संस्थानातून जमीन महसुल गोळा करण्यासाठी राघो विठ्ठल कमाविसदार याची नियुक्ती केली होती. त्याच पत्रामध्ये गोविंद विश्वनाथ मुद्गल यास फडणीसी दिल्याचे लिहिले आहे.(९) पुढे इ.स. १७४२च्या पत्रामध्ये बाळाजी यशवंत गुळगुळे हे कोटा परगण्याचे कमाविसदार असल्याचे दिसून येतात.(१०) तर इ.स. १७६० पासूनच्या पत्रांमध्ये लालाजी बल्लाळ यांचा उल्लेख आढळतो.(११)

पानिपतनंतरच्या काळातही या व्यवस्थेमध्ये फारसे परिवर्तन झालेले दिसत नाही, उलट ही व्यवस्था अधिक सक्षम आणि अधिकाधिक नियंत्रित करण्याचा प्रयत्न शिंदेशाही आणि पेशवे दरबारकडून करण्यात आल्याचे प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या अभ्यासावरून लक्षात येते. याबाबत राजाध्यक्ष यू. एन. आपल्या 'True History of The Scindhia' या ग्रंथात लिहितात की,

> 'In the beginning Shinde's control extended up to a distance of 60 kos (120miles/192kms) from Ujjain. After Panipat local Zamindar asserted their position and tried to wrest the territoryon the outskirts of Ujjain. But soon after Shinde's men recaptured and setteled the area under Maratha officials.' (१२)

इ.स. १७६२ ते इ.स. १७६८ या दरम्यानच्या काळातील शिंदेशाहीमधील काही अंतर्गत संघर्षाच्या काळातील अपवाद वगळता त्यांनी पुढील काळात प्रशासनावर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित केलेले दिसते. माधवराव पेशव्यांनीही शिंदेशाहीच्या प्रशासनात लक्ष घालून नव्या नेमणुका केलेल्या दिसतात. त्यामध्ये अच्युतराव गणेश याची दिवाण म्हणून नियुक्ती करण्यात आली.(१३) तर इ.स. १७६७ मध्ये राघो राम, राघो मल्हार व बाजी नरसी याची कारभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.(१४) पानिपतच्या लढाईनंतर शिंदे दरबारास वित्त समस्येला सामोरे जावे लागले होते, त्यावेळी त्यांना अर्थसहाय्य करण्याचे काम पेशवे दरबाराने केल्याचे दिसते. नरहर लक्ष्मणराव या महादजीच्या मामलदारास पेशव्यांनी असे निर्देश दिले होते की महादजींच्या आई चिमाबाई यांना दहा हजार रूपये देण्यात यावे.(१५)

कमाविसदार हे स्थानिक घटक आणि केंद्रीय व्यवस्था यामध्ये दुवा म्हणून काम करत असत. त्यांचे कामाचे स्वरूप हे जरी मोगलांच्या जहागिरदाराप्रमाणे होते मात्र ते लष्करी कार्य करत नव्हते. कमाविसदार हे त्यांच्या इलाख्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करत असत. आपल्या इलाख्यातील जमीन महसुल गोळा करण्यासोबतच त्या परगण्यातील अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे हे देखील त्यांचे प्रमुख कार्य होते. शिंदेशाहीच्या पत्रव्यवहारामधून प्रत्येक राज्यकर्त्याने आपल्या कमाविसदारांना याबाबत सूचना केल्याचे दिसून येते.(१६) कमाविसदारांना त्यांच्या कामामध्ये मदत करण्यासाठी मुजुमदार, दिवाण, जमेनिशी, चिटणीस, मजमू इ. अधिकारी असत.

i) जमीन महसुल पद्धत–

शिंदेशाहीच्या इतिहासाच्या साधनांमधून मराठेकालीन माळव्यात कोणत्या जमीन महसुल पद्धती अस्तित्वात होत्या याची माहिती उपलब्ध होते. ०९ जानेवारी १७५५ मध्ये जयाजी शिंदे यांनी बाळाजी यशवंत गोसावी यांना लिहिलेल्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. ' परगणे पाटण केशवराव याचे प्रांत बूंदी येथील कमाविस पेशजी राजश्री गोविंद सखाजी याजकडे होती. ते दूर करून साल मजकूर तुम्हाकडे इजारियाने मामलेत सांगितील असे.'(१७)

यावरून शिंदेशाहीमधील इजारा पद्धतीची माहिती समजते. यामध्ये पुढील चार वर्षात कशा प्रकारे इजारा अमलात आणायचा आहे तेही सांगितले आहे.[१८] त्यानुसार–

इ.स. १७५५	२,१०००१
इ.स. १७५६	२,१०००१
इ.स. १७५७	२,१०००१
इ.स. १७५८	२,१०००१

एवढी रक्कम देण्यात यावी असे सांगितले आहे. ही रक्कम तीन हफ्त्यांमध्ये कशी देण्यात यावी याचे विवरणही दिले आहे त्यानुसार–[१९]

रक्कम	महिना
४०,००१	माघ मास अखेर
८०,०००	वैशाख मास अखेर
९०,०००	श्रावण मास पौर्णिमा १५ अखेर

.....

२,१०००१

या कमाविसदारी पद्धतीमधून मिळणारे राज्याचे उत्पन्न किती होते याची माहिती आपणास कागदपत्रांमधून समजते. इ.स. १७७६ मध्ये शिंदेशाही राज्याच्या २८परगण्यांमधून मिळालेले जमीन महसुलाचे उत्पन्न अठ्ठावीस लाख रूपये एवढे होते.[२०]

निष्कर्ष :

अठराव्या शतकाच्या भारताच्या इतिहासाचे अध्ययन हे तत्कालीन स्थित्यंतरांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे मानले जाते. सुरूवातीच्या इतिहासकारांनी या स्थित्यंतराची मांडणी 'अंधकारमययुग' अशी केली होती. मात्र नवमतवादी इतिहासकारांनी ही मांडणी झुगारून 'आर्थिक उन्नतीचा काळ' ही मांडणी केली. यामुळे अठराव्या शतकाचे अध्ययन महत्वपूर्ण ठरते. अठराव्या शतकातील स्थित्यंतरांच्या काळातील माळव्याच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून सदर संशोधन लेखामध्ये 'शिंदेशाहीच्या अमलाखालील माळव्यातील जमीन महसुल व्यवस्था' याचा अभ्यास केलेला आहे. बाजीराव पेशवा यांच्या उत्तराभिमुख धोरणामुळे माळव्यामध्ये ख–या अर्थाने मराठेशाहीची स्थापना झाली आणि त्याचबरोबर होळकर, पवार, शिंदे या घराण्यांची स्थापना देखील माळव्यामध्ये झाली. सुरूवातीस म्हणजे भोपाळच्या लढाईपर्यंत माळव्यामध्ये पेशवे दरबारातर्फे नेमण्यात आलेला कमाविसदार हा संपूर्ण माळव्याच्या वसुलाचे काम करत असे. मात्र भोपाळच्या लढाईनंतर पुणे दरबारच्या सल्ल्याने वेगवेगळया कारभा–यांची नियुक्ती करण्यात आली. शिंदेशाहीमध्ये जमीन महसुलाच्या वसुलीकरिता कमाविसदारांची नियुक्ती केली होती. कमाविसदारांना त्यांच्या कामामध्ये मदत करण्यासाठी मुजुमदार, दिवाण, जमेनिशी, चिटणीस, मजमू इ. अधिकारी असत. आपल्या इलाख्यातील जमीन महसुल गोळा करण्यासोबतच त्या परगण्यातील अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे हे देखील त्यांचे प्रमुख कार्य होते. कमाविसदार हे त्यांच्या इलाख्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे काम देखील करत असत. या व्यवस्थेमध्ये पानिपतनंतरच्या काळातही फारसे परिवर्तन झालेले दिसत नाही, उलट ही व्यवस्था अधिक सक्षम आणि अधिकाधिक नियंत्रित करण्याचा प्रयत्न शिंदेशाही आणि पेशवे दरबारकडून करण्यात आल्याचे प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या अभ्यासावरून लक्षात येते.

स्वत: माधवराव पेशव्यांनीही शिंदेशाहीच्या प्रशासनात लक्ष घालून नव्या नेमणुका केलेल्या दिसतात. त्यामुळेच इ.स. १७७६ मध्ये शिंदेशाही राज्याच्या २८परगण्यांमधून मिळालेले जमीन महसुलाचे उत्पन्न अठ्ठावीस लाख रूपये एवढे होते. या सर्व अध्ययनातून असे म्हणता येते की अठराव्या शतकातील माळवा हा 'अंधकारमययुग' या युगाचा प्रतिनिधित्व करत नसून 'आर्थिक उन्नतीचा काळ' याचे प्रतिनिधित्व करतो.

तळटीपा :

१. फाळके आनंदराव भाऊ, 'शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ ला.', आलीजाह दरबार प्रेस, ग्वाल्हेर, १९२९. पृ. क्र. ०५.
२. ठाकूर वा.वा. (संपा.),'होळकरशाहीच्या इतिहासाची साधनें भाग १ ला', होळकर गवर्नमेंट प्रेस, इंदूर. पत्र क्रमांक ९०. पृ. क्र. २०९ ते २११.
३. फाळके आनंदराव भाऊ, 'शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ ला.', उपरोक्त, पृ. क्र. ०५.
४. Rajadhyaksha U.N.,'True History of the Sindhia', Bombay, 1907. पृ. क्र. ४६.
५. ठाकूर वा.वा. (संपा.),'होळकरशाहीच्या इतिहासाची साधनें भाग १ ला', उपरोक्त, पत्र क्रमांक १७. पृ. क्र. ११.
६. कित्ता. पत्र क्रमांक १९, पृ. क्र. १३.
७. कित्ता. पत्र क्रमांक २२, पृ. क्र. १४.
८. फाळके आनंदराव भाऊ, 'शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ ला.', उपरोक्त, पृ. क्र. ०३.
९. कित्ता. पत्र क्रमांक ०१, पृ. क्र. ०१,०२.
१०. कित्ता. पत्र क्रमांक ०२, पृ. क्र. ०२.
११. कित्ता. पत्र क्रमांक २२०, पृ. क्र. १९१.
१२. Rajadhyaksha U.N.,'True History of the Sindhia', Bombay, 1907. पृ. क्र. ५६.
१३. Vad, G. C. & Parasnis D. B. (ed.), 'Selections from the Satara Raja's and the Peshwas Diaries,' Vol-I., Poona , 1905. पत्र क्रमांक १६२, पृ. क्र. १४६ ते १४८.
१४. कित्ता. पत्र क्रमांक १७९, पृ. क्र. १६७.
१५. Sardesai G.S., 'New History of the Marathas Vol-02', Reprint, Phoenix Publications, Bombay, 1958. पृ. क्र. ५१.
१६. गुलगुले दफ्तरमधील अप्रकाशित कागदपत्रे खंड ०१ ते खंड ०८.
१७. फाळके आनंदराव भाऊ, 'शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ ला.', उपरोक्त, पत्र क्रमांक १२०, पृ. क्र. १०७, १०८.
१८. कित्ता. पत्र क्रमांक १२०, पृ. क्र. १०७, १०८.
१९. कित्ता. पत्र क्रमांक १२०, पृ. क्र. १०७, १०८.
२०. ठाकूर वा.वा. (संपा.),'होळकरशाहीच्या इतिहासाची साधनें भाग १ ला', उपरोक्त, पत्र क्रमांक ९०. पृ. क्र. २०९ ते २११.

मानवी हक्क व सदयस्थिती

प्रा. शेट्टीवार सायलू पंढरीनाथ

कै.नंदकुमार दत्तात्रेय बिडवई ज्यु.कॉलेज कंधार ता.कंधार जि. नांदेड

मानवाला माणूस म्हणून जगण्यासाठी व त्याच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आवश्यक असलेलं हक्क म्हणजे मानवी हक्क होत. या हक्काशिवाय मानवाचं जीवन पशुवत होईल. मानवाला जीवन जगणं असाह्य होईल मानवी हक्काचं आजच्या भाषेतील संकल्पना आधुनिक संकल्पना आहे. तिची मुळे मानव जातीच्या इतिहासामध्ये सापडतात. हक्काच्या संकल्पनेस वेगवेगळया युगातील विविध शतकांमध्ये मान्यता देण्यात आली आणि या संकल्पनेची रचना करण्यात आली. गुलामगिरी विरोधी चळवळ आणि युध्दासंबंधीच्या गुन्ह्याविरुध्द चळवळी यासारख्या विविध चळवळीने देखील हक्काच्या उत्क्रांतीमध्ये योगदान दिले हे स्पष्ट स्वरूपात इंग्लडचा राजा जॉन यांनी मॅग्नाकार्टा सनद मंजुर करून घेऊन अनियंत्रित राजसत्तेला पायबंद घालणे मानवी हक्काच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण केले. यानंतर बिल ऑफ राइट १६८९ या सनदेद्वारे इंग्लंड संसदीय व्यवस्थेचा पाया रचून कायदेविषयक अधिकार देण्याकरिता मॅग्नाकार्टा बिल ऑफ राइटव्दारे पृष्ठी देण्यात आली. १७८९ साली फ्रान्सने मानवी हक्काचा जाहिरनामा स्वीकारला या दस्तऐवजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये धार्मिक स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि व्यक्तीगत सुरक्षेची हमी दिलेली आहे. यानंतर अमेरिकन राज्यक्रांती व १० डिसेंबर १९४८ रोजी युनोने मानवी हक्काचा जाहिरनामा घोषित करून जगातील सर्व मानवांना आपल्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या हक्काची तरतुद केलेली आहे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नागरिकांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य प्राप्त नव्हते. ब्रिटिश राजवटीत कमी प्रमाणात व टप्याटप्याने जनतेला स्वातंत्र्य मिळत गेले. त्यामध्ये १८५८ चा राणीचा जाहिरनामा, १८९२ पिटस इंडिया अँक्ट, १९०९ चा मोर्ले मिंटो सुधारणा कायदा, १९१९ चा मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड, १९२८ चा नेहरू रिपोर्ट व १९३५ भारत शासनाचा कायदा महत्वाचे आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने भारतीय नागरिकांना मानवी हक्क प्रदान करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत हक्काची तरतूद करण्यात आली. कलम ३२ नुसार या हक्कावर अतिक्रमण झाल्यास व्यक्ती, राज्य, संस्था यांच्या विरोधात न्याय मागू शकते. यामध्ये अधिकार पृच्छा, परमादेश, बंदी प्रत्यक्षीकरण, प्रतिषेद इत्यादी आधारे उपाययोजना करता येते.

मानवी हक्क हे व्यक्तीला माणूस म्हणून लाभलेले हक्क आहेत. राज्याच्या मान्यतेशिवाय हे हक्क व्यक्तीला प्राप्त होतात. मानवी हक्क हेनैतिक स्वरुपाचे असून व्यक्तीच्या विकासासाठी ती मुलभूत स्वरुपाची आहे. माणूस म्हणून

प्राप्त होणाऱ्या मानवी हक्कांना स्थल, काल व क्षेत्राचे बंधन नाही. मानवी हक्काचं स्वरूप हे वैश्विक असून जन्माने व्यक्तीला हे हक्क प्राप्त होतात तेच हक्क व्यक्तींच्या आत्मप्रतिष्ठेसाठी आवश्यक आहेत.

मानवी हक्काचे स्वरुप :-

मानवी हक्क हे निर्सगत: माणसाला प्राप्त होत असल्यामुळे त्याचे निसर्गदत्त ठरते. रुसो आपल्या सोशल कॉन्ट्रक्ट या ग्रंथात म्हणतात मनुष्य हा जन्मत: स्वतंत्र्य आहे यावरुन हे स्पष्ट होते की मनुष्याला मानवी हक्काची प्राप्ती निसर्गत: होत असते. या हक्कांना कायदेत मान्यता असते. मानवी हक्क हे नैतिक स्वरुपाचे हक्क आहेत. या हक्कांना कायदयानुसार संरक्षण दिलेले असते आणि त्याचा नैतिक हक्क पोहचतो.

मानवी हक्काचे स्वरुप तात्वीक असतात आज देखील जगातील बहुतांश देश अथवा लोक मानवी हक्काकडे व्यवहारिक दृष्टीकोणातुन न पाहता तात्वीक दृष्टीकोनातून पाहतात. मानवी हक्क हे सर्वव्यापी हक्क आहेत. विशिष्ट एक समाजाला राज्याला नागरिक म्हणून हे हक्क प्राप्त होत नाही तर तो माणूस म्हणून हे हक्क प्राप्त करत असतो तसेच कोणताही भेदभाव न करता मानवी हक्क माणूस या नात्याने व्यक्तीला प्राप्त होतात. मानवी हक्कांची जागतिक संहिता तयार करत असतांना युनोसमोर या हक्काव्दारे मानवी प्रतिष्ठेची प्रस्थापना करणे हेच मुख्य उद्दिष्टे होते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर मानवी हक्क आवश्यक ठरतात. समाज, राज्य व इतर संस्थेच्या अधिकार यापेक्षा सर्वोच्च स्वरूपाचे मानवी हक्क आहेत. मानवी हक्काच्या पाठीमागे खऱ्या अर्थाने दंडात्मक शक्तीचा कसलाच अधिकार नाही. तोपर्यंत मानवी हक्कामागे दंडशक्ती उभी केली जात नाही. तोपर्यंत मानवी हक्काचे होणारे उल्लंघण शक्य नाही. मानवी हक्काचे पालन सर्वांना समान असले पाहिजे. मानवी हक्क हे अमर्यादीत नसून व्यापक असलेले दिसून येते.

भारत हा लोकशाहीने चालणारा देश आहे आपण लोकसभा आणि राज्य विधिमंडळातील लोकप्रतिनिधीची निवडणुकीव्दारे नेमणुक करीत असतो. एका राजकीय पक्षाकडून दुसऱ्या राजकीय पक्षाकडे सहजतेने सत्ता बहाल केली जाते. यावरून लोकशाहीवर असलेला जनतेचा दृढ विश्वास प्रकर्षाने जाणवतो.

तरी ही आज आपल्या देशात बलात्कार, कैदेतील मृत्यू, अत्याचार अशा विविध मानवी हक्क भंगाच्या बातम्या आपण रोजच वाचतो. पोलीस आणि सुरक्षा दलाकडून होणारा बेकायदेशीर वापर, बलात्कार, दडपशाही आणि अमानुष छळ अशी मानवी हक्क भंग रोज घडतच असतात अशी कृत्य प्रकर्षाने घडल्याने जनतेच्या मनात दहशत निर्माण होते. भारतातील कैदयांचा मृत्यू, बलात्कार, छळ अशा विविध गुन्हयाची १९९३ च्या अमॅनेस्टी इंटरनैशनल अहवाल दिला जाते.

सारांश :-

वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते की, मानवी हक्काच्या जागतिक जाहिरनाम्यात जिवीताच्या हक्काचे महत्व ओळखून शेवटी असे म्हणता येईल की, कोणत्याही व्यक्तीचा अपमान मानहाणी किंवा अमानुष छळ करता

येणार नाही. कारण शेवटी तो एक माणूस आहे. त्याचा सन्मान म्हणजे स्वातंत्र्य, बंधूता आणि न्याय या मुल्याची जोपासना करणे होय.

संदर्भ सूची :-

१) पाटील व्ही.बी. मानवी हक्क के सागर पब्लिकेशन पुणे,आवृत्ती-२००९

२) कुंभार नागोराव, कुलकर्णी सुधाकर, संपादक मानवी हक्क, बसवेश्वर महाविदयाल कॉलेज, आवृत्ती-२०१०

३) एरंडे व्ही.एल. मानवाधिकार, मुक्तारंग प्रकाशन, लातूर-२०१०

४) काळदाते सुधा भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापूरे □न्ड प्रकाशन
पब्लिकेशन औरंगाबाद, आवृत्ती-१९८८

मध्य, मध्यका व बहुलकातील संबंध

(Relationship between a , M and Z)

डॉ. राजेश गं. उंबरकर

ज्या विभाजनात मध्य = मध्यका = बहुलक (a = M = Z) असतो, अशा विभाजनाला साधारण विभाजन (Normal Distribution) किंवा Symmetrical विभाजन म्हणतात. याउलट ज्या विभाजनात मध्य # मध्यका # बहुलक असतो तेव्हा त्या विभाजनाला asymmetrical किंवा विषम विभाजन (Skewed Distribution) म्हणतात. जेव्हा विभाजन हे विषम असते तेव्हा मध्य, मध्यका व बहुलकातील संबंध महत्त्वाचा असतो. अशा विभाजनात मध्य आणि मध्यकेतील अंतर मध्य आणि मध्यकेच्या 1/3 असते.

कार्लपिअरसनच्या मते, जेव्हा वारंवारिता विभाजनात दोन मूल्यांना सारखा भार मिळतो तेव्हा त्यात दोन बहुलक असण्याची शक्यता असते. अशा दोन भूइष्टक असणाऱ्या विभाजनाला द्वि बहुलक विभाजन म्हणतात. यासाठी खालील सूत्र वापरतात.

Mode = Mean - 3 (Mean - Median)

$$Z = a - 3 (a - m)$$

OR

Mode = 3 Median - 2 Mean

and Median = Mode + 2/3 (Mean - Mode)

$$\text{Mode} = 3 \text{ Median} - 2 \text{ Mean}$$

$$= 3 m - 2 a$$

$$\text{Mode} = \text{Median} - \frac{2}{3} (\text{Mean} - \text{Mode})$$

$$\text{Mean} - \text{Mode} = 18$$

$$\text{Mode} = 13$$

$$\text{Median} = ?$$

$$(\text{Mean} - \text{Mode})$$

$$= 7 - \frac{2}{3} (18)$$

$$= 25$$

$$\text{Mode} = \text{Mean} - 3$$

$$(\text{Mean} - \text{Median})$$

$$= M - 3 (12)$$

$$= M - 36$$

$$\text{Mean} = ?$$

$$\text{Mode} = 6$$

$$\text{Mean} - \text{Median} = 12$$

$$36 + 12 = \text{Mean}$$

Mean = 42

यातील कोणतीही दोन मूल्ये माहित झाल्यास तिसरे मूल्य माहित करता येते. हे आपण मागेच पाहिले आहे. हेच खालील आकृतीत दाखविले आहे.



Mode गुण Mode

यालाच द्वी - बहूलक विभाजन म्हणतात.

यासाठी खालील सूत्र वापरले जाते.

$$\underline{Z = 3M - 2a}$$

भूयिष्टकाची वैशिष्टये :

१. बहूलक हे पण स्थितीचे माध्य आहे.
२. पदमालेतील लहानमूल्य व मोठे मूल्य यांचा पदावर पडणारा प्रभाव कमी असतो.
३. पदमालेतील बहूलक स्पष्ट नसेल तर ते निश्चित करणे कठीण जाते यात होणारा बदल उत्तरात बदल करणारा असतो.
४. बहूलक हे वारंवारतेवर अवलंबून असते. म्हणजेच पदावली पेक्षा वारंवारिता महत्त्वाची असते.
५. ज्या पदांची वारंवारता सर्वात जास्त आहे त्या पदाचे मूल्य बहूलक असते.
६. हे एक महत्वाचे माप आहे.

गणित करताना खालील टप्पे महत्त्वाचे आहेत. :

- सर्वप्रथम वारंवारितेतील मोठया संख्येला अंडरलाईन करावे, याला क्रमांक I st म्हणावे.
- त्यानंतर दुसऱ्या स्तंभात वारंवारितेच्या दोन दोन च्या जोडया करून त्यांची बेरीज करावी व आलेले उत्तर बरोबर जोडीच्या मध्य भागी लिहावे. तसेच यातील मोठया अंकाला अंडर लाईन करावे.
- तिसऱ्या स्तंभात वारंवारितेचा (f) पहिला अंक सोडून वारंवारितेच्या दोन दोन च्या जोडया करून त्यांची बेरीज करावी व आलेले उत्तर बरोबर जोडीच्या मध्य भागी लिहावे. तसेच यातील मोठया अंकाला अंडर लाईन करावे.
- चौथ्या स्तंभात (f) वारंवारितेच्या तीन तीन च्या जोडया (गट) करून त्यांची बेरीज करावी व आलेले उत्तर बरोबर जोडीच्या मध्य भागी लिहावे. तसेच यातील मोठया अंकाला अंडर लाईन करावे.
- पाचव्या स्तंभात वारंवारितेचा (f) पहिला अंक सोडून वारंवारितेच्या तीन तीन च्या जोडया (गट) करून त्यांची बेरीज करावी व आलेले उत्तर बरोबर जोडीच्या मध्य भागी लिहावे. तसेच यातील मोठया अंकाला अंडर लाईन करावे.
- सहाव्या स्तंभात वारंवारितेचा (f) पहिले दोन अंक सोडून वारंवारितेच्या तीन तीन च्या जोडया (गट) करून त्यांची बेरीज करावी व आलेले उत्तर बरोबर जोडीच्या मध्य भागी लिहावे. तसेच यातील मोठया अंकाला अंडर लाईन करावे.
- यानंतर विश्लेषन किंवा अवलोकन तक्ता तयार करावा. प्रत्येक स्तंभातील (रकान्यातील) सर्वात मोठे पद विचारात घेऊन तक्ता तयार करावा. त्यांच्याशी संबंधीत पदमूल्ये लक्षात घेण्यासाठी ही पध्दती वापरली जाते. प्रत्येक स्तंभातील सर्वात मोठया पदांच्या आधारे संबंधित पदमूल्या खाली खूणा (√) करून नंतर त्या खूणांची बेरीज करतात आणि जे पदमूल्य सर्वात जास्त वेळा आले असेल त्यालाच बहूलक (Z) म्हणतात. साध्या पदमालेत बहूलक काढला जात नाही. संतत पदमालेत पुढील सूत्राचा वापर केला जातो.

$$Z = L_1 + \frac{f_1 - f_0}{2f_1 - f_0 - f_2} \ (L_2 - L_1)$$

खंडीत पदमालेत बहुलक काढणे :

खालील माहितीच्या आधारे बहुलक/भुयिष्टक माहित करा.

Calculate the mode from the following data.

गुण :	10	20	30	40	50	60	70
विद्यार्थी :	5	7	9	12	8	6	4

	I	II	III	IV	V	VI
x	**f**	**वरून 2-2 ची बेरीज**	**प्रथम (f) अंक सोडून 2-2 ची बेरीज**	**वरून 3-3 ची बेरीज**	**प्रथम (f) अंक सोडून 3-3 ची बेरीज**	**प्रथम (f) दोन अंक सोडून 3-3 ची बेरीज**
10	5	] 12	-	] 21	-	-
20	7		] 16		] **28**	-
30	9	] **21**		] **26**		] **29**
40	**12**		] **20**			
50	8	] 14			] 18	
60	6		] 10	-		-
70	4	-				-

अवलोकन तक्ता Observation Table

x	f	I	II	III	IV	V	VI	Total
10	5							-
20	7					√		1
30	9		√			√	√	3
40	12	√	√	√	√	√	√	**6**
50	8			√	√		√	3
60	6				√			1
70	4							-

Z = 40

संतत पदमालेत बहुलक काढणे :

1. खालील माहितीच्या आधारे बहुलक / भुयिष्टक माहित करा.
   Calculate the mode from the following data.
   गुण : 10-20 20-30 30-40 40-50 50-60 60-70
   विद्यार्थी : 5 12 17 13 8 6

x	I	II	III	IV	V	VI
10-20	5	17	-	**34**	-	-
20-30	12		**29**		**42**	-
30-40	**17**	**30**				**38**
40-50	13		21	27		
50-60	8	14			-	
60-70	6		-		-	-

अवलोकन तक्ता Observation Table

x	f	I	II	III	IV	V	VI	Total
10-20	5				√			1
20-30	12 f0			√	√	√		3
30-40	17 f1	√	√	√	√	√	√	**6**
40-50	13 f2		√			√	√	3
50-60	8						√	1
60-70	6							-

Class = 30-40

या वरून निश्चित बहूलक माहित करता येत नाही. उत्तर 30 आहे की 40, किंवा या दोन्ही संख्यांच्या मधली संख्या आहे हे शोधण्यासाठी संतत पदमालेत खालील सूत्राचा वापर केला जातो.

$$Z = L_1 + \frac{f_1 - f_0}{2 \times f_1 - f_0 - f_2} (L_2 - L_1)$$

L_1 = गटातील लहान संख्या

L_2 = गटातील मोठी संख्या

F_1 = गटाची वारंंवारिता

F_0 = आलेल्या गटाच्या वरील गटाची वारंंवारिता

F_2 = आलेल्या गटाच्या खालील गटाची वारंंवारिता

$L_1 = 30$ $L_2 = 40$ $F_1 = 17$ $F_0 = 12$ $F_2 = 13$

$$Z = 30 + \frac{17 - 12}{2 \times 17 - 12 - 13} (40 - 30)$$

$$Z = 30 + \frac{5}{34 - 25} (10)$$

$$Z = 30 + \frac{50}{9}$$

$$Z = 30 + 5.55$$

$$Z = 35.55$$

गाँधी जी की प्रमुख विचारधारा का वर्तमान विचारधारा से तुल्नात्मक विश्लेष्ण

नसीमुद्दीन

एम.ए. अंग्रेजी, समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, उर्दू, बी.एड.

डिप्लोमा इन रेल ट्रांसपोर्ट एण्ड मैनेजमेन्ट, अदीब कामिल, मौअल्लिम वरिष्ठ अध्यापक हिन्दू इण्टर कालेज, चान्दपुर (बिजनौर) उत्तर प्रदेश

महात्मा गाँधी भारतीय स्वतंत्रता आन्दोलन के प्रमुख राजनेता एवं आध्यात्मिक नेता थे। उन्होंने सत्य, अंहिसा और सत्याग्रह के माध्यम से हिंसा व अत्याचार का प्रतिकार किया। गाँधी जी प्लेटो, अरस्तू की भांति दार्शनिक नहीं थे किन्तु धार्मिक भावना से प्रेरित होकर जनकल्याण के लिए कार्य करने वाले सच्चे कर्म योगी थे। गाँधी जी विशुद्ध राजनीतिक विचारक न होकर व्यवहारिक पुरूष थे। वे वर्तमान भारत के राष्ट्र निर्माता थे तभी भारतवासी उनको राष्ट्रपिता या बापू के नाम से याद करते हैं। राजनीति को उन्होंने धार्मिक और नैतिक लक्ष्य की सिद्धि के लिए अपनाया। गाँधी जी राजनीति को एक साधन मानते थे। जो कि धार्मिक और नैतिक लक्ष्यों की पूर्ति के लिए जरूरी था। उन्होंने व्यवस्थित रूप से अपने सिद्धान्तों की विवेचना नहीं की बल्कि सामने आने वाली समस्याओं के समाधान के लिए तत्कालीन परिस्थितियों के अनुसार चिंतन किया तथा अपने विचार दिये। उनके विचार अनेक पुस्तकों लेखों और प्रवचनों आदि के रूप में बिखरे पड़े हैं। उन्होंने किसी नये वाद का सूत्रपात नहीं किया और स्वयं स्वीकार किया कि गाँधीवाद नाम की किसी वस्तु का अस्तित्व उनकी नजर में नहीं।

राजनीति और नैतिकता:–

इटालवी विचारक मैक्यिावली ने राजनीति और नीतिशास्त्र में सम्बन्ध विच्छेद करते हुए तर्क दिया था कि **'' यदि साध्य उचित हो तो साधन अपने आप उचित मान लिया जायेगा''।**

इसके विपरीत गाँधी जी ने राजनीति व नीतिशास्त्र की एकता पर बल देते हुए कहा **''राजनीति के क्षेत्र में साधन और साध्य देनों की समान रूप से पवित्र होने चाहिये''** गाँधी जी का दर्शन चूंकि एक नैतिक दर्शन है अत: वह साधन एवं साध्य दोनों की पवित्रता पर बल देते हैं, क्योंकि उनका मानना है कि अच्छे साधनों से ही सही साध्य की प्राप्ती की जा सकती है। बुरे साधनों से अच्छे साध्य की कल्पना करना कठिन है।

गाँधी जी का यह भी मानना था कि मनुष्य की सम्पूर्ण राजनीतिक, आर्थिक और सामाजिक समस्यायें अपने मूल रूप में नैतिक समस्यायें है, और इनका निराकरण तभी हो सकता है जब मनुष्य पवित्र आचरण और हृदय की शुद्धता पर बल दे । महात्मा गाँधी नीतिशास्त्र को राजनीति शास्त्र और अर्थशास्त्र से ऊँचा स्थान देते हैं। उनके दृष्टिकोण में राजनीति उसी सीमा तक मान्य है जहाँ तक वह नैतिकता के अनुरूप साधक हो। गाँधीवाद के नैतिकता तथा साधनों की पवित्रता का विचार उन्हें मार्क्स तथा मैक्यिावली से अलग करता है।

आज की राजनीति और नैतिकता पर जब हम बात करते हैं तो यह पाया जा रहा है कि राजनीति का नैतिकता से कोई समन्वय नहीं है। आज की राजनीति का नैतिकमूल्यों से कोई नाता दिखाई नहीं पड़ता है। भारत संसार का सबसे बड़ा लोकतान्त्रिक देश है और यहाँ पर अनेको राष्ट्रीय दल एवं अनेक क्षेत्रीय दल सक्रिय हैं और उनके अनगिनत राजनेता सक्रिय है लेकिन किसी भी दल के राजनेता की कथनी और करनी समान नहीं दिखती है। जनता से बड़े लोक लुभावने वादे, एक दूसरे नेता को अपशब्द, भद्दे अमर्यादित शब्दों के वाणों से प्रहार केवल नीचा दिखाने के लिये किये जाते हैं। नैतिक मूल्य ८० प्रतिशत राजनेताओं के व्यवहार में देखने को नहीं मिलते हैं।

जैसे कांग्रेस के नेता राहुल गाँधी पिछले दिनों चुनाव से पहले प्रधानमंत्री को चोर शब्द से संम्बोधित करते दिखाई पड़ते हैं। तो प्रधानमंत्री एवं अन्य मन्त्रीगण सोनिया गाँधी, राहुल गाँधी, अखिलेश यादव, मायावती, ममता बनर्जी, अरविन्द केजरीवाल पर साँप, छछुन्दर, पप्पू, बुआ, बबुआ, दीदी, घेरने वाले आदि अनैतिक शब्दों के प्रहार करके अपनी राजनीति के साधन एवं साध्य दोनों को ही अपवित्र करते नजर आते हैं। नैतिक गरिमा आज की राजनीति में कहीं दूर दूर तक दिखाई नहीं पड़ती है। आज के नेता नीतिशास्त्र को राजीनतिशास्त्र और अर्थशास्त्र के सबसे निम्न श्रेणी के पायदान पर लाकर खड़ा कर चुके हैं। उनके राजनीतिक, आर्थिक व सामाजिक जीवन में नैतिक मूल्यों के लिये कोई स्थान नहीं है। **भ्रष्टाचार, शिष्टाचार का रूप धारण कर चुका है।** आज के लोंगो में पवित्र आचारण एवं हृदय की शुद्धता में कमी आती जा रही है। भ्रष्ट आचरण लेकर आज का मानव समाज को लूटने के लक्ष्य लेकर प्रकट होता है और अपने लक्ष्यों की पूर्ति के लिए वह वैद्य व अवैद्य, उचित और अनुचित, नैतिक एवं अनैतिक साधनों से अपने साध्यों को प्राप्त करने का प्रयास किये जा रहा है।

धर्म और राजनीति:–

गाँधी जी ने अपनी आत्मकथा सत्य के साथ मेरे अनुभव में स्वीकारा था ''सत्य की मेरी पूजा मुझे राजनीति में खींच लाई है जो मनुष्य यह कहता है कि धर्म का राजनीति से कोई सम्बन्ध नहीं है वह धर्म को नहीं जानता है। **(सन्दर्भ : १) – (गाँधी जी की आत्मकथा के भाग नं० ५ अध्याय नं० ४३ पृष्ठ नं० ५३९, यूनिकोड संस्करण संजय खत्री, नवजीवन प्रकाशन मन्दिर अहमदाबाद ३८००१४)**

गाँधी जी ने धर्म को जीवन और समाज का आधारभूत तत्व स्वीकार किया है। जिसे निकाल देने से समाज और व्यक्ति दोनों निष्प्राण एवं शून्य हो जाते है। धर्म को उन्होंने कभी संकुचित अर्थ में नहीं लिया। न ही किसी धर्म को बढ़ावा देने के लिये विशेष रूप देते हुऐ राजनीति शास्त्र बनाया। संकीर्ण मनोवृत्ति के विपरीत वह सभी धर्मो का सारतत्व व ध्ये एक ही मानते थे। वह अपने जीवन में जो भारतवासियों को भजन सुनाया करते थे उसके बोल बोल कुछ इस प्रकार हैं।

''रघुपति राघव राजा राम पतित् पावन सीता राम''। ''ईश्वर अल्लाह तेरो नाम, सबको सम्मति दे भगवान''। गाँधी जी का मानना था ''धर्म के प्रश्न में श्रद्धा सर्वोपरि होती है। यदि एक ही वस्तु के प्रति सबकी एक ही श्रद्धा हो, तो संसार में एक ही धर्म विद्यमान हो''। **(सन्दर्भ (२) – आत्मकथा के भाग ५ के अध्याय २६ पृष्ठ नं० ४८० पर अंकित)** इसलिये हर हर धर्म के लोग उनके कट्टर अनुयायी बन गये थे और उनके मुँह से निकले शब्दों को सब लोग आदेश मानकर उनका पालन करते और अपने जीवन में उनके शब्दों को ज्यूँ का त्यूँ उतार लिया करते थे।

गाँधी जी ने समाजिक, आर्थिक, राजनीतिक तथा धार्मिक जीवन को अलग अलग नहीं देखा बल्कि सभी को जीवन का अखण्ड तत्व मानकर धर्म को उसका मूलतत्व समझा। **उनका मानना था कि धर्म मनुष्य को निकम्मा रहना नहीं सिखाता बल्कि कर्मशील रहना सिखाता है।** उन्होंने स्वंय स्वीकार किया कि उनकी धर्मनिष्ठा ही उन्हें राजनीति के क्षेत्र में लाई है। वह धर्म को राजीनति से पृथक नहीं मानते है। वह मानते है कि जो यह कहते हैं कि धर्म का राजनीति के साथ कोई सम्बन्ध नहीं है वह यह नहीं जानते कि धर्म क्या है? धर्म से पृथक कोई राजनीति हो ही नहीं सकती। धर्म से पृथक होकर राजनीति एक **मृत्युजाल** है, क्योंकि यह आत्मा का हनन करती है।

उन्होंने धर्म को राजनीति से मिलन जन कल्याण के लिये अवश्यक तत्व माना।

आज की राजनीति की जो प्रवृत्ति है उसमें दिखावा तो धर्म का होगा लेकिन राजनीति करने का मकसद धर्म का लबादा ओढ़कर देश के समाज का हनन, आर्थिक स्रोतों का हनन, भ्रष्टाचार, दूसरे समुदायों का शोषण व उन पर अत्याचार होता है। समाज के धर्मों के बीच नफरत फैलाकर उनको आपस में लड़ाया जाता है। जिससे वे अपने सम्प्रदाय के मतों का ध्रुवीकरण करके संकीर्ण मनोवृत्ति का परिचय देने में भी तनिक मात्र हिचकते नहीं है। धर्मनिरपेक्ष सोच के नेता हो या साम्प्रदायिक सोच के नेता हो उनका ध्येय मात्र सत्ता हासिल करना है। जन कल्याण व सामाजिक सौहार्द से कोई लेना देना नहीं होता है। वर्तमान राजनीति में धर्म एक हथियार बन चुका है जिसके माध्यम से देश की सत्ता हासिल करके लोगों में धार्मिक उन्माद फैलाकर देश के आर्थिक स्रोतों का कसरत से हनन अपने हितो को साधने के लिये किया जाता है। जनता का ध्यान अपने धर्म की रक्षा में लगा रहता है और राजनेता स्विस बैंक में काला धन जमा करते रहते हैं। आज भारत का भी खरबो रूपया इसी बैंक में जमा है जिसके लाने की बात वर्तमान प्रधानमंत्री जी ने सत्ता में आने से पहले जनता से की थी लेकिन सत्ता में आने के बाद अपनी ऊर्जा नोटबन्दी, जी.एस.टी., तीन तलाक, सी.ए.ए. आदि जैसे कार्यो में तो व्यय कर दी लेकिन देश का काला धन इनके कार्यकाल में **२८.०६.२०२१ को ५० प्रतिशत से ज्यादा बढ़कर १४००० करोड़ रूपये हो चुका है। (सन्दर्भ (३) –BBC News व आज तक मीडिया २८.०६.२०२१)** आज की राजनीति धर्म को सामने रखकर पीछे से देश की सम्पत्ति को लूटना मात्र रह गई है। धर्मनिष्ठा एक पाखण्ड का रूप ले चुकी है।

गाँधी जी की राजनीति का अध्यात्मीकरण:–

धर्म, अध्यात्म और नैतिकता ये तीनों ही अभिव्यक्तियाँ गाँधी जी के लिए एक अर्थ में समानार्थक ही थी। क्योंकि मैक्यिावेलियन राजनीति के विपरीत गाँधी ने राजनीति के विकृत रूप को स्वीकार नहीं किया। गाँधी जी ने स्पष्ट घोषणा की कि धर्म के बिना राजनीति पाप है। राजनीति के प्रचलित मूल्यों के स्थान पर उन्होंने शुद्ध धार्मिक, नैतिक तथा अध्यात्मिक मूल्यों की स्थापना पर जोर दिया।

महात्मा गाँधी ने राजनीति का अध्यात्मीकरण किया उनका मानना था कि यदि राजनीति को मानव समाज के लिये वरदान बनाना है तो उसे उच्चतम नैतिक और आध्यात्मिक सिद्धान्तों पर आधारित होना चाहिए।

१.मूलत: धार्मिक प्रवृत्ति के व्यक्ति, भारतीय परमपरा के महान संत

२.धार्मिक होते हुए भी गाँधी जी का दृष्टिकोण लौकिक तथा मानवतावादी था।

३.राजनीति में नीति धर्म और मानवता पर बल दिया जबकि राज और सत्ता पर अधिकार उनका ध्येय नहीं था।

४.उन्होंने सार्वजनिक रूप से एक बार कहा था कि **''राजनीति का चौला पहने हृदय से धार्मिक व्यक्ति हूँ, देश प्रेम की भी धर्म है और राजनीति देश धर्म है''। गाँधी जी ने स्वीकारा था कि ''मेरे लिये बाईबिल उतनी ही आदरणीय धर्म पुस्तक है जितनी गीता है और कुरान है। (सन्दर्भ – (४) हरिजन ०६.०३.१९३७– मेरे सपनों का भारत पृष्ठ नं० २७१)**

५. (क) राजनीति मूलता धर्म एवं नैतिकता की शाखा है। यह व्यक्ति के लिये संघर्ष नहीं बल्कि पिछड़े, दलित लोगों को आगे लाकर उनके जीवन में सुधार लाना तथा स्वतंत्रता, समानता के सि(ान्तों के आधार पर बन्धुत्व की भावना का विकास करना है। गाँधी जी ने हिन्दू मुस्लिम एकता पर बल दिया। **(सन्दर्भ (५) – आत्मकथा सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ५ अध्याय ४३ पृष्ठ नं० ५३७)**

५. (ख) गाँधी जी ने मानव के सर्वांगीण विकास के लिए बुनियादी शिक्षा पर जोर दिया था कि भारत का प्रत्येक नागरिक कम से कम बुनियादी शिक्षा जरूर ग्रहण करें और इसी सन्दर्भ में उन्होंने कहा था कि ''बुनियादी शिक्षा का उद्देश्य चरित्र के विकास के लिए सर्वोपरि होता है''। **(सन्दर्भ (६) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ४ अध्याय ३२ के पृष्ठ नं० ३६७)**

६.सत्य तथा अहिंसा पर आधारित नैतिक राजनीति से विदेशी हुकूमत का सामना तथ विदेशी सत्ता को देश छोड़ने पर मजबूर किया।

७.नैतिकता तथा शुद्ध आचरण ही धर्म है। राजनीति के अध्यात्मीकरण का अर्थ शक्ति, बलप्रयोग, विद्रोह का विनाश के स्थान पर प्रेम, सहयोग, समंवय तथा संगठन के तत्वों का समावेश करना था।

८.गाँधी जी की राजनीति धर्म की पूरक थी। वह पहले धार्मिक व्यक्ति थे बाद में राजनीतिज्ञ थे। उन्होंने प्रयोग के माध्यम से यह सिद्ध कर दिया कि धार्मिक राजनीति का सिद्धान्त अव्यवहारिक नहीं बल्कि पूर्ण व्यवहारिक है।

(९)गाँधी जी ''सादा जीवन, उच्च विचार'' में विश्वास रखते थे और वह हर भारतीय से आशा करते थे कि सभी भारत वासी उनके इस विचार को अपने जीवन में उतारे तभी सही अर्थों में हम देशप्रेम के अधिकारी होंगे। लौकिक सम्बन्ध की अपेक्षा आध्यात्मिक सम्बन्ध अधिक मूल्यवान हैं। आध्यात्मिक सम्बन्ध से रहित लौकिक सम्बन्ध प्राणहीन देह के समान हैं। **(सन्दर्भ (७) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ५ के अध्याय ६ पृष्ठ ४२२)**

पूर्व प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री जी के निधन के बाद भारत की राजनीति से आध्यात्म का पतन हो चुका है। राजनीति सिर्फ धार्मिक भावनाओं को आघात पहुँचाना, अल्लाह और राम के नाम पर लोगों को लड़ाना, अराजक तत्वों को बढ़ावा देना, अश्लीलता परोसना, महिलाओं के मान सम्मान की रक्षा न करना, दलितों, पिछड़ो, आदिवासियों, अल्पसंख्यकों का शोषण करना, देश के आर्थिक स्रोतों का हनन करना, भ्रष्टाचार फैलाना, धर्म, जात, पात, वर्ग, समुदाय, भाषा, क्षेत्र, राज्य के नाम पर जनता में उन्माद फैलाना मात्र राजनीति की ध्येय बन चुका है। धार्मिक प्रवृत्ति का चोला ओढ़कर पाखण्ड राजनीति अपना विकराल रूप ले चुकी है। जिनमें अलौकिकता, अमानवता के विचार कूट कूट कर भरे हैं। वर्तमान राजनीति का एक मात्र ध्येय राज सत्ता में बने रहना है। चाहे इसके लिए देश का मान सम्मान, प्रतिष्ठा दाव पर ही क्यों ने लग जाये। आज गाँधी जी की सोच के बिल्कुल विपरीत है। **अधिकतर राजनेता धर्म का चोला पहने हृदय से अनैतिक राजनीतिज्ञ है।** राजनीति देश धर्म न होकर पेट धर्म हो चुकी है।

सत्य और अहिंसा का स्थान असत्य और हिंसा ने ले लिया है। नैतिकता और शुद्ध आचरण आज की राजनीति के लिये एक दिवा स्वप्न हो चुका है। जो जितना बड़ा धार्मिक होने का दावा करके सत्ता पर अधिकार जमाता है वह उतना ही बड़ा अधार्मिक, अमानवतावादी, असत्यवादी, भ्रष्टाचारी, अत्याचारी, व्यभतिचारी, सिद्ध होता है। वर्तमान राजनेताओं की विचारधारा पर्दे के आगे दिखाने की कुछ ओर है और पर्दे के पीछे बिल्कुल उसके विपरीत दिखाई पड़ती है।

सत्याग्रह, सत्य और अहिंसा:–

(सन्दर्भ (८) – गांधी जी ने सत्याग्रह का वर्णन अपनी आत्मकथा में सर्वप्रथम वर्णन भाग ४ अध्याय २६ पृष्ठ नं० ३५१ में प्रथम बार किया।)

गाँधी जी ने सत्याग्रह सबसे पहले दक्षिणी अफ्रीका में भारतीयों को उनका अधिकार दिलाने के लिए प्रयोग किये जाने वाला हथियार बनाया था जिसके बल पर वहाँ की सरकार को झुका कर भारतीयों को उनका मान सम्मान दिलाया १९१७ से १९४७ तक भारत में भी उसी शस्त्र की विचारधारा को अपना कर देश को गुलामी की बेड़ियों से आज़ाद करा कर ही दम लिया। इसके महत्व को उन्होंने अपनी आत्मकथा में कुछ ऐसे समझाया था कि जो जनता स्वतंत्रता चाहती है उसके पास अपनी रक्षा का अन्तिम उपाय होना चाहिये। साधारणत: ऐसे उपाय हिंसात्मक होते हैं पर सत्याग्रह शुद्ध अहिंसक शस्त्र है। उसका उपयोग और उसकी मर्यादा बताना मैं अपना धर्म समझता हूँ। **(सन्दर्भ (९) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव भाग ५ अध्याय ३ पृष्ठ ४१६)**

गाँधी जी ने सत्याग्रह की उत्पत्ति सर्वप्रथम अपनी आत्मकथा में भाग ४अध्याय २६ पृष्ठ नं० ३९१ सर्वप्रथम बार किया। गाँधी जी ने सत्य का महत्व बताते हुऐ कहा था ''सत्य को मैंने जिस रूप में देखा है, जिस मार्ग में देखा है, उसे उसी तरह प्रकट करने का सतत् प्रयत्न किया है। जिससे सत्य और अहिंसा के प्रति लोगों की अधिक आस्था उत्पन्न होगी''। **(सन्दर्भ (१०) – आत्मकथा के भाग ५ अध्याय ५ पूर्ण आहुति के पृष्ठ नं० ५३८)**

गाँधी जी ने कहा था कि ''सत्य से भिन्न कोई परमेश्वर नहीं है ऐसा मैंने कभी अनुभव नहीं किया। यदि इन प्रकरणों के पन्ने पन्ने से यह प्रतीति न हुई हो कि सत्यमय बनने का एक मात्र मार्ग अहिंसा ही है तो मैं ऐसे प्रत्यन को व्यर्थ समझता हूँ। मेरी अहिंसा सच्ची होने पर भी कच्ची है, अपूर्ण है। अत: हज़ारों सूर्यों को इकट्ठा करने से भी जिस सत्यरूपी सूर्य के तेज का पूरा माप नहीं निकल सकता। सत्य की मेरी झांकी ऐसे सूर्य की केवल एक किरण के दर्शन के समान ही है। **(सन्दर्भ (११) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के अध्याय ५ भाग ३ पृष्ठ नं० ५३८ व ५३९)**

गाँधी जी ने सत्य और अहिंसा का महत्व समझाते हुऐ कहा था कि ''बिना आत्म शुद्धि के जीवन मात्र के साथ ऐक्य सध ही नहीं सकता। आत्मशुद्धि के बिना अहिंसा धर्म का पालन सर्वधा असम्भव है। अशुद्ध आत्मा परमात्मा के दर्शन करने में असमर्थ है अतएव जीवन मार्ग के सभी क्षेत्रों में शुद्धि की ज़रूरत है''। **(सन्दर्भ (१२) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ५ अध्याय ५ के पृष्ठ नं० ५३९)** अनुवाद – काशीनाथ त्रिवेदी, युनिकोड संस्करण सम्पादक संजय खत्री, प्रकाशित – नवजीवन प्रकाशन मन्दिर अहमदाबाद ३८००१४

गाँधी जी ने अपनी आत्मकथा "My Experiments with Truth" में लिखा है। ''मेरे निरन्तर अनुभवों ने मुझे विश्वास दिला दिया है कि सत्य से भिन्न कोई ईश्वर नहीं है और सत्य सिाि का एक मात्र उपाय अहिंसा है, अहिंसा व्यापक वस्तु है, अहिंसा मनुष्य के पास परमाणु बम से भी अधिक शक्तिशाली ब्रह्मस्त्र है''। **(सन्दर्भ (१३) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ४ अध्याय नं० ३९ पृष्ठ नं० ३८५)**

गाँधी जी का कहना है ''मनुष्य जब तक स्वेच्छा से अपने को सबसे नीचे नहीं रखता है, तब तक उसको मुक्ति नहीं मिलती है। अहिंसा नम्रता की पराकाष्ठा है। और यह अनुभव सि(बात है कि इस नम्रता के बिना मुक्ति कभी नहीं मिलती है।'' **(सन्दर्भ (१४) – गाँधी जी की आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ५, अध्याय ५ पूर्णाहुति के पृष्ठ नं० ५३९)**

इसी क्रम में गाँधी जी का कहना है कि **''भारत अपने मूल स्वरूप में कर्मभूमि है, भोग भूमि नहीं''। (सन्दर्भ (१५) – मेरे सपनों का भारत, अध्याय १, पृष्ठ नं०१ (सन्दर्भ – (१६) – यंग इण्डिया–२१.०२.१९२१ में प्रकाशित)**

इस प्रकार गाँधी जी की सत्य और अहिंसा की अवधारणा अलग नहीं बल्कि एक दूसरे से घनिष्ठता से जुड़े है। गाँधी जी के अनुसार **''सत्य ही ईश्वर है''।** उनके अनुसार सत्य वही है जिसकी सत्ता होती है अर्थात सत्य का अस्तित्व तीनो कालों में बना रहता है। सामान्यता सत्य का अर्थ सच बोलने से है लेकिन गाँधी जी ने सत्य का व्यापक अर्थ लेते हुये **''आचार विचार, विचार तथा वाणी में सत्य का होना आवश्यक माना है''। ''राजनीति में सत्य के पूर्ण पालन का गाँधी जी का प्रयोग विश्व इतिहास के लिये अविस्मरणीय घटना है (सन्दर्भ (१७) – हरिजन, १५.०१.१९३८ के पृष्ठ नं० ४१८)** गाँधी जी का मानना है **''अहिंसा सत्य प्राप्ति का मार्ग है''**। शब्दों की द्रष्टि से अहिंसा का अर्थ है हिंसा न करना अथवा किसी जीव को पीड़ा न पहुँचाना, परन्तु यह अहिंसा का नकारात्मक पक्ष है। जो यह संकेत देता है कि मनुष्य को क्या नहीं करना चाहिये लेकिन **''गाँधी जी अहिंसा के सकारात्मक स्वरूप के पक्षधर हैं। जिसमें मनुष्य को यह पता चलता है कि उसको क्या करना चाहिये''। (सन्दर्भ (१८) – हरिजन १८.०९.१९३८ में प्रकाशित के पृष्ठ नं० २५९)**

अहिंसा का सकारात्मक पक्ष है मानव प्रेम इसे प्रेम और करूणा की भावना कहा जाता है। **अहिंसा की द्रष्टि से कोई भी घृणा का पात्र नहीं हो सकता है यहाँ तक कि पापी भी नहीं।**

गाँधी जी बाईबिल के इस वाक्य के अनुयायी है कि ''**Hate the sin, Not the sinner.**'' यदि कोई भी पापी सम्पर्क में आता है तो अहिंसक उसे अपने चरित्र बल से पापमुक्त करके सन्मार्ग पर चलने के लिए प्रेरित करता है। अहिंसक समाज से अपना सम्बंध नहीं तोड़ सकता है, अर्थात समाज का प्रत्येक मानव से प्रेम करना सिखाता है।

गाँधी जी सर्वोदय के सिद्धान्त को समझाते हुऐ कहते हैं कि ''सबकी भलाई में हमारी भलाई निहित है''। **(सन्दर्भ (१९) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ४ अध्याय १८ पृष्ठ नं० ३२८)**

गाँधी जी ने अपनी विचारधारा का जो दर्शन देश, विदेश व भारतीय समाज को दिया था आज के वर्तमन परिपेक्ष में वह शून्य की डिग्री पर है। आज के नेताओं की विचारधारा कथनी और करनी के बिल्कुल विपरीत जा रही है। आज अपने उद्देश्यों की पूर्ति हेतु विभिन्न पार्टियों के राजनेता असत्य एवं हिंसा के मार्ग पर अग्रसर है। आज वर्तमान युग में राजनेता आचार विचार, विचार तथा वाणी में तो सत्य के दिखावे का पाखण्ड करते नजर आते हैं। लेकिन वास्तव में वे असत्य और हिंसा के मार्ग को अपने जीवन में ग्रहण करते हैं। उनकी कार्यशेली इस कहावत पर निर्भर करती है **''मुख में राम बगल में छुरी''**। जिसके मार्ग पर चलते हुए आज की मानसिक, राजनैतिक, धार्मिक, सामाजिक, नैतिक, आर्थिक विचार धारा अपने वैचारिक मूल्य के पतन के निम्न स्तर के पायदान पर खड़ी है उनका गाँधी जी की विचार धारा से बिल्कुल विपरीत का मार्ग है। आज की राजनीतिक विचारधारा के परिप्रेक्ष्य में अगर अवलोकन करें तो आज के नेता देश को आर्थिक रूप से भी कमजोर कर रहे हैं बड़े बड़े घोटाले, जैसे सत्यम् घोटाला, टू जी स्पैक्ट्रम घोटाला, पी.एन.बी. घोटाला आदि ऐसे अनेक घोटाले है जिनके माध्यम से भारत को आर्थिक रूप से बहुत हानि हुई है जबकि गाँधी जी ने देश पर सब कुछ निछावर कर दिया।

गाँधी जी ने सभी देशवासियों से कहा था कि ''अपने घर के झगड़े भूल जाओं यदि इस का अर्थ यह है कि अत्याचार और अधिकारियों के अपकृत्य सहन कर लिये जायें जो यह असम्भव है, संगठित अत्याचार का सामना अपनी समूची शक्ति लगाकर करना मैं अपना धर्म मानता हूँ''। **(सन्दर्भ (२०) – आत्मकथा, सत्य के साथ मेरे अनुभव के भाग ५, अध्याय २७, पृष्ठ नं० ४८६)**

गाँधी जी ने देश की और जनता की सेवा में सारा जीवन एक धोती में रहकर गुजार दिया उनके इस रूप को देख कर ब्रिटेन के प्रधानमंत्री (विंस्टन चर्चिल) ने उन्हे द्वितीय गोलमेज सम्मेलन ०७.०९.१९३१ को **''अर्धनग्न फकीर''** कहा था और आज के नेताओं की पोशाक भी ५०—५० लाख की बनती है और उन कपड़ों पर प्रेस भी ब्रिटेन में होकर आती है। आजके नेताओं के खाते स्विस बैंक में खुले हुऐ हैं और खरबों रूपया इन खातों में हर साल जमा होता है यह काला धन कमाने में और इसको विदेशी बैंक में जमा करने में नेता अपना मौलिक कर्तव्य समझ रहे हैं। जबकि दूसरी तरफ गाँधी जी ने अंग्रेजों को भारतीय रूपया ब्रिटेन ले जाने के खिलाफ आमरण अनशन किये व्रत रखे और उनके खिलाफ आन्दोलन चलाए और अन्त में देश की सेवा करते करते एक चरम पंथी के हाथों अपनी छाती पर गोली भी खाई और ३० जनवरी १९४८ को सदैव के लिए इस संसार को छोड़ गये।

निष्कर्ष:—

आज अगर हमारे देश के नेताओं को अपने देश से वास्तव में ही प्रेम है तो उन्हें देश सेवा के लिए गाँधी के विचारों को अपनाना होगा तभी देश और पूरी मानवता का कल्याण हो सकता है।

गाँधी जी ने कहा था कि **''मुझे इस बात में सन्देह नहीं है कि सामप्रदायिक मदभेदों का कुहासा आजादी के सूर्य के उदय होते ही दूर हो जायेगा''। (सन्दर्भ (२१) — यंग इण्डिया २१.१०.१९३१, मेरे सपनों का भारत पुस्तक के अध्याय ६९ पेज नं० २६)**

गाँधी जी आगे कहते हैं कि ''अस्पृश्यता अभिषाप है हिन्दू धर्म में जो अस्पृश्यता देखने में आती है वह एक अमिट कलंक है, यह एक भयंकर अभिषाप है''। **(सन्दर्भ (२२) & Speeches and writings of M. Gandhi Page 378. मेरे सपनों का भारत के अध्याय ६ पृष्ठ नं० २६५)**

गाँधी जी का अटूट विश्वास था कि अन्याय और अत्याचार का मुकाबला हिंसा से नहीं बल्की प्रेम, दया, करूणा, त्याग और सत्य से किया जा सकता है। अहिंसा सिर्फ एक उपदेश नहीं है, बल्कि जीवन का एक क्रियात्मक सिद्धान्त है। विश्व शान्ति, समाजिक व्यवस्था तथा व्यक्तिगत जीवन संगठन के लिए एक बह्मस्त्र हैं। जिसका प्रयोग परिस्थिति जन्य है एवं आज की प्रासंगिकता भी है। दरअसल सर्व धर्म सम्भाव की जीती जागती तस्वीर समझने वाले गाँधी जी मानते थे कि हिंसा की बात चाहे किसी भी स्तर पर क्यों ना की जाये, परन्तु वास्तविक्ता यही है कि हिंसा किसी भी समस्या का सम्पूर्ण एवं स्थायी समाधान कतई नहीं है।

जिस प्रकार आज के दौर में आतंकवाद व हिंसा विश्व स्तर पर अपने चरम पर दिखाई दे रही है तथा चारो ओर गाँधी के आदर्शों की प्रासंगिकता की चर्चा छिड़ी हुई है, ठीक उसी प्रकार गाँधी जी भी अहिंसा की बात उस समय करते थे जब कि हिंसा अपने चरम पर होती थी। गाँधी जी शरीर के दुबले पतले लेकिन आत्मा के महान, शरीर पर कपड़े के नाम पर एक धोती लेकिन दिल के धनी, अपनी बात पर अड़ने वाले परन्तु अहिंसा के पुजारी, उनके इन्ही गुणों के कारण भारत के साथ साथ पूरा संसार उनके समक्ष नतमस्तक हो गया।

गाँधी जी ने विश्व को शोषण तथा अत्याचार के खिलाफ रहकर सत्य, अहिंसा, अपरिग्रह और सामाजिक समरस्ता के मार्ग पर चलना सिखाया। हमें चाहिऐ कि हम महात्मा गाँधी के आदर्शों का अनुसरण करते हुऐ नैतिक मूल्यों को अपने जीवन का आधार बनायें। क्योंकि आज की भारतीय विचारधारा नैतिक पतन के निचले स्तर पर विचरण कर रही है।

गाँधीवाद, अहिंसा और सत्याग्रह पर टिका है जो चार उप सिद्धान्तों, सत्य, प्रेम, न्याय और अनुशासन पर आधारित है। जिनकी उपादेयता एवं प्रासंगिकता, वैश्वीकरण के वर्तमान हिंसक दौर में और बढ़ जाती है। इसी कारण संयुक्त राष्ट्र संघ ने गाँधी जी के जन्म दिन को ''विश्व अहिंसा दिवस'' के रूप में स्वीकार कर मान्यता प्रदान की है।

उनके बताये हुए नैतिक, सामाजिक, राजनीतिक, धार्मिक, अध्यात्मिक, मानवतावादी, सत्य और अहिंसा, जन कल्याणकारी विचारों को अपने देनिक जीवन में अनुकरण करके ही हम अपने देश को कल्याण कर सकते हैं और फिर से दुनिया में अपने देश को वास्तव में विश्वगुरू बना सकते हैं। इसके लिए हमको गाँधी जी जैसा कर्मयोगी होना पड़ेगा क्योंकि वाक योगी होने से कुछ भी प्राप्त नहीं किया जा सकता है।

अन्त में शोधकर्ता आशा करता है कि पाठकगण मेरे शोध से सहमत होंगे और यदि लेख के किसी भी पहलू में कहीं चूक हो गई हो तो उसके लिए क्षमा याचना करता हूँ।

सन्दर्भ ग्रन्थ एंव स्रोतः–

१.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" भाग ५ अध्याय ४३ पृष्ठ ५३९, युनिकोड संस्करण संजय खत्री, नवजीवन प्रकाश मन्दिर–अहमदाबाद ३८००१४

२.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग नं०५ अध्याय २६ पृष्ठ ४८०

३.बी.बी.सी. न्यूज़ २८.०६.२०२१ पर आधारित

४.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५ अध्याय ६ पृष्ठ ४२२

५.हरिजन पत्रिका ०६.०३.१९३७, मेरे सपनो का भारत पृष्ठ नं० २७१

६.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५ अध्याय ४३ पृष्ठ नं० ५३७

७.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ४, अध्याय ३२, पृष्ठ नं० ३६७

८.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय ६, पृष्ठ ४२२

९.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय ३, पृष्ठ ४१६

१०.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय ५, पृष्ठ ५३८

११.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय ४३, पृष्ठ ५३८ व ५३९

१२.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ४, अध्याय २६, पृष्ठ ३५१

१३.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय ५, पृष्ठ ५३९

१४.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ४, अध्याय ३९, पृष्ठ ३८५

१५.हरिजन पत्रिका १५.०१.१९३८ के पृष्ठ नं० ४१८

१६.हरिजन पत्रिका १८.०९.१९३८ के पृष्ठ नं० ४१८

१७.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ४, अध्याय १८, पृष्ठ नं० ३२८

१८.गाँधी जी द्वारा रचित पुस्तक "My Experiments With Truth" या "An Autobiography" के भाग ५, अध्याय २७, पृष्ठ नं० ४८६

१९.०२.१०.२०१९ के डी.डब्ल्यू न्यूज़ पर आधारित।

२०.०१.०९.१९५३ दा टाईम्स ऑफ इण्डिया में छपे शीर्षक पर आधारित।

२१.Speeches and writings of M. Gandhi Pg. No. 387

२२.मेरे सपनो का भारत पुस्तक के अध्याय ६१ पृष्ठ नं० २६५

शशि देशपांडे के उपन्यासों में मध्यवर्गीय महिला के मुददे और स्थिति: नारीवादी विवेचना

गुरपिंदर कुमार

